श्री.

स्वामी चिदानंद

अथवा

प्रस्तुत चळवळीचें प्रतिबिंब,

(नाटक रूपानें)

लेखक

रा. रा. रामचंद्र शेषो नरगुंदकर,

बी. ए., एलएल. बी.

प्रकाशक.

दामोदर सांवळाराम आणि मंडळी,

मुंबई.

' इंदुप्रकाश " स्टीम प्रेस—मुंबई.

सन १९०७ इ.

किंमत ८ आणे.

प्रस्तावना.

आज दोन वर्षांपासून सर्व हिंदुस्थानभर जी स्वदेशी चळवळ ालू आहे तिची अनेक जण अनेक तऱ्हेनें सेवा करीत असतां ापणही कांहीं तरी सेवा करावी असा विचार माझ्या मनांत थम १९०६ सालचे उन्हाळ्याचे सुटींत आला. या चळ-ीसंबंधानें जोरदार भाषणें करण्याची किंवा मुद्देसूद लेख लिहि-ाचा पात्रता माझे अंगीं नव्हती. देशी धंदे वगैरे उभारणें हें ः केवळ धनिकांसच साध्य, व त्या वर्गापैकीं मी नाहीं. कल्पना-ीनें एखादा मोठा ग्रंथ लिहिणेंही मला शक्य नव्हतें. तथापि क या नात्यानें ठिकठिकाणीं मीं जें कांहीं पाहिलें किंवा ऐकिलें येंच एकीकरण करण्याच्या प्रयत्नास लागलों, व त्याचें संगतवार ण करून त्यास ' प्रस्तुत चळवळीचें प्रतिबिंब ' असें व्यापक । दिलें. या नाटकांत जीं पात्रें आहेत तीं केवळ कल्पना ातील नसून, त्यांच्या मूळ प्रतिमा थोड्याशा चौकस दृष्टीनें णारास आपल्या आजूबाजूस केव्हांही व कोठेंही दृष्टीस ीळ अशा आहेत. केशवरावासारखा सरकारी नोकरी-ायीं उदासीन व देशकार्य करण्याचे इच्छेनें प्रेरित झा-लेला तरुण वर्ग ठिकठिकाणीं दृग्गोचर होतो; व अशा रुण वर्गास आपलें जीवितसाफल्य कसें संपादावें या विषयीं पूर्वी ष्ट कल्पना येत नसे, त्यांस या चळवळीमुळें अनेक मार्ग खुले ल्याप्रमाणें झालें आहे. संसारपाश असलेल्या मनुष्याच्या हातून च्चतम देशसेवा घडणें शक्य नाहीं असें माझें मत आहे. त्यास

अनुसरून केशवराव व त्यांचे बंधु, स्वामी चिदानंद-पूर्वाश्रमीचे विश्वनाथराव-यांचे विचारांत साम्य असूनही त्यांचे हातून झालेल्या कार्यनिष्पत्तींतील फरकावरून या गोष्टीचें दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे. बापूसाहेबासारख्या जुन्या पिढीच्या लोकांपैकीं पुष्कळांस त्यांचे सवयीमुळें 'दोन व दोन चार', या गोष्टी इतकी साधी व सरळ गोष्ट आकलन करणें जड जातें व स्वदेशीसारख्या सर्वमान्य चळवळींचे ते फार तर मुरवतीखातर किंवा लोकमानाकरितां वरपांगी ढोंगी भक्त बनतात, तथापि त्यांचे अंतःकरणांत या चळवळीचीं मुळें शिरत नाहींत. कदाचित् हा दोष केवळ व्यक्तींचाच नसून पूर्वीच्या परिस्थितींत वाढल्यामुळें अनिवार्य होता असें वाटतें ! सरकारची स्वदेशी चळवळीविषयीं पूर्ण सहानुभूति असतांही कांहीं ठिकाणचे अधिकारी तीविषयीं साशंक वृत्ति दाखवित असल्यामुळें आपल्यापैकीं कांहीं नीच लोक खोटें कुभांड रचून केशवरावासारख्या गृहस्थास निष्कारण संकटांत आणून आपला बडेजाव वाढविण्याचे कुटिल प्रयत्न कसे करितात, हें कृष्णरावाचे पात्राकडून दाखविलें आहे. पुढारी लोकांनीं नेटानें प्रयत्न चालविल्यास त्यांस अनुयायांची वाण पडणार नाहीं व जरूर पडल्यास ते झीज सोसूनही आपल्या पुढाऱ्यांची पाठ सोडणार नाहींत हें पुष्कळांस दिसून आलें असेल. स्वदेशीच्या भक्तीस शिक्षण अवश्य आहे असें नाहीं. नेहमींच्या 'राजकीय चळवळी'पासोन अलग असणारीं लहान मुलें, बायका व भिक्षुक वर्ग हे सुद्धां स्वदेशीचे कसे कट्टे अभिमानी बनतात, तेंही ह्या नाटकांत वठविण्याचा प्रयत्न केला आहे.

हें नाटक आणखी दोन अंकांनीं वाढवावें अशी एक सूचना मला करण्यांत आली होती. तिची युक्तता जरी मला पटली तरी या नाटकाच्या उत्तरार्धाची सामुग्री अद्याप पुरेशी तयार नाहीं असें वाटल्यामुळें, व तसेंच या माझ्या प्रथमच्याच प्रयत्नास कसें काय यश येतें तें पाहून नंतर, याचा उत्तरार्ध लिहिण्याचें माझ्या मनांत

आहे व तसा प्रसंग आल्यास हल्लींच्या रचनेंत कांहीं ठिकाणीं विस्खलितपणा दिसतो तोही सुधारण्यांत येईल.

हें नाटक रचण्याचे कामीं अनेक मित्रांनीं प्रोत्साहन व मदत दिली. माझे मित्र रा. रा. नागेशराव जठार, बी. ए., एल एल. बी. हायकोर्ट वकील, मुंबई, यांची खटपट नसती तर हें नाटक छापलें गेलें असतें किंवा नाहीं याचीच शंका आहे. सबब या स्थळीं कृतज्ञता बुद्धिपुरस्सर त्यांचा नामनिर्देश केल्याशिवाय मजला राहवत नाहीं. तसेंच रा. रा. दामोदर सांवळाराम आणि मंडळी यांनीं माझ्या विनंतीला मान देऊन हें नाटक प्रथम आपल्या लोकमान्य 'सयाजी विजय' पत्रांतून व नंतर हल्लींच्या पुस्तकरूपांत छापल्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. यांत जीं दोन पदें आहेत, त्यांपैकीं रा. रा. त्रिविक्रमराव पित्रे वकील यांनीं 'उठा उठारे' हें पद पुरविल्याबद्दल त्यांचा, व रा. रा. यशवंतराव जठार यांनीं स्कॉट कवीच्या 'Breathes there the a man' याचें आपण केलेल्या 'असेल कां कुणी' या भाषांतराचा उपयोग करूं दिल्याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहे.

माझी मातृभाषा मराठी नव्हे व छापण्याचें ठिकाण बरेंच दूर असल्यामुळें सगळीं प्रुफें माझ्या नजरेखालून गेलीं नाहींत, यामुळें क्वचित् भाषादोष व क्वचित् हस्तदोष राहिले आहेत, हें मी जाणून आहे. त्याबद्दल वाचकवृंदांची क्षमा मागण्यापलीकडे मला गत्यंतर राहिलें नाहीं !

धारवाड, ता. ३१ मे १९०७. } रामचंद्र शेषो नरगुंदकर.

नाटकांतील पात्रें.

बाबासाहेब—एक पेनशनर सुखवस्तु गृहस्थ.

बापूसाहेब—एक बडे वकील.

केशवराव—बाबासाहेबांचे चिरंजीव.

कृष्णाजीपंत—एक रेव्हिन्यूखात्यांतील नौकर.

नानासाहेब—रेव्हिन्यू खात्यांतील एक बडे कामगार.

गोविंदराव
माधवराव
विनायकराव
वासुदेवराव
नारायणराव } गांवांतील सद्गृहस्थ.

स्वामी चिदानंद—केशवरावांचे वडील बंधु (विश्वनायराव).

शंभूशास्त्री
बचंभट
गणेशभट
नारायणभट } भिक्षूक मंडळी.

शेखमहमद—एक मुसलमान व्यापारी.

जानोजीराव—एक मराठा जमीनदार.

विश्वास—बापूसाहेबांचा मुलगा.

हरीबा—एक कोष्टी.

सावित्रीबाई—बापूसाहेबांची बायको.

लक्ष्मीबाई—केशवरावांची बायको.

रखमा हरीबा कोष्टयाची बायको.

या शिवाय शिपाई पाटील शाळेंतील मुलें वगैरे मंडळी.

स्वामी चिदानंद
अथवा
प्रस्तुत चळवळीचें प्रतिबिंब.

अंक १ ला.

प्रवेश पहिला.

स्थळ–विश्रांतिभुवन.

(गोविंदराव, कृष्णाजीपंत, विनायकराव, बापूसाहेब, शेखमहमद, जानोजीराव वगैरे मंडळी खुर्चीवर बसली आहे. पुढें टेबलावर चहाचे पेले आणि बशा ठेविल्या आहेत.)

गोविंदराव—(चहा पीत पीत) काय बापूसाहेब, आजचा चहा इतका स्वादिष्ट नाहीं बुवा. हा लिप्टनचा चहा नव्हे खास.

बापूसाहेब—आजचा चहा म्हणजे, रोजचा तरी चहा स्वादिष्ट असतो का? आमच्या लोकांना चहा करतांच येत नाहीं. बनविण्यांतच सगळा स्वाद निघून जातो. मी परवां लीप्टन साहेबांकडे गेलों होतों, त्या वेळेस चहा केला होता; काय स्वाद होता ह्मणता ? व: ! त्या लोकांचें करणें सवरणें सगळेंच स्वच्छ. त्या दिवशीं (हातवारे करून) साहेब बसले होते असे खुर्चीवर, व मी असा बाजूच्या खुर्चीवर बसलों होतों. त्यांच्या येथली ती बशी, तो पेला, तें टेबल, सगळ्या वस्तू कशा ह्मणतां अगदीं चकचकीत. त्यांच्या बंगल्यांत काडी इतका देखील केर सांपडावयाचा नाहीं. नाहीं तर आमच्या इकडे,

जिकडे तिकडे घाण, डर्टी शिंचे! चहा केला, की टाकलीच पसाभर साखर.

गोविंदराव—अरे, अंतू, तो परवां पामर अँड कोच स्टोअर्समधून आणलेला बिस्किटांचा डबा इकडे आण पाहूं. (अंतू गडी डबा घेऊन येतो, आणि तो फोडून मंडळी पुढें ठेवून आपण बाजूस उभा राहतो.)

कृष्णाजीपंत—(पुढें सरुन) घ्या, शेखसाहेब घ्या कीं दोन बिस्किट्स्; या असे पुढें या. हे बिस्किट्स् फारच चांगले, चहांत घालतांक्षणींच अगदीं लोण्यासारखे विरघळतात.

शेखमहंमद—(पुढें सरून) आमचे कांहीं लोक अलीकडे साहेब लोकांकडे राहून बटलरीचीं वगैरे कामें करून बेकरीच्या धंद्यांत तयार झाले आहेत. ते अगदीं या मासल्याचे बिस्किटस् तयार करितात. आणि अलीकडे तर पुसूं नका. आमच्या लोकांना तर या रोट बिस्किटांवांचून जेवण देखील जात नाहीं.

विनायकराव—अहो तो बाळू फराळवाला या मासल्याचे बिस्किटस् तयार करितो ! परंतु ते फार दिवस मात्र टिकत नाहींत.

बापूसाहेब—छेः आमच्या नेटिव्ह लोकांना या असल्या जिनसा तयार करितां येत नाहींत. आमच्या लोकांनीं भाकऱ्या भाजाव्या; फार झालें तर थालिपींट, दशमी केली, कीं शिकस्त.

शेखसाहेब—हें बघा रावसाब, आमच्या दुकानांत अशा प्रकारचे पुष्कळ बिस्किटांचे डबे ठेविले आहेत. अगदीं समदा इंग्लिशमेड २०–२५ मासल्याचे नुसते बिस्किटस् आहेत. हंट्लेपामरचे नुसते डबेचे डबे भरले आहेत. समदा विलायती माल, आह्मीं तो डर्टी देशी माल ठेवीतच नाहीं.

कृष्णाजीपंत—अहो, ते आमचे वेडे पीर कोठें आले नाहींत ते ? काय लेकाचा, देशोन्नती करायला निघाला आहे ! म्हणतो कीं, नुसता देशी मालच वापरा. परदेशी माल टाकून द्या. चहा

बिस्किटावर तर स्वारीचा मोठाच कटाक्ष, कांहीं तरी चाइल्डिश् विचार घेऊन बसला आहे झालं. एखादा परदेशी जिन्नस पाहिला कीं पुरे, लागलाच बडबडायला.

गोविंदराव—तो केशवरावना? ती मूर्तीच विलक्षण, पोलिटिकल एकॉनमी लेकाला मुळींच कळली नाहीं. कसा बी. ए. ची परीक्षा पास झाला देव जाणें? अरे फ्री ट्रेड शिवाय कोणाचेंच आतां चालावयाचें नाहीं. आणखी परकीय माल आपण घेतला नाहीं, तर हा असा चहा आणि अशीं बिस्किटें आपणांस कशीं मिळणार? आणखीं सगळा कामर्सच एक्सचेंज आणि डिस्ट्रिब्यूशन (exchange and distribution) वर बेस केला आहे. इकडचा माल तिकडे, आणि तिकडचा इकडे अशी ने आण केली ह्मणजेच देशाची भरभराट होते. हें कोठें कळतें आहे त्यांना! शिवाय परदेशी माल असतो तरी किती सुंदर! आमचा माल विलायती मालासारखा सुंदर होऊं द्या, मीं घ्यायला कबूल.

शेखसाहेब—हे बघा रावसाहेब, हें समदा फूलिश् (foolish) आहे. आमच्या दुकानांत सगळा विलायती माल भरून ठेवला आहे.

बापूसाहेब—आपण तर कधीं तो डर्टी देशी माल वापरणार नाहीं. कसला भिकार माल तो? एकेकाची तऱ्हाच. आमच्या लोकांना कांहींच करितां येत नाहीं हो. देशीमालच वापरावा ह्मटल्यास खादीचे कपडे वापरावे लागतील, गुळाचा चहा प्यावा लागेल, आणि घरांत जिकडे तिकडे घाणेरड्या समया ठेवाव्या लागतील, एक का दोन, सगळेंच विपरीत करावें लागेल.

जानोजीराव—केशवरावांची स्वारी इकडेच येते आहे.

विनायकराव—स्वारीचा झोंक तरी पहा; याची जरा मजा करूं आं?

(केशवराव येतात.)

(सर्वजण उभे राहून नमोनमः या देशी महाराज, ह्मणून त्याला उत्थापन देतात; केशवराव बाजूच्या खुर्चीवर बसतात.)

कृष्णाजीपंत—हो हो केशवराव अब्रह्मण्यं ! अब्रह्मण्यं ! हें काय केलत्. आपण खुर्चीवर कसें बसलां ? खुर्चीतर अगदीं परदेशी ! कृष्णाजिनाशिवाय आपल्यासारख्या सोंवळया मंडळीनें बसूंच नये. आज कुठें प्रीचिंगला गेला नाहीं ते ?

केशवराव—अरे तुह्माला सारी यट्टा वाटते. खुर्ची असली ह्मणून काय झालें ? आमच्या देशांतच केली आहे ना ? पुरे. ती मग कसल्या फ्याशनची कां असेना, आह्मांला चालते.

विनायकराव—शांतं पापं, काय हें ! इंग्रजी शब्द आपल्या तोंडांतून ! फ्याशन ! आपल्यासारख्या ऋषिवर्यांनीं फ्याशन ह्मणावें, छेः बरें; पण केशवराव, ह्या पाहिल्यात कां वड्या. ह्या पामर भटानें करून मुद्दाम आपल्यासारख्या सोंवळया मंडळी-करितां धाबळींत गुंडाळून पाठवून दिल्या आहेत. घ्या कीं आपण दोन वड्या, कांहीं हरकत नाहीं. ह्या अगदीं शुद्ध पवित्र तेम्सोदकांत तयार केलेल्या आहेत.

केशवराव—करा थट्टा. आहे जवळ पुंजी, तुम्ही काय कराल ? आणखी महिन्यामहिन्याला नवीन पैसा दृष्टीस पडतो, ह्मणून ही सारी चंगळ चालली आहे ! अरे, देशांत जिकडे तिकडे हाहाःकार होऊन आग पसरली आहे, प्रत्येकाला पोटाची पंचाईत पडली आहे, तुमचे जातभाई उपाशी मरतात आणि तुमचे पैसे परदेशचे लोक थैल्या भरून नेतात. तरी तुमची आपली चंगळ चालली आहे ना ? तुह्मांला बिस्कीटस्च खायचे असतील तर आमचा बाळू फराळवाला चांगले ताजे बिस्कीटस् करतो. त्याचे जर चांगले होत नसतील, तर दिल्लीस तयार होतात ते घ्या. ते आपल्या देशांतच तयार होतात. तुमच्या सारखे लोक जर देश बुडवूं लागले, तर तारावें कुणीं ? तुह्मांला

चंगळ करायचीच असेल तर देशी वस्तु वापरून करा, पण आपल्या देशबांधवांना उपाशीं कां मारतां ?

बापूसाहेब—आमची चंगळ ही अशीच चालायची. हे लेकाचे आमचे जातभाईच नव्हेत. यानां उपाशी मरायला सांगितलें कुणीं ? आयडल् शिंचे, मेले तर मेले उपाशी; यांच्या मरणानें जग बुडत नाहीं. ओव्हर पॉप्युलेशन झालेली मात्र कमी होईल.

विनायकराव—(हंसून) स्वारी आज रंगांत आली आहे.

गोविंदराव—(जरागंभीर मुद्रेनें) हें पहा केशवरावजी तुह्मांला अद्यापी सगळें कळत नाहीं. आणखी थोडे दिवस गेले ह्मणजे तुमचें म्हणणें तुह्मालाच पोरकट वाटूं लागेल. अझून तुह्मी पोर आहांत. नुकतेंच कॉलेजांतून बाहेर आलां आहांत. हे असे विचार तुमचे असायचेच. यांत तुमचा दोष नाहीं. तुमचे विचार अझून पुस्तकी आहेत. अहो हें आहे विसावें शतक. या शतकांत आहे प्रत्येकाला व्यक्तिस्वातंत्र्य. ज्याला जो माल रुचेल, तो तो माल घेईल. तुह्मी आह्मी सांगून लोक ऐकणार आहेत थोडेच? आणि उगीच रिकामी उठाठेव घेऊन काय करावयाचें ! आणि तुम्ही हे असे देशी देशी ह्मणत फिरलां, तर लोक तुमचे ऐकणार तर नाहींतच, उलट तुम्हांला वेडा मात्र म्हणतील. विलायती काय आणि देशी काय कोणत्यातरी जिनसा वापरावयाच्या हें तर खरें ! मग कां उगीच उठाठेव.

बापूसाहेब—परदेशी माल सुबक व स्वस्त मिळत असतां, जाडा भरडा असा देशी माल कोण घेईल हो ?

जानोजीराव—केशवरावजी माझें एक आपणाला विचारावयाचें आहे. हे बघा आपण हा पार्शी कोट कां घातला ? तुमचा तो जुना पायघोळ अंगरखा काय वाईट ? करायचेंच असेल तर सगळेंच देशी करावें, नाहीं तर उगीच बाता मारूं नये. येतां उद्यापासून ? एक खादीची बंडी, तसलाच एक लांब

अंगरखा आणि एक चक्री पागोटें घालून ? आणि छत्री अगदीं ताडपत्री असली पाहिजे. म्हणजे आम्हीं तुह्माला खरे देश-भक्त म्हणूं, आहे कबूल ?

सर्वजण—(एकदम्) द्याट्सइट् द्याटसइट्, बोला, देशी महाराज, द्या उत्तर ?

केशवराव—कबूल, असा प्रश्न विचारल्यास कांहीं हरकत नाहीं. हें पहा, जानोजीराव, प्रत्येकानें जो जिन्नस वापरावयाचा तो आपल्या देशांतच तयार केलेला आहे किंवा नाहीं एवढें पाहून जिन्नस घ्यावा. माल देशी असला कीं पुरे, मग तो कोणत्या कां तऱ्हेचा असेना. अंगरख्याचें कापड देंशी असलें कीं पुरे. मग त्याचा तुह्मीं कोट करा, प्यांट करा, वाटेल तें करा, कांहीं हरकत नाहीं.

बापूसाहेब—चाइल्डिश्.

जानोजीराव—हें ह्मणणें आमच्या पसंतीस येत नाहीं. परदेशी माल घ्यायचा नाहीं, एवढेंच नव्हे, तर परदेशी ह्मणून जितक्या गोष्टी आहेत त्या सर्व सोडून दिल्या पाहिजेत. तुह्मीं इंग्रजी शिकणें अजीबात सोडून द्या. आगगाड्या, तारायंत्रें, टपाल सर्व वापरणें बंद करा. म्हणजे आह्मी तुमचें म्हणणें ऐकूं. उगीच आपणास जें पाहिजे तें मात्र आपण करायचें, आणि म्हणे मोठें देशभक्त, असे अर्धे कच्चे देशी लोक आह्मास नको आहेत.

केशवराव—माझें म्हणणेंच तुमच्या लक्षांत चांगलें येत नाहीं. आमच्या लोकांच्याच आगगाड्या व तारायंत्रें वगैरे झालीं पाहिजेत.

बापूसाहेब—तुमच्या लोकांच्या आगगाड्या ! सात जन्म जरी तुमच्या लोकांनीं घेतले तरी कांहीं तुमच्या लोकांच्या आगगाड्या होणें नाहीं. आगगाड्या करण्याची ताकत असती तर ही अशी कां स्थिति झाली असती? तो खटारा आहे कीं,

इसवी सनाच्या पहिल्या शतकांत जसा होता तसाच अद्यापी आहे. तो खटाराच तुमची देशी मोटार.

कृष्णाजीपंत—चला बापूसाहेब चला. विनायकरावांनीं नेट लाविली. चला दोन सेटस् खेळूं. आपण येतां कीं नाहीं देशी महाराज? आपण बहुत करून टेनिस् खेळणें बंद केलें असेलच.

विनायकराव—(उठून) चला चला, ह्या म्याडक्यापशीं वाद करीत बसल्यास कधींच आटपावयाचें नाहीं. त्यांना आतां जायचें असेल योगाभ्यास करायला (केशवरावाखेरीज सर्वजण टेनिस कोर्टाकडे जातात.)

केशवराव—(एकटाच आपल्याशीं)–या लोकांना काय ह्मणावें? चांगले शिकले सवरलेले लोक जर असे वागूं लागले, तर बाकीच्यांना काय दोष! इंग्रजी विद्येमुळें यांच्या विचारांत कांहींच फेरफार झाला नाहीं काय? खावें, प्यावें, चैन करावी, यांतच यांचा पुरुषार्थ! हाच विनायकराव हुषार ह्मणून कालेजांत प्रिन्सिपॉल साहेबांनीं याची शिफारस केली होती, तोच आज १०० रुपयांची नोकरी मिळतांच दुसरा कसलाच विचार न करितां स्वस्थ चैनींत वेळ घालवितो आहे! इंग्रजी विद्येसारखें जालीम औषध यांना लागू झालें नाहीं काय? आमची प्रकृतीच अशा प्रकारची झाली आहे कीं या औषधाचा खरा गुण कांहींच कळत नाहीं! बापूसाहेब तर पक्के साहेबच बनून गेले आहेत. देशी जिनसांची गोष्ट काढिली, कीं यांचें डोकेंच दुखावयास लागतें. यांना सारा पोरखेळ वाटतो. देशी विचारांचा मनुष्य यांनां म्याडमन् दिसतो. जिकडे तिकडे आग पेटली आहे, आपले भाईबंद आगीच्या तडाक्यांत सांपडून पटापट मरत आहेत, मात्र आपल्यापर्यंत आगीचा लोंढा आला नाहीं म्हणून हे लोक स्वस्थ हांसत खेळत चैनींत आहेत. मोठमोठ्या ढिगाऱ्या

पटकावून बड्या पगाराच्या जागा मिळविण्याचे दिवस आतां निघून गेले. बहुतेक कला लोपून गेल्या, शेतकी बुडाली, व्यापार परकीयांच्या हातीं गेला, आपल्या पोराबाळांचें काय होईल हे विचार देखील तुमच्या मनांत येत नाहींत ना? माझी चंगळ चालली आहे, दुसऱ्याबद्दल आपण कां विचार करावा? असे स्वार्थी विचार अद्यापि तुमच्या डोक्यांतून गेले नाहींत का? तीं इतिहासाचीं भाराभर बुकें, तें अर्थशास्त्र, सारींच कां रे व्यर्थ? नशीब या भरतखंडाचें. असो उशीर झाला, जावें आतां घराकडे.

प्रवेश दुसरा.

स्थळ बापूसाहेबांच्या घरांतील दिवाणखाना.

(बापूसाहेब जेवण करून बाहेर जाण्याच्या गडबडींत आहेत रामा गडी आंगावर पोषाक चढवितो आहे, तोंडांतून सिगारेटस्चा धूर निघतो आहे)

बापूसाहेब—विश्वास, अरे विश्वास, इकडे ये .(विश्वास बापूसाहेबांचा १६ वर्षांचा मुलगा, इंग्रजी तऱ्हेचा पोषाक केलेला व डोळ्यावर चष्मा चढविलेला असा येतो.)

बापूसा०—अरे तें चिटाचें गाठोडें आहे, तें आंत नेऊन दाखीव, छे, नाहीं, तर तिलाच इकडे बोलीव म्हणजे तिच्या पसंतीस पडेल तो माल ठेवून घेऊन बाकीचा परत करूं.

(विश्वास आंत जाऊन सावित्री बाईस बोलवून घेऊन येतो)

बापूसा०—हें पहा, तें गाठोडें आणलें आहे, तुला पाहिजेत त्या जिनसा ठेवून घेऊन बाकीच्या परत करूं.

सावित्रि०—(गाठोडें सोडून त्यांतील एकेक जिनस बाहेर काढून) हं हें चीट बरें दिसतें. ही मलमल ही बरी

दिसते, ही चुनडी नको. आणि हें लुगडें हीं नको. इश, किती जड तरी ! पण मखमल आणलीच नाहीं, बाबूला एक सुरेख अंगरखा झाला असता. विश्वासाला एक टोपी केली असती त्यांतल्या त्यांत, व मला ही एक चोळी झाली असती.

बापूसा०—बरें आहे, आणूं संध्याकाळीं येतांना.

सावित्री०—हो सांगायचं राहिलं. त्या बशा सगळ्या फुटल्या, नवीन आणल्याच पाहिजेत. संध्याकाळच्या चहाची पंचाईत. कसली मेली ती चिमा ! तिचे हातच धड नाहींत. सकाळीं चहा पाणी झाल्यावर धुवून पुसून ठेव ह्मणून सांगितलं मात्र, सर्व बशा हातच्या पाडून फोडून टाकिल्या. काय करावें, ही असंच करतें, ती परवां चहादाणी अशीच फोडली.

रामागडी—(बूट पुशीत पुशीत) गलास आणले पाहिजेत. सकाळच्यापारीं दिवे पुसून नीट ठेवाया गेलों, तो वरचा ग्लास पडला तें बी फुटलं व तें स्टांडबी फुटलं. सांजच्यांत नवीन आणलंच पाहिजे.

बापूसा०—अरे हें असें वारंवार फोडलंस तर किती तरी सामान आणायचं रे ! नुकता परवांच तो स्ट्यांड विकत घेतला होता. छे बुवा पुन्हां हा १–२ रुपयाचा नवीन खर्च. या कांचेच्या सामानाच्या पायीं अगदीं मीं त्रासून गेलों आहे. आणखी काय काय पाहिजे तें सगळें सांगा एकदांचें, ह्मणजे संध्याकाळीं सहज स्टोअरकडे जावून आणूं सगळा माल एकदम.

सावित्रीबाई—चहा सरला आहे, नवीन डबा आणावा. तशीच चहाची साखरही तिकडून आणावी. गांवांत चांगली मिळतच नाहीं. स्टोअरकडे जर जायचं तर २ बिस्कीटाचे डबे आणावेत. आणखी लहान लहान ग्लासाच्या बरण्या मिळाल्यास पहाव्या, त्यांच्यांत जिनसा ठेवल्यास कशा नामी रहातात.

बापूसा—बरं बरं, आतां उशीर झाला संध्याकाळीं आणून टाकूं सर्व माल एकदाचा. पण आजच्या दुपारच्या फराळाला रोट बिस्किटांची तयारी केली पाहिजे हो.

सावित्रीबाई—बघतें त्या दातारांच्या गंगूबाईला विचारून; ती आली आहे नुकतीच मुंबईहून माहेरपणाला. ती आहे शहाणी या जिनसा करण्यांत.

बापूसा—कांहीं कां असेना, आह्मांला आपला विलायती मेवा मिळाला कीं पुरे.

(इतक्यांत एक फेरीवाला येऊन, कांहीं कापडबीपड घ्यायचा आहे कां रावसाहेब, म्हणून विचारतो.)

बापूसाहेब—-आण पाहूं, काय काय माल तुजजवळ आहे तो ?

(फेरीवाला गाठोडें सोडतो.)

सावित्रीबाई—(पुढें होऊन) अरे चांगलें लोंकरीचे कापड असल्यास काढ पाहूं ?

फेरीवाला—-(एकेक कापड दाखवून) हा बघा लई अच्छा माल; या गांवच्या बाजारांत असा माल मिळेल नई. हा इस्तंबूलचा गरम कपडा. हा ब्रूसेल्सचा कपडा. हे तो अच्या क्याश्मीर. कोणता माल पाहिजे ?

विश्वास—-(पुढें होऊन त्यांतील एक तागा उचलून) बाबा, हा तागा, घ्या हा चांगला सुबक दिसतो.

बापूसाहेब—-हा वेडया, तो तागा चांगला नाहीं. तो गांवठी कापडाचा तागा आहे.

फेरीवाला—छेः रावसाहेब, आह्मी असा गांवठी माल विकणारा वेपारी नाय. अमच्याजवळ अस्सल विलायतीच माल बहोत रहेंगा. आमचा सगळा कपडा म्यांचेस्टरचा सबसाहेब. हे बघा, (असें ह्मणून २–३ तागे बापूसाहेबांकडे टाकतो.)

सावित्रीबाई—(पुढें येऊन गाठोड्याकडे बोट करून) अरे तें मध्यें तांबडें कापड दिसतें तें काढ पाहू ? तें बरें आहे बाबूला, एक अंगरखा करतां येण्यासारखा आहे.

विश्वास—आई ती घाबळी, ती कुठें इथेंच केलेली देशी घाबळी दिसते.

फेरीवाला—(हंसून) छे, ऐसा नइ बाई साब, आह्मी सांगितला ना आमच्या पास एक देशी कपडा असेल तर शपथ. (तो कैंपडा बाहेर काढून) हें तो अस्सल चिनी स्याटिन हाय. घेयाचा असेल तर घ्यावा; असा देशी ह्मणून नांव ठेवूं नाय.

बापूसाहेब—अरे तें कापड ठेव काढून बाहेर, आणि आदितवारीं पैसे घेऊन जा.

(व्यापारी जातो.)

बापूसाहेब—बरं आहे, आह्मी जातो बाहेर, संध्याकाळीं रामाला तिकडे पाठवून दे: बरं कारे रामा.

(सावित्रीबाई आणि विश्वास जातात.)

बापूसाहेब—अरे रामा, आणखी कांहीं आणायचे उरलें कां पहा.

रामा—होय एक व्हिस्कीची बाटली आणावी लागेल.

बापूसा०—बरं आहे. पण तूं लवकरच ये हो तिकडे.

(पुन्हां एक सिगारेट तोंडांत धरितो त्याला काडी ओढून लावितो.)

(बापूसाहेब जातात.)—पडदा पडतो.

प्रवेश तिसरा.

स्थळ–बाबासाहेबांचें घर.

(केशवरावांचे वडील बाबासाहेब आणि बचंभट बसले आहेत.)

बाबासाहेब—काय करावें याला ? आज तीस वर्षे नौकरी करून चांगला नांवलौकिक मिळविला, अन्नवस्त्रांस कांहीं तोटा नाहीं,

पण मुलगे हे असे ? चांगला विद्याभ्यास करविला त्याचें हें फळ ! तो विश्वनाथ तर कोठें नाहींसा झाला त्याचा पत्ताच नाहीं. आज त्याला जाऊन जवळ जवळ बारा वर्षें होऊन गेलीं. जीवंत आहे कां मेला, कांहींच कळत नाहीं. मी त्याची बिलकुल आठवण करूं नये ह्मणतों. पण काय कीं अलीकडे त्याची वारंवार आठवण होते. बहुतकरून कोठें तरी नदी नाल्यांत बुडून मेला असेल ! त्याची ती अवस्था, आणि केशव हा असा ! चांगला बी. ए. ची परीक्षा पास झाला, चार चौघांची ओळख आहे, आतांच भीड खर्चून एखादी सुरेखशी नौकरी लावून द्यावी ह्मणतो, पण याच्या पसंतीसच येत नाहीं ! पुढचा अभ्यास तरी करून वकीलीची सनदा मिळीव म्हणून सांगितल्यास तेंही याच्या मनास येत नाहीं, व मनांतले विचारच स्पष्ट सांगत नाहीं. ते टर्मचे दिवस आतां निघून गेले. इकडे नौकरीबद्दल अर्ज करावयास सांगितलें तर आज उद्यां करीत बसला आहे. त्या जॉकसन साहेबांकडे चल, साहेबांची भेट करवितों ह्मणून सांगितलें. तेंही याच्या मनास येत नाहीं ! याच्या मनांत तरी काय आहे, तेंही तो स्पष्ट नाहीं.

वचंभट—हो हो, आपण साहेबांस सांगितलंत कीं पुरे. देईल एखादी मामलेदाराची जागा. एवढी मोठी परीक्षा झाली ती काय उगीच कीं काय ?

बाबासा०—नौकरी मिळेल हो कसली तरी, परंतु याच्या मनासच येत नाहीं, याला काय करावें ?

वचंभट—मी सांगतों आपल्याला एक खुबी, आपण साहेबांच्याकडून परभारें त्यांच्या नांवानें एक हुकूमच पाठवून द्या, ह्मणजे जातील आपोआप नौकरीवर.

बाबासा०—अरे कोण आहेरे तिकडे.

जनूगडी—(पुढें येऊन सलाम करून) जी साहेब.

बाबासा०—अरे केशवास इकडे बोलावलय ह्मणून सांग.

(जनू जातो आणि केशवरावास घेऊन येतो.)

बाबासा०—अरे केशवा, तुझी परीक्षा पास होऊन सुमारें दोन महिने होऊन गेले. तूं चांगला दुसऱ्या वर्गांत पास झालास, माझ्या मनास संतोष झाला. पण पुढचा विचार काय? मी याच्याबद्दल तुला दोन तीनदां विचारलें. तरी तूं आपला अळंटळं उत्तर देतोस. आज तुझ्या मनांत काय आहे तें स्पष्ट सांग. माझी अद्यापि साहेब मंडळीत पत आहे, तोंपर्यंत कोठें तरी चिकटवीन म्हणतों. उगीच आपला असा निरुद्योगी बसून किती दिवस घालविणार? मुंबईस जाऊन पुढचा अभ्यास करायचा असेल तर तसें कर म्हणून सांगितलें तेंहीं ऐकिलें नाहींस. आतां ते टर्मचे दिवस सुद्धां निघून गेले, बोल काय तुझ्या मनांत आहे तें?

बचंभट—हें पहा, हें शिकणें आतां पुरें, एवढी मोठी परीक्षा झाली आतां एकदांचे मामलेदार झालां ह्मणजे झालें. आपले लोक मोठाल्या जागेवर असले, ह्मणजे आमच्या सारख्यांची चंगळ. आपल्या नांवावरच आह्मीं चार पैसे कमावतो.

बाबासा०—माझं म्हणणं, त्यांनीं आतां नौकरी करावी. काय केशव, काय म्हणतोस?

केशव—बाबा, माझा अद्यापि कसलाच विचार झाला नाहीं. आज माझ्या नशीबानें मला कशाचीच ददात नाहीं. आपल्यासारखे वडील आहेत. आपण अविश्रांत श्रम करून चांगली धनदौलत मिळवून ठेविली आहे. आपणांस चार चौघांत मान आहे, आपण मनांतच आणल्यास नौकरीही चांगली मिळेल, परंतु माझे विचार निराळेच आहेत. कॉलेजांतील निरनिराळ्या विषयांच्या अध्ययनानें माझ्या मनांत एकसारखे विचार चालू असतात. नौकरी करून स्वतःचीच चंगळ करायचीनां? स्वतःचाच बडेजाव वाढवायचानां? माझ्या पोटाची कांहीं अडचण

नाहीं, तर मग, माझ्यासारख्या मनुष्यानें पुन्हां आपला धोपट मार्गच पतकरायचा काय? सध्याची आपली देशस्थिति अहोरात्र माझ्या डोळ्यांसमोर असते. मला रात्रीं चांगली झोंप देखील लागत नाहीं. मनाला सारखी तळमळ लागून राहिली आहे. माझ्या देशाची ही दैना माझ्यानें पाहवत नाहीं. मला तुह्मीं वेडा ह्मणा, अगर माथेफिरू ह्मणा. माझी अशी स्थिति झाली खरी. आपणांस जर माझें कल्याण करावयाचें असेल, तर मला पुन्हां नौकरींत लोटूं नका. माझा विचार खरोखर विचाराल तर असा आहे कीं, एक दोन वर्षें सर्व जगभर फिरून सर्व देश व तेथील लोकस्थिति पहावी. परदेशांतिल कलाकौशल्याचा अभ्यास करावा व मग परत येऊन आपल्या देशांतील उद्योग धंदे वाढविण्यासारखा एखादा धंदा हातीं घ्यावा. हे माझे विचार आपण पसंत करावे, व आपला मला पूर्ण आशीर्वाद मिळावा, येवढेंच मला आपल्यांजवळ मागणें आहे.

बखंभट—हा वेड्या, देशभर फिरायचें? तें कां ह्मणून? एवढी थोरली परीक्षा दिली ती कां देश देश फिरण्याकरितां? छेः, हे असले विचार आपल्या मनास तर बिलकूल येत नाहींत. मग इतके शिकलांत तरी कशाला? नाहीं हो बाबासाहेब, त्यांचें काय ऐकतां, तुह्मीं आपली त्यानां द्या एक सुरेखशी नौकरी बघून.

बाबासा०—केशव, तुझे विचार कसे कां असतना. ते माझ्या पसंतीस येत नाहींत. ते ज्याकसन साहेब येथें आले आहेत. त्यांची माझी चांगली ओळख आहे. खानदेशांत असतांना त्यांच्या हाताखालीं मी काम केलें आहे. साहेब फारच चांगले आहेत, त्यांच्याकडे माझा शब्द खालीं जावयाचा नाहीं. उद्या सकाळीं माझ्याबरोबर साहेबांच्या बंगल्याकडे तुला आलें पाहिजे. साहेब लवकर जाणार आहेत. पुन्हां अशी संधी मिळायची नाहीं (इतक्यांत शागीर्द येऊन

स्नानाची तयारी झाली आहे ह्मणून सांगतो. त्यास) हो येतो (उठतां उठतां) माझ्या बोलण्याचा नीट विचार कर. माझा स्वभाव तुला माहीत आहे, मी कर ह्मणेन तें तुला केलेंच पाहिजे. (बाबासाहेब जातात.)

वच्चंभट—केशवराव, आपण हें काय घेऊन बसलांत. मी नाहीं पाहिला बुवा असला मनुष्य ! अहो वाहत्या गंगेंत हात धुवून घ्यावेत. बाबासाहेबांनीं एक शब्द टाकिला कीं पुरे, सहज एखादी मोठी जागा मिळेल. असें उगीच भलतें सलतें करूं नये. विश्वनाथरावांची हकीकत माहीत आहेना ? अगदीं लग्नाची तयारी झाली होती. मुहूर्त देखील पाहून ठेविला होता. लग्नाला एकदोन दिवसांत निघावयाचें होतें. तों विश्वनाथरावानीं धरला हट्ट कीं आपण आतांच लग्न करणार नाहीं ह्मणून, मोठा हट्टी स्वभाव त्यांचा—बाबासाहेब तर त्यांचे वडील. त्यांचा आग्रह कीं लग्न करून टाकायचेंच. मग काय, बाबासाहेब कांहीं बोलले वाटतें. एकाएकी रात्री विश्वनाथराव जे नाहींसे झाले, तो अद्यापि त्यांचा पत्ता नाहीं. ह्मणून सांगतो असा हट्ट धरूं नये. आणि यांत काय ते वावगे सांगताहेत थोडेंच ? काय मग नोकरीवर जायचेंना ?

केशवराव—माझ्या मनांतून तर नौकरीवर जावयाचें नाहीं, पण एवढें मात्र खरे, कीं उद्यां बाबाबरोबर जातो साहेबास भेटायला.

वच्चंभट—हां, हें ठीक बोललात. आतां एकदां नोकरी लागली ह्मणजे माझ्यावर असाच लोभ असावा. बरं माझ्या भिकूस मी आपल्या जवळ ठेवावा ह्मणतो. या गावांहून दुसरीकडे कोठें तरी बदली झाल्यास मी आरंभीचे कांहीं दिवस आपल्याकडे राहतो. बाबासाहेबांच्या स्वारीबरोबर असताना चार मंडळीकडून आमची संभावना चांगली होई. आपणांला मी कांहीं विशेष सांगावें असें नाहीं.

केशवराव—(विचार करीत करीत) बरें आहे.

बचंभट—हो आणखी एक विसरलो आपल्याबरोबर जो ब्राह्मण न्यायाचा तो चांगला हुशार असावा. तो सदू ह्मणत होता मी येतो ह्मणून. मी सारी तरतूज करून ठेविली आहे आगाऊच.

केशवराव—हो ठीक केलेंत्.

बचंभट—आणखी सध्या एक ब्राह्मण पुरे. तो पाहून घेईल सर्व काम, आणि काम तरी किती असणार? आपण असणार २–३ माणस आणि लक्ष्मीबाई आहे हुषार, ती कशी अगदीं थाटाचा संसार करील. गडयाबद्दल काय तजवीज करावी?

केशवराव—(विचार करीतच) पाहूं काय करायचे तें.

बचंभट—तो जनू ह्मणत होता त्याचा एक भाऊ आहे गांवीं. (चांगला हुशार आहे ह्मणे.) त्यालाच ठेवावा ह्मणजे झालें. जनू कायमचा बाबासाहेबांकडेच पाहिजे.

केशवराव—(त्रासून) हा सगळा विचार करायला अझूनहि अवकाश आहे. आतांच कां या गोष्टी? भटजी या आतां मी जातो स्नानाला.

बचंभट—छे: आणखी एक सांगायचें राहिलेंच. हें पहा येथून निघा-यचें, तें चांगला मुहूर्त पाहून निघावें. अमृतसिद्धि योग असला ह्मणजे ठीक. हो करायच्या सगळ्या गोष्टी यथासांग झाल्या पाहिजेत.

केशवराव—(आपल्याशींच) काय रिकामी वटवट लावली आहे या ब्राह्मणानें. यानें आपली सगळी तयारी करून ठेविली आहे. याचे बोलणें पुरे करावें ह्मटल्यास चऱ्हाट लांबतच चाललें आहे. (उघड) काय काय केलें पाहिजे तें सर्व तुह्माला विचारूनच करितों. बरें आहे, आपण आतां या.

बचंभट—बरं आहे, येतो. आपणांस कांहीं फार सांगत नाहीं. तरी पण गरिबावर लोभ कायमचा असावा.

केशवराव—हं, या आतां नमस्कार.

(बचंभटजी जातात. पडदा पडतो.)

प्रवेश चवथा.

स्थळ–केशवरावाची खोली.

(केशवराव एकटेच आपल्या खोलींत खुर्चीवर बसले आहेत. पुढें टेबलावर कांहीं बुकें ठेविलीं आहेत हातांत एक पुस्तक आहे.)

केशवराव—(आपल्याशींच) वडिलांचा तर असा हट्ट. यांच्या पुढें इलाजच नाहीं. स्वभाव पडला मोठा आग्रही, परंतु त्यांचा तरी काय दोष, आपला मुलगा मोठ्या हुद्यावर आलेला पाहून त्यांस आनंद होईल. आणि आपल्या लोकांची इतिकर्तव्यता एवढीच. स्पष्टपणें सांगितलेला माझा विचार यांच्या मनास बिलकूल येत नाहीं, आणि माझ्या मनांतून तर त्यांच्या सांगण्याप्रमाणें करावयाचें नाहीं. याला आतां मधली वाट कोणती शोधून काढावी ? वडिलांची आज्ञा न मोडतां देशसेवेचें व्रत अभंग चालू ठेवण्याजोगतें नाहीं काय ? माझ्या सारखे भाग्यवान् प्राणी या जगांत अगदींच थोडें असतील. वडलांनीं उत्तम नांव लौकीक करून यथेच्छ धनदौलत मिळवून ठेविली आहे. इंग्रजी विद्येसारखी जाज्वल्य विद्या आज माझ्या नशीबानें मला अवगत झाली आहे. हिंदुस्थानासारख्या पुण्यभूमींत माझा जन्म झाला आहे. आणि हिंदुस्थानांत, या माझ्या मातृभूमीस कष्टप्रद स्थितींतून मुक्त करण्याच्या कामीं हातभार लावण्याचें महत्तम कार्य माझ्या पुढें आहे. अन्नवस्त्रास तोटा नाहीं. इकडे देशसेवा व्रत चालविण्याचें अक्षय्य काम माझ्या पुढें आहे. हिंदुस्थानांत जन्मून काय करूं, कोणतें काम हातीं घेऊं असें म्हणत उगीच बसण्याचें कारणच नाहीं. देशसेवा करण्यास दहाही दिशा मोकळ्या आहेत. आपण करूं तितकें काम थोडेंच आहे.

(इतक्यांत लक्ष्मीबाई केशवरावाची बायको येऊन बाजूस दूर उभी राहते तीस पाहून मोठ्यानें.)

आणि माझ्या इच्छित कार्यांत मला पूर्णपणें मदत करणारा माझी सहधर्मचारिणी ही साक्षात् लक्ष्मीच मला प्राप्त झाली आहे. खरोखर मी मोठा भाग्यवान्.

लक्ष्मीबाई—(जवळ येऊन बाजूस उभी राहते). हें असें इकडून म्हणणें झालें कीं माझ्या आंगावरचं चार बोटं मांस वाढतें, पण हो, विचार कसले चालले आहेत ते ?

केशवराव—हो, तुला एक विचारायचें आहे, तुझी सल्ला घेतलीच पाहिजे.

लक्ष्मीबाई—काय विचारायाचं तें, व्हावी आज्ञा.

केशवराव—(कांहीं वेळ विचार करून) पहा, बाबांच्या हें मनांतून आहे कीं मी नौकरी करावी म्हणून.

लक्ष्मीबाई—मग काय झालं ? चांगलं होईल; होय गडे मी म्हणते आतां इकडे चांगली नौकरी मिळेल, नाहीं का ?

केशवराव—हंः वेडी कुठली, तुला माझें म्हणणेंच कळलें नाहीं. माझ्या मनांतून तर नौकरी करावयाची नाहीं.

लक्ष्मीबाई—कांहीं तरी म्हणायचें झालें. एवढी मोठी परीक्षा पास झाली, मग आतां काय, एकदम मोठीच नौकरी मिळेल मामंजींच्या सारखीच.

केशवराव—(निराशयुक्त मुद्रेनें)छे आजपर्यंत शिकविलेलें सारें व्यर्थ. तुला आजपर्यंत कितीतरी गोष्टी शिकविल्या; इतिहासांतल्या किती तरी गोष्टी अगबत करून दिल्या. इंग्लंडांतल्या आणि आपल्या देशांतल्या लोकांची स्थिती तुला सर्व माहीत आहे. तरी आपले तुझे हे असेच विचार, मग तुझ्यांत आणि बाकीच्या बायकांत काय फरक ? माझ्यासारख्या मनुष्यानें जर नौकरीच करावी, तर आपल्या देशाच्या कल्याणार्थ खटपट कोण करणार ?

लक्ष्मीबाई—इकडच्या मनांतून जे करायचं असेल तेंच चांगलं, मला काय कळतं खुळीला.

केशवराव---हें असें ह्मणणें सोपें, परंतु तुह्मींच मग आह्माला नांवें ठेवाल ?

लक्ष्मीबाई---तें कां म्हणून ?

केशवराव---कां ह्मणजे ? हें पहा आह्मी कांहीं नौकरी करणार नाहीं. आणि एकदा कां आम्ही तो मार्ग सोडला, म्हणजे मग तुह्मांला कोणी बाईसाहेब म्हणणार नाहींत; तुह्मी बाहेर जायला निघाला कीं तुमच्यापुढें पट्टेवाला चालायचा नाहीं, एखाद्या गरीब भिक्षुकाच्या बाईप्रमाणें रहावें लागेल.

लक्ष्मीबाई---मी खरोखर सांगतें, मला कांहीं नको, इकडच्या मनास जें चांगलें वाटतें, त्यांतच मला सुख वाटेल.

केशवराव---पण हें पहा, मला तूं वेडा म्हणत असशील नाहीं ?

लक्ष्मीबाई---तें कां म्हणून ?

केशवराव---म्हणजे एवढी थोरली परीक्षा देऊन चांगली नौकरी करायची सोडून, वेड्यासारखें भटकत राहणार ह्मणून.

लक्ष्मीबाई---मला तर बाई यांत वेडेपण कांहींच दिसून येत नाहीं.

केशवराव---अस्सं काय ! चांगली सुरेखशी नौकरी सोडून उगीच्या उगीच कांहीं तरी भलभलतें करणाऱ्यास वेडा म्हणू नये तर काय ह्मणावें ? बरें पण तुला माझ्या दादाची माहिती आहे का ?

लक्ष्मीबाई---होय, ते कुठें एकाएकीं नाहींसे झाले ह्मणे, त्यांचा त्या दिवसांपासून कांहींच पत्ता कसा तो लागला नाहीं ?

केशवराव---दादा एकाएकीं नाहींसा झाल्याचें कारण तुला माहीत आहे का ?

लक्ष्मीबाई---तें काय कीं, मला कांहीं बाई माहीत नाहीं. ह्मरी पण लग्न व्हावयाचें होतें, मुलगी मनास आली नाहीं आणि

मामजींचा तर हट्ट पडला कीं तीच मुलगी करावी, असं कांहीं सांगतात. मला खरी गोष्ट कशी माहीत असणार ?

केशवराव—हं हं एकूण, लग्न व्हायचें होतें, मुलगी मनास आली नाहीं, ह्मणून आमचा दादा रुसून गेला काय ? ठीक् ठीक् मीच आपला वेडा. मीही रुसून गेलो असतो ह्मणजे हें असं रूप आमच्या गळीं पडलं नसतं.

लक्ष्मीबाई—आतां काय त्याचं, पदरीं पडलें पवित्र झालें, पण भावोजींची हकीकत तरी काय ? इकडे सर्व माहीत असेलच.

केशवराव—मला देखील सगळ्या गोष्टी चांगल्या माहीत नाहींत. दादाला जाऊन आज बरींच वर्षें झालीं. तो गेला तेव्हां माझी मुंज देखील झाली नव्हती. मुलगी मनास आली नाहीं ह्मणून रुसून जाण्याइतका कांहीं माझा दादा वेडा नव्हता खास. आज चार पांच वर्षांमागें बाबांच्या नांवें त्याचें एक पत्र आलें होतें, त्यावरून त्याचें निघून जाण्याचें कारण असें दिसते कीं, परदेशांत जाऊन कलाकौशल्य शिकून आपल्या देशांतील लोकांस त्या विद्येचा फायदा करून देण्याच्या इराद्यानें तो परदेशी निघून गेला आहे.

लक्ष्मीबाई—परदेशांत जायचें होतें, ह्मणून लग्न करून घ्यायला काय झालें होतें कोण जाणें ?

केशवराव—हो मग आपल्या सारखी एक घोरपड गळीं पडल्यावर मग कसली देशसेवान् काय ?

लक्ष्मीबाई—मग काय आह्मी इकडच्या आड येतों काय ? आह्मी इकडे देशसेवा करूं नका म्हणून सांगतों कीं काय ?

केशवराव—तुह्मी सांगायलाच पाहिजे असें नाहीं. एकदा कां बायकोचें लोढणें गळीं पडलें, ह्मणजें झालें. मग आम्हीं अगदीं गोगलगाय बनतों. मग कसे बसे शिकणें संपवायचें, आणि लागायचें पोटामागें, एवढेंच उरतें.

लक्ष्मीबाई—उगीच्या उगीच आह्माला नांवें ठेवायचीं झालें. एकदा आह्मांस चांगल्या शिकल्या सवरलेल्या केल्यावर आम्ही हरघडी तुमच्या उपयोगीं पडूं. आम्हांस सर्व चांगलें करूं द्या, म्हणजे झालें. आणि इकडे तर मला शिकविण्याबद्दल केवढी खटपट; मी कधीं इकडच्या मर्जीबाहेर जावयाची नाहीं.

केशवराव—पुरें; इतकें आश्वासन पुरे आहे. हिंदुस्थानांतील स्त्रियांस शिक्षण दिल्यास त्या किती योग्यतेच्या होऊं शकतात, हें तुला पाहतां कळून येतें. स्त्रियांस शिक्षण दिल्यास त्या फाजील होतात, वडिलांचा मान ठेवीत नाहींत, नवऱ्यास लेखीत नाहींत, असा त्यांच्यावर उगीच्या उगीच कित्येक गृहस्थ आरोप लादतात; तो किती अस्थानीं आहे, हें तुजवरून कळून येण्यासारखें आहे. तें असो; उद्यां सकाळीं बाबाबरोबर साहेबांकडे तर जातोंच. पण माझा पुढील बेत ठरलेलाच आहे. पण एवढेंच बाबांनां न दुखवितां मला जें करावयाचें तें केलें पाहिजे, बरें आहे, आतां उशीर झाला, उद्यां लवकर उठलें पाहिजे. मी आतां निजतो. (पडदा पडतो.)

प्रवेश पांचवा.

सकाळची वेळ.

स्थळ—जाकसन साहेबांच्या बंगल्याच्या बाहेरील कंपाऊंड—बंगल्याच्या बाहेर इस्मायेल पट्टेवाला पहारा करितो आहे.

इस्मायेल—(आपल्याशींच) ही पट्टेवाल्याची नोकरी फार चांगली, चार पैसे मिळतात. नाहीं तर होतो एक यःकश्चित् शिपाई. कसला पैसा नाहीं कीं अडका नाहीं. आतां कसें? रोज नवीन पैसा. (जर कोणास) साहेबांची भेट घ्यायची असेल तर अगोदर केला पाहिजे आमचा तळीराम गार. आणि या गांवांत आल्या-

पासून तर रोज चालली आहे चंगळ. कितीतरी लोक येतात, एकाची छाती नाहीं मला पैसे देत नाहीं ह्मणून म्हणण्याची. कोणी कां असेना, पैसे तर देत नाहीं ह्मणूंदे, देतो कंपाउंडच्या बाहेर हाकलून. हो पण इकडे ही स्वारी कोण येते. हां शिकारच आली आहे. आतां असें ऐटीत उभे राहिलें पाहिजे (पट्टाबिट्टा सावरून उभा राहतो).

(बाबासाहेब आणि केशवराव येतातः——)

बाबासा०——(पुढें येऊन) साहेब आहेत काय ? (आपल्या नांवाचें कार्ड बाहेर काढून) हें कार्ड साहेबांकडे नेऊन दे.

इस्मायेल——साहेबांनीं कोणास आंत सोडूं नको ह्मणून सांगितलें आहे. आतां साहेब कुणास भेटणारच नाहींत.

बाबासा०——नाहीं रे, हें कार्ड तर तूं आंत नेऊन दे.

इस्मायेल——छे, साहेब आह्माली रागें भरतात, आंत जाण्याची बंदी आहे.

बाबासा०——अरे, तूं आंत जाऊन त्यांना हें कार्ड तरी दे पाहूं.

इस्मायेल——बस् बस्, आंत जाण्याची मनाई आहे, मी कार्ड नेऊन देत नाहीं.

बाबा०——(इस्मायेलच्या अगदीं जवळ जाऊन आपल्या खिशांतून हात काढून त्याच्या हातास लावून) जा, जा देऊन ये कार्ड.

इस्मायेल——(मोठ्या अदबीनें सलाम करून) अच्छा दम बरा; (ह्मणून आंत जातो) (पुन्हा बाहेर येऊन) साहेब बोलावतात, चला आंत (ह्मणून पुन्हा सलाम करतो).

(जाकसनसाहेबांच्या बंगल्यांतील दिवाणखाना. साहेब खुर्चीवर बसले आहेत. पुढें टेबलावर लेखन सामुग्री ठेविली आहे. इतक्यांत बाबासाहेब आणि केशवराव आंत येतात. बाबासाहेब अगदीं लवून सलाम करितात.)

ज्या० साहेब—(बाबासाहेबांकडे पाहून.) Good morning, (गुडमॉर्निंग) आपण येथें असतां हें मला माहीत नाहीं. (इतक्यांत इस्मायेल २ खुर्च्या आणून ठेवितो.) बसा खुर्चीवर. (बाबासाहेब खुर्ची जरा लांब घेऊन बसतात. केशवरावही आपल्या खुर्चीवर बसतात.)

बाबासा०—हो, पेनशन घेतल्यापासून येथेंच आहें.

ज्या० सा०—पेनशन घेऊन आपणांस किती दिवस झाले ?

बाबासा०—येत्या एप्रीलला ४ वर्षे होतात.

ज्या० सा०—आतां आपण कोणता व्यवसाय करितां ?

बाबासा.—व्यवसाय कसचा. पोथीपुराणांत दिवस घालवितो झालें. म्हातारपण आलं दुसरें कोणतेंच काम हातून होत नाहीं. आणखी मला घेऊन काय करायचें ? हा माझा मुलगा.

(केशवराव सलाम करितात.)

ज्या० सा०—Very well; Good morning काय उद्योग करितात ?

बाबासा.—यंदा बी. ए. ची परीक्षा पास झाला. सेकंडक्लासांत नंबर आला.

ज्या. सा.—Very well बाबासाहेब तुमची प्रकृति चांगली सशक्त आहे. कांहीं तरी सार्वजनीक काम कां हातीं घेत नाहीं.

बाबासा०—कसचं ? माझ्याहातून काय होणार; साहेबांची भेट होईल आणि त्यांतल्या त्यांत साहेबांची ओळख यालाही होईल म्हणून येतांना घेऊन आलों.

ज्या० सा०—बरं केलंत. हें पहा तुमच्यासारख्या लोकांना पुष्कळ कामें हातीं घेण्यासारखी असतात. मी पुष्कळ तुमचे लोक पाहिले, जो तो पेनशन घेतल्याबरोबर झालें,आमचं काम आटप-

लें ह्मणून बसतो. मला तर मोठा चमत्कार वाटतो. आमच्या देशांत साठवर्षांच्या पुढें किती तरी वर्षे मनुष्य देशकार्यांत घालवितात.

बाबासा०—छे आह्मी अशक्त लोक. आमच्या हातून हीं कामें होत नाहींत.

ज्या० सा०—हें पहा तुमच्या या जिल्ह्यांत दुष्काळ फार कडक आहे. खरी स्थिति आह्मासारख्या अधिकाऱ्यांनां कळत नाहीं. तुमच्यासारखे लोक जर पुढें येऊन आलेलें संकट दूर करण्यांत सरकारास मदत करतील, तर केवढें तरी काम होईल ! सरकाराचा आणि लोकांचा तुमच्यावर विश्वास असतो. या जिल्ह्यांतील लोकस्थितिचा रिपोर्ट करून, येथें लोकांस शक्य ती मदत करण्याचें सरकारच्या मनांत आहे. तुह्मी या कामीं सरकारास मदत केली पाहिजे.

बाबासा०—जशी साहेबांची मर्जी. [केशवरावाकडे बोट करून] याच्याबद्दल साहेबांकडे विनंती करायची होती.

ज्या० सा०—काय, कसली विनंती ?

बाबासा०—यंदा परीक्षा पास झाली आहे, कोठेंतरी साहेबांच्या आश्रयानें चिकटवून टाकावें ह्मणतो. साहेबांची मजवर मेहेरबानगी आहे. इतके दिवस चाकरी केल्याचें कांहींतरी सार्थक व्हावें अशी इच्छा आहे.

ज्या० सा०—बाबासाहेब, हा अद्यापि लहान दिसतो, याला तुह्मी इंग्लंडला पाठवा. मी त्याची तिकडे चांगली सोय करून देईन.

बाबासा०—मी गरीब; माझ्या हातून हें कसें होणार ? कांहीं नाहीं. साहेबांनीं जर मेहेरबानगी केली, तर येथेंच कोठें तरी एखादी सुरेखशी नौकरी त्याला मिळेल.

ज्या० सा०—तुह्माला पेनशन किती मिळतें ?

बाबासा०—२५० रुपये मिळतात. पण संसार मोठा. कुठें तरी याची सोय झाल्यास चांगलें होईल.

ज्या० सा०—पण या कामांत तुह्मी याचा सल्ला घेतला कां ?

बाबासा०—त्याचा कसला सल्ला घ्यायचा ?

ज्या० सा०—नौकरी करायची आहे त्याला, मग हा कबूल झाला पाहिजे. तुमचें काय म्हणणें आहे केशवराव ?

केशवराव—वडिलांची आज्ञा ह्मणून निरुपायानें मला नौकरी करितां साहेबांकडे यावें लागलें. खरोखर विचाराल तर माझ्या मनांतून नौकरी करणें नाहीं. साहेब, आपण मदत करतो ह्मणतां तर मला इंग्लंड, अमेरिका, वगैरे देशांस जाऊं द्या. त्या देशांतील लोकस्थिति पाहून तेथील कोणती तरी एखादी उपयुक्त कला शिकून येऊन आजन्म आपल्या मातृभूमीची सेवा करावी, असा माझा विचार आहे.

ज्या० सा०—वाटस राइट, असे लोक तुमच्या देशांत फारच थोडे. आमच्या देशांतील तरूण लोकांची हांव अशीच असते. स्वार्थत्याग करून इंग्लंड देशची विमल कीर्ति सर्व जगभर पसरूं; इंग्लंड देशच्या संपत्तीस आपण आपल्या श्रमानें भर पाडूं, जगांतील इतर सर्व देशांपेक्षां इंग्लंड सर्व गुणांनीं अधीक संपन्न आहे, असें व्यक्तिशः श्रम करून सिद्ध करून देऊं; असा आमच्या तरूण लोकांचा निश्चय असतो. अशा लोकांची आमच्या देशांत किती तरी शतकें मालिका लागल्या कारणानें आज आह्मी हा सुदिन पाहतों आहों.

केशवराव—साहेब तुमच्या देशचा इतिहास, व तुमच्या लोकांचें धाडस, सदोदित माझ्या डोळ्यांसमोर असतें.

ज्या० सा०—बाबासाहेब तुमच्या पोटीं रत्न जन्मलें आहे, याला तुह्मी याच्या मनाप्रमाणें करूं द्या. याच्या बुद्धीचा आणि

श्रमाचा फायदा तुमच्या देशास होऊं द्या. माझा एक मुलगा उत्तर ध्रुवाकडे नवीन देश शोधून काढण्याकरितां एक पार्टी जात होती तिजबरोबर गेला आहे. मी बिलकूल त्याच्या इच्छेआड आलों नाहीं.

बाबासा०—साहेबांची मर्जी. पण हा आहे अशक्त. आपल्या लोकांची गोष्टच निराळी.

ज्या० सा०—छे तसें नाहीं, या विषयाबद्दल केशवराव तुमच्याशीं माझ्या मनांत बरेंच बोलावयाचें आहे, आज संध्याकाळीं ४ वाजण्याच्या सुमारास इकडे या बरें. (घड्याळ पाहून) आतां मला काम आहे. (बाबासाहेब आणि केशवराव सलाम करून जातात.)

अंक दुसरा.

प्रवेश पहिला.

स्थळ—नानासाहेबांचा वाडा.

(नानासाहेब, बापुसाहेब, शेखमहमद, जानोजीराव वगैरे मंडळी नानासाहेबांच्या दिवाणखान्यांत बसली आहे.)

नानासा०—बापूसाहेब हा जाकसनसाहेबांचा लखोटा आला आहे, आमच्या जिल्ह्यांत दुष्काळ पडल्याकारणानें लोकांची स्थिति कशी आहे आणि रिलीफ कामें कसलीं उघडावींत, यांचा विचार करून रिपोर्ट करावयाचा आहे, ह्मणून साहेबांनीं कमिटी बोलाविली आहे, व तसें आपणा सगळ्यांस कळविण्यास मला सांगितलें आहे. आज संध्याकाळीं ५ वाजतां तिकडे गेलें पाहिजे.

बापूसा.—परंतु साहेबांकडे जाण्यापूर्वी त्यांना काय काय सांगावयाचें याचा विचार केला पाहिजे ह्मणजे ठीक होईल, काय होय कां नाहीं शेखसाहेब ?

शेखसा.—हो अलबत, ह्मणजे सगळ्यांना बोलायला ठीक पडेल. नाहींतर रावसाहेबांनीं सांगावें दुष्काळ भारी ह्मणून, आणि आह्मीं सांगावें आबादानी ह्मणून, अशा घोंटाळा होण्याचा संभव आहे.

नानासा.—होय, तेंही खरेंच, मग काय काय सांगायचें तें ठरवा.

बापूसा०—रावसाहेब, मी ह्मणतों, आपण अगोदर ह्या साहेबांचें धोरण ओळखावं, ह्मणजे मग कांहीं जड जाणार नाहीं.

जानोजी—हो हो, बापूसाहेबांचें ह्मणणेंही रास्त आहे.

नानासा०—परतु हें कसें होणार ? आपल्याला कांहीं कळत नाहीं बुवा.

बापूसाहेब—त्यांत कांहीं फारसें कठीण नाहीं. साहेबांच्या मनांतून दुष्काळ कामें काढलींच पाहिजेत असें असेल तर आपण सांगून टाकावें त्यांना, कीं या जिल्ह्यांत कडक दुष्काळ पडला आहे, धारण फार महागली आहे, खेड्यापाड्यांतून लोक उपाशीं मरूं लागले आहेत ! आणि असं सांगितल्यानें काय होईल ह्मणतां, तर रयतेबद्दल कळकळ दाखविल्याचें श्रेय आपणास येईल. कदाचित् त्यांच्या मनांतून दुष्काळ कामें सुरू करायचीं नसून आपला आलबेल ह्मणूनच रिपोर्ट करायचा असेल, तर आपण होऊनच त्यांना सांगून टाकावें कीं, इकडे दुष्काळ बिलकुल नाहीं, जरा धारण कडकली आहे, परंतु लवकरच पाऊस होईल, लोकांजवळ पैसा आहे, सरकारांनीं तसदी घेऊं नये ह्मणून; ह्मणजे सरकारची मर्जी खप्पा होणार नाहीं, व साहेबही खूप होतील.

नानासा०—हें सर्व ठीक; परंतु साहेब कांहीं खेडीं स्वतः

पहावयास गेले, तर त्यांना मग सारी खरी स्थिति कळून येईल !

बापूसा०—अहो, साहेब असे किती खेड्यांत जातील ? त्यांना जर स्वतःच चौकशी करावयाची असती, तर ते आपणास कशाला बोलाविते ? आणि त्यांतूनही जर त्यांना दिसून आलेंच, तर त्यांना आपण सांगावें कीं, एकदोन खेड्यांतून मुळीं कांहींच पिकलें नाहीं, हींच एकदोन खेडीं जरा नातवानीस आलेलीं आहेत, बाकी आबादानी आहे.

शेखसा०—हो बरोबर, हेंच खरें वकीलसाहेब.

नानासा.—बघा बुवा, बापूसाहेब, सगळा भार तुमच्यावर आहे. तुह्मी जें बोलाल त्याला आमचा हो आहेच.

बापूसा.—रावसाहेब आपण माझ्यावर द्या सगळं सोंपवून. मग मी पाहून घेतों काय येईल तें. मागें त्या बटरवर्थसाहेबाच्या वेळीं मीं अशीच खुबी करून वेळ मारून नेली. त्या टर्नबुल् साहेबांच्या वेळस मी चेअरमन् होतों. त्या वेळेस वाटर स्कीमचा प्रश्न आला होता, त्या वेळेसही अशीच वकीली लढविली. साहेब बहादूर खूष होऊन गेले आणि म्हणून तर त्यांच्या शिफारशीनें मला रावसाहेब हा किताब मिळाला. त्या बडवुड साहेबांचें केवढें लांबलचक सर्टीफिकेट मजजवळ आहे ह्मणतां ! साहेब लोक ह्मणून जितके येतील तितक्यांच्या कडून मीं सर्टिफिकिटें घेऊन ठेविलीं आहेत.

नानासा०—तें सर्व खरें, परंतु या साहेबांचा कसा विचार आहे हें अगोदर कळलें असतें, तर बरें झालें असतें.

बापूसाहेब—रावसाहेब आपण त्याची काळजी करूं नका, मी सर्व कांहीं करितों त्याची व्यवस्था.

जानोजीराव—साहेब मंडळींचीं मनें वळवावींत बापूसाहेबांनींच.

नानासाहेब—बरें आहे, संध्याकाळीं आपण सगळे इकडेच या आणि आपण सगळे मिळूनच तिकडे जाऊं. मात्र संभाळाहो,

पांच ह्मणजे पांचलाच आपण बंगल्यावर हजर असलं पाहिजे, नाहींतर पांच ह्मणजे सहा वाजले तरी आपले येतातच.

बाकीची मंडळी—बरें आहे. कांहीं हरकत नाहीं. येतों तर (असें ह्मणून नमस्कार करून जातात. पडदा पडतो.)

प्रवेश दुसरा.

ज्याकसन् साहेबाचा बंगला.

(विंटर आणि ज्याकसन् दोघेच खुर्चीवर बसले आहेत.)

विंटर—No Jack, that is not so, we must always keep them at a distance. No one among them is honest. It is a nation of liers.

अरे ज्याक् तसें नव्हे, त्या लोकांस आपण जवळ येऊं देतां कामां नये. त्यांच्यांत एकही प्रामाणिक मनुष्य मिळावयाचा नाहीं. हें शुद्ध खोटें बोलणारांचें राष्ट्र आहे.

ज्याकसन्—You cannot lay down such a broad proposition. I have found among them many fine gentlemen.

तुला असा सरसकट एकच शेरा मारितां यावयाचा नाहीं. त्या लोकांत पुष्कळ चांगले सद्‌गृहस्थ मला आढळून आले आहेत.

विंटर—Oh no, they are a very crafty race. During my tenure of office in the country I have not found one honest and faithful man among them. They do not hesitate to tell a lie, lying is their nature. My Sirastedar tried to deceive me so often but he always found in me a Tartar.

छे: ती अगदी बिलंदर लोकांची जात आहे. मी या देशांत काम करावयास लागल्यापासून मला त्या लोकांत एक देखील प्रामाणिक आणि खरा मनुष्य भेटला नाहीं. ते बेधडक खोटें बोलतात; खोटें बोलणें हा त्याचा उपजतगुणच आहे. माझ्या शिरस्तेदारानें मला कितीदा तरी फसविण्याचा प्रयत्न केला, पण प्रत्येक खेपेस मी त्याला शेरास सव्वाशेर ठरलों.

ज्याकसन्— I admit they have many vices common to snbject races, but English Education is working good change among them.

जित लोकांत आढळून येणारे पुष्कळ दुर्गुण त्या लोकांत आहेत, हें मी कबूल करितों; परंतु इंग्रजी शिक्षणानें त्यांच्यांत बरीच सुधारणा होऊं लागली आहे.

विंटर—In my opinion the Government has made a mistake in introducing English Education in this country.

मला तर वाटतें कीं, इंग्रजी शिक्षण सरकारानें या देशांत सुरू केलें, ही मोठी चूक केली.

ज्याकसन्—No Government can escape its obligation to provide for the best education of its people.

कोणत्याही सरकारास आपल्या प्रजेस सुशिक्षित करण्याची जबाबदारी टाळतां येत नाहीं.

विंटर — A native furnished with English Education cannot make a good servant and if once these people become acquainted with the English literature. I fear there would arise harm to the British domination in this country.

इंग्रजी विद्येंत निष्णात झालेला एतद्देशीय मनुष्य चाकरी करण्यास नालायक ठरतो. आणि जर कां एकदां या लोकांस इंग्रजी वाङ्मयाचें ज्ञान झालें, तर मला वाटतें, मग इंग्रजी राज्यास धक्का पोहोंचेल.

ज्याकसन्— India is a trust in the British hands. Britain shall have to account for its work here before the divine tribunal.

हिंदुस्थानदेश परमेश्वरानें ब्रिटिश लोकांच्या हवालीं केलेली एक ठेव आहे. या देशांत ब्रिटन जें जें काम करील, त्या सर्व कामाबद्दल त्याला परमेश्वरी न्यायासनासमक्ष जबाब द्यावा लागेल.

विंटर—Are you a fool to believe in the divine tribunal? We have conquered India and we may *bleed* it till we have extracted the last drop of blood out of it. India is a pleasure ground for the sons of the middle class of England. If we lose India where will they go?

परमेश्वरी न्यायासनावर विश्वास ठेवण्याइतका कां तूं मूर्ख आहेस? आम्हीं हिंदुस्थानदेश जिंकिला आहे. आणि अगदीं शेवटचा रक्ताचा थेंब नाहींसा होईपर्यंत त्या देशाचें रक्त शोषण करण्यास आम्हांस अधिकार आहे. इंग्लंड देशांतील मध्यम वर्गांतील लोकांच्या मुलांमाणसांच्या सुखासोईसाठीं हिंदुस्थानदेश एक आरामस्थान आहे. हिंदुस्थानदेश आमच्या हातून गेला तर त्यांची काय स्थिति होईल?

ज्याकसन्—It is against the law of nature, that a particular nation should forever rule a particular nation. A day shall come when we shall be forced to leave this land for good. It is by God's favour that

we are brought here to rule over this nation and so we must rule with justice and also with mercy. Posterity should have no scope to blame the British nation for what we may be doing here now.

एका देशानें सदोदित दुसऱ्या देशावर राज्य करावें हें अगदीं सृष्टिनियमाविरुद्ध आहे. असा एक दिवस खात्रीनें येणार आहेच कीं, ज्या दिवशीं आपणास येथून कायमचें चंबू-गबाळें गुंडाळावें लागेल. परमेश्वरी संकल्पानें या देशावर राज्य करण्यास आपण येथें आलों आहों. ह्मणून आपण न्याय आणि दया या दोहींस अनुसरून, राज्यकारभार चालविला पाहिजे. आपण सध्यां येथें जें कांहीं करतों त्याजबद्दल यानंतर जन्मणाऱ्या लोकांना ब्रिटिश राष्ट्रास नांवें ठेवण्यास जागा राहतां कामा नये.

विंटर—(जरा हंसून) You seem to be a strange mean, Jack. Thank God there are not many men like you among us ; otherwise we would not have remained here for many days.

(जरा हंसून) ज्याक् तूं चमत्कारिक मनुष्य दिसतोस. आह्मांमध्यें तुझ्यासारखे पुष्कळ लोक नाहींत याजबद्दल मी परमेश्वराचे आभार मानितों. नाहींतर आपण येथें फार दिवस टिकलों नसतों.

ज्याकसन्—You make a mistake in thinking so. If really we wish to retain our power over this land for many years, we can do so only if we treat them with respect and give them a hand in the Government of their own country. If we go on doing what we are now doing Britain shall have

soon to rue our present system of administration. Indians are a grateful people but we are forcing them to be discontented and ungrateful. (इस्मायेल आंत येऊन सलाम करून एक कागद ज्याकसन् साहेबांच्या हातांत देतो तो वाचून) I have an engagement with some of the native gentlemen of this city. They are waiting outside.

तुह्मी ही चुकीची समजूत आहे. या देशावर आमची राज्यसत्ता फार दिवस टिकावी अशी जर खरोखर आमची इच्छा असेल, तर आह्मीं एतद्देशीय लोकांस मानानें वागविलें पाहिजे. आणि त्यांच्या देशाच्या राज्यकारभारांत त्यांना हात घालूं दिला पाहिजे. आह्मीं हल्लीं जें करितों आहों, तेंच जर पुढें चालू ठेविलें, तर खात्रीनें ब्रिटन देशास हल्लींच्या आपल्या राज्यपद्धतीबद्दल पश्चात्ताप पावावें लागेल. हिंदी लोक खरोखर कृतज्ञ लोक आहेत, परंतु आह्मी त्यांस असंतुष्ट आणि कृतघ्न होण्यास भाग पाडीत आहों.

(इस्मायेल .... तें वाचून).

या शहरच्या कांहीं नेटिव्ह लोकांची मला भेट घ्यावयाची आहे. ते बाहेर आले आहेत.

विंटर--Very well. how long do you mean to stay here?

ठीक आहे. तूं येथें किती दिवस राहणार आहेस?

ज्याकसन्—I cannot say any thing positively at this stage.

आजच मला कांहीं खात्रीनें सांगतां येण्यासारखें नाहीं.

विंटर—I shall see you again. Good evening.

पुनः एकवार तुह्मी भेट घेईन; येतों. गुड् ईव्हिनिंग.

ज्याकसन्—good evening.

गुड् ईव्हिनिंग.

ज्याकसन्---पटेवाला, (इस्मायेल आंत येऊन पुनः सलाम करितो त्यास) बुलाव ओ सब लोकोंकूं. (इस्मायेल बाहेर जातो. नानासाहेब, बापूसाहेब, वगैरे मंडळी येते. सगळे साहेबास लवन सलाम करून बाजूला उभे राहतात.)

ज्याकसन्—Take your chairs. (म्हणून खुर्चीकडे बोट करितो.)

(सर्व मंडळी खुर्चीवर बसते.)

बापूसाहेब—We are certainly very fortunate that your honour has come to our city. साहेबांची स्वारी आमच्या गांवीं आली हें खरोखर आमचें महद्भाग्य.

शेखमहंमद—Yes, yes. म्हणून मान डोलावितो.

ज्याकसन्—I have been ordered by the Government to visit this district personally and to report about the famine in the district. I want also to investigate about the possibility of starting some industry here that would give relief to the famine stricken area. I want your co-operation in the undertaking.

या जिल्ह्यांतील दुष्काळाबद्दल येथपर्यंत येऊन रिपोर्ट करण्याकरितां सरकारचा मला हुकूम झाला आहे. आइया मनांतून दुष्काळग्रस्त लोकांस चांगली मदत होण्यासारखा एखादा उद्योग चालू करण्यासारखा असल्यास पहावें. या कामीं तुमच्या मदतीची जरूर आहे.

बापूसाहेब—We are most humble servants of the Government. We will most willingly obey your orders. आम्ही सरकारचे बंदे गुलाम आहोंत, साहेबांची आज्ञा आम्हांस शिरसावंद्य आहे.

ज्या. साहेब—Is the famine severe in the district? या जिल्ह्यांत दुष्काळ कडक आहे कां ?

नानासाहेब—Not so severe, but a portion of the district is affected. ह्मणण्यासारखा दुष्काळ नाहीं. तरी पण कांहीं भागांत दुष्काळ आहे.

ज्या. साहेब—What about the revenue ? have you collected it all ? साऱ्याबद्दल काय केलेंत ? सगळा वसूल केला काय ?

नानासाहेब--Yes your honour, we have collected almost the whole of it. होय साहेब, बहुतेक वसूल केला आहे.

ज्या. साहेब—I think the Govt. had issued a circular for postponing the collection of the revenue.

मला वाटतें सरकारांनीं सारा तहकुबीबद्दल हूकूम केला होता.

नानासाहेब--Yes your honour ; but there was no necessity in this district for any post-ponement. होय साहेब, परंतु अशाप्रकारें तहकुबी देण्याची गरजच पडली नाहीं.

ज्या. साहेब—It is very strange ! your native papers declare that this is the worst affected district and you say you have collected the whole of the revenue inspite of the Government Circular ! हा मोठा चमत्कार ! तुमचींच नेटीव्ह वर्तमानपत्रें ह्मणतात कीं, ह्या सर्व जिल्ह्यांत दुष्काळ अधिक कडक आहे ह्मणून, आणि तुह्मी ह्मणतां कीं सरकारचा ठराव झाला असतांही सबंध सारा वसूल केला !

बापूसाहेब—Your honour, our nativ papers

are all rubbish. They fill up their columns with something which is not generally true. They take pride in abusing such a benigh Government. साहेब आमचीं देशी वर्तमानपत्रें सारीं घाणेरडीं आहेत. बहुतकरून खोट्या बातमीनेंच तीं आपल्या पत्रांतील कालम भरून टाकितात. अशा उत्तम सरकारास शिव्या देण्यांतच त्यांना पुरुषार्थ वाटतो.

ज्या. साहेब—(आश्चर्यचकित मुद्रेनें) Do you mean to say, then that all the native papers write what is false? मग काय तुमचें ह्मणणें, कीं सर्व देशी वर्तमानपत्रें खोटीच बातमी लिहितात?

बापूसाहेब—Of course. होय अलबत.

ज्या. साहेब—Then there is no necessity of starting any famine work in this district. मग काय या जिल्ह्यांत दुष्काळ काम उघडण्याचें कारणच नाहीं?

बापूसाहेब—Yes your honour. होय साहेब.

ज्या.—Then I shall make a report to the Government that this district is not much affected and there is no necessity of opening any famine relief works and also of any remission or suspension of the revenue collection.

तर मग या जिल्ह्यांत दुष्काळ विशेष नाहीं, आणि दुष्काळ काम चालू करण्याचें, अगर सारा तहकूब करण्याचें अगर अगदींच माफ करण्याचें कारणच नाहीं, ह्मणून मी सरकाराकडे रिपोर्ट करितों.

बापू. सा.—Yes your honour that will save Government's money, and there is no use

in helping ignorant and idle folk like our own. होय साहेब आपण रिपोर्ट केल्यानें सरकारचा पैसा वांचेल आणि आमच्या लोकांसारख्या अज्ञान आणि आळशी लोकांस मदत करण्यांत फायदा नाहीं.

ज्या. सा.—what do these people say? Do they all say "There is no famine in the land?"

ह्या लोकांचें काय ह्मणणें आहे? ते सर्व असें ह्मणतात कां, कीं, येथें दुष्काळ नाहीं?

नानासाहेब—(शेखमहंमद वगैरे मंडळीकडे वळून) साहेब विचारतात या जिल्ह्यांत दुष्काळ वगैरे कांहीं नाहींना?

शेखमहंमद—नाहीं साहेब, इंग्रजी राज्यांत दुष्काळ ठरत नाहीं. सर्व आबादानी आहे साहेब.

ज्या. सा.--(आपल्याशींच) Oh! to what lowest depth of immorality are these people reduced? They do not hesitate to call their own people ignorant and idle. Instead of asking the Government to help their people, they induce it to desist from rendering them any help! (मोठ्यानें) Gentlemen, I am sorry to see before me persons like you, you all seem to me men well-provided. Government regards you as the foremen of your Community. Your words have influence with the Government. Have you no sympathy for your own people? You say your people are ignorant and idle. If so, whose fault is that? Why do you not help them? Not only you do not help them but you come in the way of the Government, sin-

cerely anxious to help them. What personal advantages do you mean to secure by thus advising the Government? You call your papers rubbish and your people idle and ignorant. Are you yourselves honest and true? The sin of British misgovernment here lies upon your head. Look to my mother country, no one dares call bad names to a Briton. No Englishman brookes any affrontry to himself or any one of his land. It is because there is such a vast difference between you and us that a handful of Englishmen rule this land. Is there no place in your breast for the thought of your country and its welfare? Does not your vision extend beyond your wretched self? A people that has such men like you among them need never expect to see better days. I have myself travelled in this district. I have inquired about the famine in the land. Horrible is the famine in the district. They are a silent and a dumb people. They do not know how to approach the Government and if they come to you for help, see what kind of help you can render them. You say there is no famine. Inspite of the Government circular your own officers collected the revenue. You have no sympathy for your suffering people. Gentlemen, I do not want to exchange one word more with you. Go away hence but

remember that no honest man does ever honour one who has no love to spare for his countrymen (असें ह्मणून साहेब आंत जातात).

साहेब—(आपल्याशींच) अरेरे, हे लोक किती नीच आहेत ! आपल्या स्वतःच्या देशबांधवांस अज्ञानी आणि मूर्ख ह्मणण्यास यांना कांहींच वाटत नाहीं. आपल्या लोकांस मदत करण्याकरितां सरकारास विनंती करण्याऐवजीं सरकार जर त्यांस मदत करण्यास उद्युक्त झालें तर हे लोक मदत करण्याविरुद्ध सरकारचें मन वळवितात ! (मोठ्यानें) गृहस्थ हो, तुमच्यासारख्या लोकांस मजपुढें पाहण्यास मला वाईट वाटतें. तुह्मी सर्व खाऊन पिऊन सुखी असाल, असें मला वाटतें. गृहस्थहो, सरकार तुह्मांस तुमच्या समाजाचे पुढारी ह्मणून समजतें. सरकार तुमच्या शब्दांस मान देतें. तुमच्या स्वतःच्या जातभाईबद्दल तुह्माला कळकळ वाटत नाहीं काय ? तुह्मी ह्मणतां तुमचे लोक अज्ञानी आणि आळशी आहेत ह्मणून, पण हा दोष कोणाचा ? तुह्मी त्यांना कां मदत करीत नाहीं ? तुह्मी तर त्यांना मदत करीत नाहींच. पण सरकार जर त्यांना मदत करूं लागलें तर तुह्मी त्याच्या आड येतां. अशा प्रकारें सरकारास सल्ला देण्यानें तुमचा स्वतःचा काय फायदा होईल ह्मणून तुह्मी समजतां ? तुह्मी तुमच्या वर्तमान पत्रांस कुचकामाचीं पत्रें ह्मणतां. आपल्या लोकांस अज्ञानी आणि आळशी ह्मणतां, पण तुह्मी स्वतः प्रामाणिक आणि खरे लोक आहांत कां ? या देशांतील वाईट राज्यकारभाराचें पाप तुमच्या माथीं आहे. माझ्या मातृभूमीकडे पहा, कोणीही ब्रिटन देशांत जन्म घेतलेल्या मनुष्यास नांवें ठेवण्यास धजत नाहीं. स्वतःसंबंधीं अगर आपल्या देशबांधवांसंबंधीं उद्दामपणाचें वर्तन कोणाही इंग्रज मनुष्यास खपावयाचें नाहीं. तुह्मा लोकांमध्यें आणि आह्मांमध्यें अशा प्रकारें

महदंतर असल्या कारणानें तर आह्मी मूठभर इंग्रज लोक तुमच्या देशावर राज्य करतों. तुमच्या देशाच्या कल्याणाची इच्छा तुमच्या हृदयीं वसत नाहीं काय? ज्या देशांत तुह्मी जन्मलां त्या देशाबद्दल तुह्मी कधीं तरी विचार केला आहे काय ! आपले क्षुद्र जीवित्वाशिवाय तुमच्या डोळ्यांस कांहींच दिसत नाहीं काय? ज्या लोकांत तुमच्यासारखे लोक आहेत त्यांनीं सुदिन पाहण्याची इच्छा करण्याची गरजच नाहीं. मी स्वत: या जिल्ह्यांत फिरलों आहे, देशांतील दुष्काळाबद्दल मी विचारपूस केली आहे. देशांत भयंकर दुष्काळ पसरला आहे. जनसमुदाय शांत आणि मुका आहे. सरकारापर्यंत मजल कशी पोंहचवावी हें त्यांना कळत नाहीं, आणि तुमची मदत मागण्यास ते आले, तर पहा तुह्मी कसली मदत त्यांना करितां ? तुह्मी ह्मणतां देशांत दुष्काळ नाहीं. सरकारी हुकूम झाला असतांही तुमचे कामगार लोक रयतेकडून सारा वसूल करितात ! तुमच्या दरिद्री लोकांबद्दल तुह्माला कळकळ वाटत नाहीं. गृहस्थहो, तुमच्याशीं अधिक बोलण्याची माझी इच्छा नाहीं. येथून तुह्मी चालते व्हा, परंतु हें मात्र लक्षांत ठेवा कीं, कोणताही प्रामाणिक मनुष्य स्वदेशप्रीतिशून्य मनुष्यास कधींही मान देणार नाहीं.

नानासाहेब—बापूसाहेब, हें काय झालें? करायला गेलों एक आणि भलतीच गोष्ट झाली. हा तुमच्या भाषणाचा परिणाम.

बापूसा०—छे: मी आणतों साहेबाला वठणीस.

जानोजीराव—अहो झालें काय ? साहेब असें रागावून कां गेले?

बापूसा०—चला जाऊं, मी सांगतों आतां पुढें काय करायचें तें. सर्व वाटेंत बोलूं. (सारेजण हळू हळू निघून जातात.)

प्रवेश तिसरा.

स्थळ–दारूचा गुत्ता.

सदोबा—(एकटाच)–छे नको बुवा ही गुत्त्यांतली चाकरी! आपल्या हातानें किती जणांना दारू पाजायची? हे लेकाचे दिवसभर राब राब राबतात, आणि आणून ओततात पैसे या दारूच्या पिपांत. छे छे, कसलें व्यसन हें? जवळचा पैसा-अडका चट सारा निघून जातो. खायला नाहीं, अंगावर चिंधी नाहीं, अशी स्थिति होते, तरी आपली संध्याकाळची गुत्त्याची खेप यांची चुकत नाहीं. घरीं बायकापोरें उपाशीं मरतात, आणि हे लोक येथें येऊन दारू पितात! आणि सगळ्यांत गम्मत ही कीं, किती जरी पैसा मागितला तरी मुकाट्यानें हातावर ठेवितात! पुन्हां व्यापार सगळा रोखचोख. खरोखर आमच्या शेटजींची चैन. (इतक्यांत अरे सदोबा, सदोबा, अशा हाका मारीत महादबा येतो, आणि त्याच्या पाठोपाठ इस्मायेल येतो. सदोबा बाजूला जातो.)

महादबा—अरे सदोबा, हे बघ आज खूप दारू पाजली पाहिजे, आज चैन करायची इच्यामारी. आज आतांच्या आतां दोन रुपये मिळविले. हे बघ, अरे इस्माएल, आज आला एक कुणबट साहेबांकडे अर्ज द्यायला; असा बंगल्याच्या दारापाशीं येतो तोंच त्याला दिला एक टोमणा ठेवून. हो या लेकाच्यांना असे टोमणे दिले नाहींत, तर कां हे आपणाला पैसे देतात? तो ह्मणूं लागला, साहेबांच्या पुढें नेऊन अर्ज द्यायचा आहे. लेकाचा लागला पायां पडायला. २ रुपये दिलेस तर अर्ज नेऊन देतों, ह्मणून सांगून स्वस्थ उभा राहिलों. लेकाचा लागला गयावया करायला. दिला आणखी एक धक्का. मग काय? आले दोन रुपये. मग नेऊन दिला कागद साहेबांजवळ.

अरे सदोबा, आण लवकर एक बाटली. आज चैन करायची, दोन्ही रुपये चैनीत खर्चणार?

इस्माएल—अबे सदोबा लाव इदरबी एक बाटली. हे बघ ह्यादबा, आमचा हा साब लइ चांगला. (इतक्यांत सदोबा दोन बाटल्या भरून घेऊन दोघांच्या हातांत देतो. दोघेही बाटली घेऊन जवळच्या बाकांवर बसून पितात.)

ह्यादबा—(थोड्या वेळानंतर) अहारे मेरी प्यार दारू. क्या साब कैशी मजा है. माझे दोन रुपये हे असे फेंकून देतों या दारूपुढें! (२ रुपये सदोबाकडे फेंकून देतो.)

इस्माएल—ह्यादबा रुपयेकी क्या बात! हें बघ आमची रोज चंगळ, कोणीकां येईना बंगल्याच्या दाराशीं, कीं घेतला पैसा. साहेबाची किल्ली आमच्याजवळ. साहेबाची भेट घ्यायची कीं या इस्माएल साहेबाला रोख पैसा दिला पाहिजे. ये ह्यादबा आज तूं दोन रुपये खर्चणार काय? मी पांच रुपये खर्चणार! (खिशांतले पांच रुपये काढून सदोबाकडे टाकतो) अरे सदोबा और दो बाटली लाव. जलदी करो.

(सदोबा जाऊन ताबडतोब दोन बाटल्या भरून आणतो.)

इस्मायेल—(त्यांपैकीं एक घेऊन ह्यादबाच्या पुढें करून) लेव जमादार साहेब लेव. इसमें जादू है. लेव तो सई.

(इतक्यांत हनमंता येऊन बाजूला इस्मायलला लागून बाकावर बसतो)

इस्मायेल—(त्यास लाथ मारून) सुवर, हमारे साथ बैठेंगे. या गाढवांना अक्कल नाहीं मी कोण आहे मालूम नाहीं? ज्याकसन साबका पट्टेवाला. अदबानें वागणें माहीतच नाहीं या लोकांनां? चलो दूर (म्हणून पुन्हां त्याला एक लाथ मारतो,)

हनमंता—नाहीं जमादारसाहेब चूक झाली, (म्हणून बाजूला बसतो)

ह्यादबा—(बाटली हातांत धरून) ए देखो जमादार साब. ए बाटली बहोत अच्छा हाय. होयना रे सदोबा? आणखी

एक बाटली आण. (सदोबा होयं ह्मणून आणखी बाटली आणून देतो.)

इस्माएल—अरे, ह्मादबा काल लइ मजा झाली. तो ह्मातारा पेनशनर आहे कीं नाइ, त्याला घ्यायची होती आमच्या साहेबाची भेट. लेकाचा कध्धी खुषी देत नाहीं; त्याला धरला अडवून काल. आपली चिठ्ठी नेऊन साहेबाला दे ह्मणूनं सांगितलं ह्मातान्यानीं. मी साफ देत नाहीं ह्मणून सांगितल्यावर, हळूच रुपया काढून ठेवला हातांत. खरोखर चैन आमची.

ह्मादबा—(दारूच्या निशातच मान हालवीत) चैन. चैन.

अहारे काय मजा दारूची ॥
वाहवा मजा ही दारूची ॥
बाटली लेना पैसा देना ॥
रुपियाकी फिर देनाजी ॥
दारू पिउनि चैन कराजी ॥
दिवस जाईल फुकाचि ॥

हे बघ इस्मायेल, दारू जो पीत नाहीं त्याला अकलच नाहीं. हे बघ, या दारूंत तर कसली जादू भरली आहे. एक तर दारू पिऊन मजा वाटते. (हावभाव करीत फिरतो.) आपल्या शरीरांत डोकं मुख्य नां? या डोक्यांत एकदां का दारूची धुंदी शिरली, कीं बस् लागलें यंत्र फिरायला. जीभ लागते बडबडायला, डोळे झालेच लालेलाल, सबंध आंग लागतं हलायला, मग काय चालला चैनांत झुलत झुलत! पाय जाग्यावर ठरायचे नाहींत, हाताची एकसारखी चळवळ चालू असते. मग येते स्वारी रंगांत! हे बघ इस्माएल, मला एक सोडून हजार जरीं पोरं झालीं, तरी आपण अगादरं त्या सगळ्यांना शिकविणार प्यायला दारू. दारूवांचून गोष्ट

नाहीं, उठतां बसतां पीणार बी दारू, और पाजणार बी दारू. क्या राव कैसी मजा है.

इस्मायेल---(आभाळाकडे घाबऱ्या घाबऱ्या पहात आपलें डोकें घट्ट धरून एकदम् ओरडून) झादवा डोकं घट्ट धर, धर, लेका तें बघ आभाळ डोक्यावर पडतंय, आभाळ पडलं, पडलं! (ह्मणत बाकावरून उठून आभाळ सावरावयास जातां जातां पडतो.)

झादवा---(उठून त्याला उठवायला जातो) निजलां काय जमादार साहेब, काय राव उठा उठा तरी! चैन आहे चैन! (ह्मणत उठवायला जाऊन आपणही पडतो.)

सदोबा---(पुढें येऊन) लेकांच्याचा चालला आहे हा रोजचा धिंगाणा. काय चैन ही! तुमची चैन कां आमच्या शेटजींची! लेंकानो तिकडे तसे पैसे उपटतां आणि सारे पैसे आणून देतां आमच्याजवळ. घरीं जाईतोंपर्यंत एक दिडकी खिशांत राहील तर शपथ. लेकांचीं बायका पोरें मरतात उपाशीं, आणि हे येऊन येथें चैन मारतात!

(इतक्यांत अल्ली, इस्मायेलचा मुलगा, भीत भीत येतो.)

अल्ली---सदोबा आमचा बाबा आला आहे कां?

सदोबा---तो बघ तिकडे दारू पिऊन पडला आहे.

अल्ली---(इस्मायेलकडे जाऊन त्याला उठवितो) बाबा, घरीं तो मारवाड्याचा मनुष्य येऊन बसला आहे, आज पैसे दिल्यावांचून जात नाहीं ह्मणतो. आईनें फार सांगितलें, तरी ऐकत नाहीं. आज आह्माला सकाळपासून कांहीं खायलाच नाहीं. महमद तर रडायला लागला आहे आणि आईही रडते.

इस्मायेल---(उठून त्याला लाथ मारतो) चुप्, निकलो इदरसे! सदोबा या कारट्याला कां इकडे येऊं दिलास? नीघ ह्मणून त्याला पुन्हां एक थप्पड मारतो.

अल्ली—(रडत रडत) बाबा तो शिपाई.

इस्मायेल—शिपाईबिपाई कुच्नइ, चलो (पुन्हां एक थपड मारतो)

झादबा—काय, नाईकसाब असं मारतां काय, राव चला जाऊं घराकडे. (सगळे जायला निघतात.)

पडदा पडतो.

प्रवेश चवथा.

स्थळ—पानखेड्यातील हरीबा साळ्याचें घर.

(आपल्या घरांतील ओसरीवर एका खाटेवर हरीबा आपल्या आंथरुणावर बसला आहे.)

हरीबा—(आपल्याशींच) हरहर! काय प्रसंग हा! पावसावांचून अशीं वर्षानुवर्षें गेलीं तर आह्मा लोकांची काय स्थिति होईल? गांवांतील बहुतेक लोक पोटास मिळेल तिकडे निघून गेले. माझी काय वाट? हा आजार मला सोडीत नाहीं. दिवसानुदिवस मी असाच खंगत जाणार. माझी या आजारापासून सुटका होईल अशी आशा नाहीं. माझें कांहीं बरें वाईट झालें तर माझ्या बायकापोरांची काय स्थिति होईल? त्यांना कोणाचाच आधार नाहीं. त्यांच्या पोटाची काय वाट? परमेश्वरा, मला या दुखण्यांतून वाचीव, मी यांतून वांचलों तर हरप्रयत्न करून त्यांच्या पोटास घालीन. अरेरे! माझ्या लहानपणीं माझ्या घरांत किती तरी माग होते. आमचा केवढा व्यापार होता, माझ्या घरीं गुरेंढोरें किती होतीं! माझ्या घरीं धान्याचीं कोठारें भरलेलीं असत. पण आतां घरांत काय आहे? जागजागीं पडलेल्या भिंती बांधविणें सुद्धां माझ्या हातून होत नाहीं. ते जुने माग मोडून एका कोपऱ्यांत पडले आहेत! आतां कुठला व्यापार, कुठलीं गुरें आणि कसचें धान्य! उद्यांची

भ्रांत, अशी वेळ येऊन ठेपली ! अरे देवा, आतां काय करूं ! दिवस हे असे आणि माझा आजार तर मला सोडीत नाहीं. (जरा थांबून) छेः मी कसचा यांतून वांचतों. माझी बायको, माझा मुलगा, माझ्यामागून उपाशीं मरणार, हेंच खास. (आंग मोडून) आयाईग, मला असं बसवत देखील नाहीं. हुःश (मागें पडतो आणि त्यास ग्लानी येते.)

(कांहीं वेळानें रखुमा येते.)

रखुमा—(हरीबाचे आंगावर हात ठेवून, त्याच्या आंगावरील पांघरूण सावरून) आंग बरेंच तापलें आहे, किंचित् डोळा लागला आहे वाटतें. आतां हा ताप कधीं थांबणार ? यांना आतां औषध कोणतें देऊं ? अन्न तर अगदींच जात नाहीं. तोंडास रुची येण्यास कांहींतरी करून घालीन म्हटल्यास घरांत काय आहे ! या दिवसांत उसनवार तरी कोण देतो ! माझ्या अंगावर होतें नव्हतें तें मोडून आजपर्यंत कसेबसे दिवस घालविले. आतां काय करूं ?

(मधेंच हरीबा तापाच्या भरांत बरळतो) छेः असंच होणार ! त्यांची धडगत दिसत नाहीं. राम राम !

रखुमा—(घाबरून) काय हे बडबडताहेत वाटतें. देवा यांचा ताप कसा थांबेल ? आई जगदंबे यांना तापांतून नीट उठूंदे, मी तुझी ओटी भरीन. कपाळकरंटी मी मेलें तरी हरकत नाहीं. पण माझं आयुष्य यांना दे.

हरीबा—(पुनः बरळतो) त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था झाली कीं पुरे.

रखुमा—(हरीबाला हळूंच हालवून) असं काय करतां, हें पहा आंगावर चांगलें पांघरूण असूद्या. असं आंग उघडं टाकलं तर कसं होईल ? कांहीं खायला आणूं कां ? आतां थोडीशी भूक लागली असेल.

हरीबा—आलीस कां ? जगू कोठें आहे ? अग तूं जेवलीस कां ? आज कांहीं जेवायला होतं कां ? कायग माझं कांहीं वाईट झालं तर पुढें काय ? तुला कुणाचा आधार नाहीं. तुला निराश्रित रहावें लागेल.

रखुमा--(डोळ्यांत पाणी आणून) असं म्हणूं नये. असं भलतं-सलतं मनांत देखील आणूं नये, कांहीं खायला आणूं कां ?

हरीबा--नाहींग, सहज वाटलं तें बोललों. पण असं कांहींतरी वाईट झालं तर तुझी काय अवस्था होणार ? घरांत एक कवडी देखील नाहीं. बाहेर भयंकर दुष्काळ. लोकांना कुणीना कुणी तरी असतं, पण तुला कुणीच धीर देणारें माणूस नाहीं. देवा, माझ्या बायकोवर असला प्रसंग आणूं नकोरे !

रखुमा—हें काय आपण बोलतां ! आपलं दुखणं लवकरच बरं होईल. मग आपण कुठं तरी जाऊन पोट भरूं. असा आपणच धीर सोडलात तर मी बायकोमाणूस काय करूं ?

हरीबा--छे, मी उगीच काहींतरी म्हणतों झालें. पण जगू कुठें आहे ?

रखुमा—बाहेर खेळतो आहे.

हरीबा—त्या गुलामाला कसची काळजी. मी असा पडून राहिल्यापासून माझ्याजवळच येईनासा झाला आहे.

(इतक्यांत जगू येतो.)

जगू—आई, मला भूक लागली, मला खायाला दे. बाबा मला टोपी आणून देशील ? त्या सदूची टोपी कशी नवी आहे. मला एक टोपी पाहिजे.

हरीबा—बाळ इकडे ये. (जगू हरीबाजवळ जाऊन बाजेवर त्याच्याजवळ बसतो.)

हरीबा.—काय रे जगू, मी गेलों म्हणजे तिला असाच तूं त्रास देणार काय ? कायग, ह्या पोराच्या नशीबीं काय असेल ? त्याच्या नशीबीं बापाचें सुख आहे कीं नाहीं कोण जाणे !

रखुमा.—हें काय असं, भलतंच बोलाल तर पोर घाबरून जाईल.

हरीबा.—देवा, या माझ्या बाळाला आणि या माझ्या सद्गुणी बायकोला मी तुझ्या हवालीं करतों. मला तर तूं नेणार; यांना या जगांत तुझ्यावांचून दुसऱ्या कोणाचाच आधार नाहीं. निराश्रितांचा आश्रयदाता, अनाथाचा कैवारी असा तूं, या माझ्या निराश्रित अनाथ बायकापोरांचें संरक्षण कर.

(इतक्यांत संताजी पाटील येतो त्यास).

या, पाटील या, असे बसा, (ह्मणून आपण उठून बसतो.)

पाटील—कसं काय हरीबा ? प्रकृती कशी आहे? (हरीबाचे आंग धरून पाहतों) ताप आहे. हरीबा, गांवांतून माणसं तर भराभर निघून जायला लागलीं, आणि तूं तर निजून राहिलास, आतां पुढली काय वाट ?

हरीबा—(डोळ्यांत पाणी आणून) पाटील मलाही तीच काळजी लागून राहिली आहे. मी यांतून वांचेन काय हो ? माझ्या बायकापोरांचे अन्नावाचून फार हाल होताहेत तें मला पाहवत नाहीं. पण पाटील तुह्मीं काय करणार ?

पाटील—मी काय एकटा भणंग भिकारी आहे. कोठें तरी जाऊन पोट भरीन ह्मणतों. या शहराजवळ सरकारांनीं गरीब लोकांकरितां कामगिरी सुरू केली आहे ह्मणे. तेथें आपल्या गांवचे कांहीं लोक गेले आहेत. मीही तेथेंच जावें ह्मणतों.

हरीबा—पाटील, मी तुमच्याबरोबर येतों, दोन दिवस जाऊंद्या, माझ्या आंगांत अमळ बरें वाटतांक्षणींच मीहि येतों. आतां येथें राहून आमची घडगत नाहीं.

जगू—बाबा मीहि तुझ्याबरोबर येतों.

रखुमा.—पण हा ताप लवकर थांबला पाहिजेना ? ह्या अशा तापांत तेथें जाऊन काय करावं ? पण काय हो पाटील, तेथें यांच्याबद्दल मीच सारं काम करतें ह्मटल्यास सरकार ऐकेल काहो ? तेथें गेलें ह्मणजे औषधपाण्याची तरी सोय होईल.

(डोळ्यांत पाणी आणून) कांहीं तरी औषध देईन म्हणतें, पण जवळ एक फुटकी कवडी देखील नाहीं.

हरीबा.—पाटील आम्हाला सोडून मात्र जाऊं नका. मी आता लवकर बरा होईन. तेथें गेल्यास माझ्या बाळाला (जगूच्या आंगावर हात फिरवून) पोटभर खायला तरी मिळेल.

जगू—बाबा, मग तेथें गेल्यावर टोपी घेऊन देशीलना?

हरीबा.—कांय हो पाटील, तेथें गेल्यावर रहायचं कुठें? काम तरी कसलं करावं लागेल? खायला तरी पोटभर मिळेल कां?

पाटील—हो तर, सरकारांनीं सगळी व्यवस्था केली आहे. आमच्याकडून होईल तेवढेंच काम करायचें. आम्हाला रहायला झोंपड्या देतात तेथें रहायचं. बायकांना बायकांच्या योग्य तेंच काम सांगतात. तेथें औषधपाण्याची देखील सरकारांनीं व्यवस्था केली आहे, असं ऐकतों. हरीबा तेथेंच चल, तुझी सगळी व्यवस्था होईल.

हरीबा—मग पाटील तुह्मी सांगाल तेव्हां निघायला मी कबूल. आमच्या पोटापाण्याची व्यवस्था करून औषधपाण्याची देखील सरकारांनीं व्यवस्था केली आहे; खरोखर मोठ्या पुण्याईचं सरकार—(पुनः आंग मोडून) आयाई मला बसवत नाहीं, पाटील मी निजतों.

पाटील.—बरं आहे. मीही पण आतां येतों. हरीबा तुला अंमळ बरं वाटलं कीं आपण सगळे मिळून तेथें जाऊं बरं. तूं कांहीं काळजी करूं नकोस, येतों तर आतां. (पाटील जातो.)

(पडदा पडतो.)

प्रवेश ५ वा.

दुष्काळ कामगिरींतील कचेरीची जागा.

(कृष्णाजीपंत कारकून एकटाच आपल्या खुर्चीवर बसला आहे. पुढें कांहीं कागद, लेखण्या आणि दौत टेबलावर ठेविलीं आहेत. हातांत चंची अर्धी सोडलेली तशीच आहे.)

कृष्णाजीपंत—(विडा खाऊन तंबाखूची एक चिमटी आपल्या तोंडांत टाकून) अरे रामा, ए रामजी, हा शिंचा कामावर कुठें हजर असतो? या कामगिरीवर याची नेमणूक झाल्या दिवसापासून लेंकाची चालली आहे कृष्णक्रीडा. आतां एका झोंपडींत, तर घटकेस गेला दुसऱ्या झोंपडींत? चार दिवस करून घेतो आहे चैन. पाहूं हा आहे तरी कुठें. (जरा बाजूला जाऊन पुन्हां हाक मारतो)

रामजी—(लगबगीनें येऊन) काय रावसाहेब कसल्या वेळेला हाक मारतां! एक असं मापूक पात्र आलं आहे ह्मणतां कीं तुमच्या तोंडास पाणीच सुटेल.

कृष्णा०—अरे कोण रे कोण?

राम०—एक १८-२० वर्षांची ऐन रंगांतली!

कृष्णा०—रामा, हें पहा नांव मात्र आतांच दाखल करायचं नाहीं बरं कां. आज आलेलीं सारीं माणसें इकडे घेऊन ये.

राम०—बरं आहे. आज चैन आहे. घेऊन येतों सर्वांनाच इकडे.

कृष्णाजीपंत—(एकटाच) खरोखर दुष्काळाचे दिवस आले कीं झाला आमचा सुकाळ. रोज नवा पैसा दृष्टीस पडायचाच. आणखी पुन्हा महिन्याच्या कांठीं पगारांत जास्ती कमी करून

पैसा ओढायचा तो निराळाच. पण पैसे राहिले एका बाजूला. हीं अशीं पांखरं येऊन पडतात जाळ्यांत. या राम्याची आमच्यावर कडी. एकादें पांखरू आलें आणि यानें झडप घातली नाहीं, असं व्हायचं नाहीं; परंतु थांब लेका, येथें मात्र तुझा गमजा चालूं देत नाहीं. हो पण, याला जर राजी ठेवला नाहीं, तर सगळ्याच गोष्टी फसून जातील. आमचा कामाचा रंग कसा अगदीं चोख, आमची डायरी, आमचा क्याटलाग, आमचे कागदपत्र अगदीं शुद्ध आंखून तयार. एकादा साहेब आज तपासणीस येतो, असें कळलें कीं पुरे, आमची तयारी कडेकोट, झाडून सवरून गारेगार करायचेंच; चार खुर्च्या आणि टेबलें आणलींच कुठून तरी पैदा करून आणि साहेबांना खुर्चीवर बसवून त्यांच्यापुढें लांबच्या लांब एक स्तुतिमंत्र ह्मणून एक सुरेख फुलांची माळ त्यांच्या गळ्यांत घातली, कीं बस्स् आलाच साहेबांचा शेरा—

"Relief works very well managed, clerk extremely deligent, honest and painstaking. People contented."

असे कितीतरी शेरे या बहादराजवळ आहेत. आतां आमच्या प्रमोशनला कांहीं उशीर नाहीं. स्पेशल मामलत मिळायाचीच. परंतु हा लेकाचा गेला कुठें ? हा अद्याप कां आला नाहीं ? जरा वाट तर पाहूं ! (ह्मणून उगीच बसतो.)

इतक्यांत रामजी दोन पुरुष, एक बाई आणि एक लहान मूल अशा चार इसमांस घेऊन येतो.

रामजी०—(सलाम करून एकेकाकडे बोट करून) साहेब, हा पानखेडचा पाटील, हा तेथलाच राहणारा. ही बाईही त्याच खेड्याची. हा तिचा मुलगा.

कृष्णाजीपंत—(पहिल्या इसमास) कायरे तुझें नांव काय ? आलास कुठून ? तुझा धंदा काय ? सर्व नीट सांग.

१ ला मनुष्य—रावसाहेब मी पानखेड्याचा पाटील. माझा धंदा कसला कपाळाचा. होतीं चार शेतं तीं सारीं निघून गेलीं. घरांत चार गुरंढोरें होतीं तीं सर्व विकून आजपर्यंत कसा तरी गुजराणा केला. पूर्वीपासून आमच्या नशीबीं धंदा नसल्यामुळें शेतीवरच गुजराणा करून होतो, तो असा दुष्काळ ! गेल्या प्लेगांत सारी घरची मंडळी मरून गेली. तेव्हां एकटाच होतों. पण एकाचेंही पोट भरेना ह्मणून सरकाराकडे आलों रावसाहेब.

कृष्णाजी०—अरे किती वटवट लावली आहेस. रामजी यांला त्या पलीकडच्यां रांगेंतील ५ वी खोली दाखीव. जा तुला तेथें राहिलें पाहिजे, रोज तुला ५ पैसे वेतन मिळेल आणि जर कां एकादे दिवशीं कामावर हजर राहण्यास चुकलास तर वेतन तर मिळावयाचें नाहींच; पण आणखी दंड द्यावा लागेल समजलास ?

१ ला मनुष्य—जी समजलों.

(रामजी त्याचा हात धरून त्याला बाजूस उभा करितो.)

कृष्णाजीपंत—(दुसऱ्या मनुष्यास) तूं कुठला ? तुझं काय ह्मणणं ?

२ रा मनुष्य—रावसाहेब मी लिंबगांवचा कोष्टी. माझा धंदा कोष्टयाचा. सगळा व्यापार बसून गेला. धंदा चालेना. घरांत बरेच नग पडून राहिले आहेत; तरी आपला वाडवडिलांनीं केलेला धंदा आपण सोडूं नये ह्मणून आजपर्यंत तोच धंदा करीत आलों. पण यंदां तर भयंकर दुष्काळ. मी, बायको आणि पोर आम्ही तिघें माणसें. संसार चालेना. मधून मधून उपास काढण्याचा प्रसंग आला तरी आपला घरींच होतों; पण आतां निभाव बिलकूल लागणार नाहीं, ह्मणून आलों बायको-मुलाला घेऊन येथें.

रामजी—साहेब, हा मनुष्य लुच्चा दिसतो. यानें दुसऱ्या कुणाची तरी ही बाई पळवून आणिली आहे. असे लोक लबाड असतात. साहेब यांचा विचार केला पाहिजे.

२ रा मनुष्य—रावसाहेब असें कसें होईल ? काय भलताच संशय हा ! रावसाहेब, ही माझी लग्नाची बायको आणि हें माझें पोर.

कृष्णाजीपंत—(त्या बाईकडे वळून डोळे मिचकावीत) काय बाई तुझें काय ह्मणणें आहे.

बाई—हे काय खोटं सांगतील काय ? गेल्या जन्मीं काय पातक केलं होतं, ह्मणून आज उपाशी मरण्याचा प्रसंग आला. आणि आतां आमच्यावर भलताच आरोप घालून आमची बेअब्रू करूं नका. पोराच्या पोटाची व्यवस्था झाली ह्मणजे कांहीं नको. तिकडेही अलीकडे फार खंगले आहेत. रोज दोघांच्या बदलीं मीच काम करतें. त्यांना नाहीं नाहीं तें बालून त्यांच्या जिवास त्रास देऊं नका.

कृष्णाजीपंत—यांच्या बोलण्या चालण्यावरून संशय येतो खास.

१ ला मनुष्य—रावसाहेब असा भलता संशय घेऊं नका.

कृष्णाजीपंत—बरं आहे तूं आमची खात्री करून देई तोंपर्यंत तुह्मां दोघांना आह्मी निरनिराळ्या झोंपडींत ठेवून तुमच्यावर नजर ठेवणार.

दुसरा मनुष्य—साहेब, आतां आपली खात्री कशी करायची ?

रामजी—हो, हो खात्री कशी करायची ह्मणून विचारितो ! नवरा बायको असल्यास खात्री करून देतां येत नाहीं काय ?

कृष्णाजीपंत—हें पहा, तुझ्या गांवच्या पाटलाकडून दाखला आण ह्मणजे झालें.

मनुष्य—रावसाहेब गांव फार लांब आहे. मी असा थकून भागून आलों आहे, १।२ दिवसांनीं आणीन.

कृष्णाजीपंत—बरं आहे. रामजी याच्याकडून दाखला येई तों-पर्यंत या दोघांना एका झोंपडींत ठेवायचें नाहीं बरं कां. आणखी यांच्यावरच्या मुकादमास सांगून ठेव यांच्यावर नजर ठेवायला. आणि तुझीही नजर असूंदे. जा यांना घेऊन.

बाई—रावसाहेब, ते फार आजारी आहेत त्यांच्याजवळ मला राहूंद्या. त्यांना रात्रीचा ताप फार येतो मी जवळ असलें ह्मणजे औषध पाणी देईन. असें आह्मांस निरनिराळें ठेवूं नका, असा अन्याय करूं नका.

कृष्णाजीपंत.—(आपल्याशींच.) ओहोरे रूप ! काय मोहक चेहरा हा ! रूप असावें तर असेंच ! या कुणबटाच्या पदरीं हें असें रत्न ! हा लेकाचा कसा अगदीं सुदाम आहे. देवाला अकल नाहीं ह्मणतात तें खोटें नाहीं. याला अंगांत घालायला एक चिंधी नाहीं पण बायको ही अशी (तिच्याकडे निरखून पाहून) इचे सर्व अवयव कसे अगदीं रेखाटून तयार केलेले आहेत लाखांत एक बायको आहे. हें असलें रत्न हातचें घालवितां कामां नये. या कुणबटाची वाट लाविली ह्मणजे आपोआप हें काम साधेल. (उघड) बरं आहे; पण बाई, तुझें नांव काय ?

बाई०—माझें नांव रखुमा.

कृष्णाजीपंत—(आपल्याशींच) हां आतां हें खास जुळलें; ही रुक्मिणी आणि मी कृष्ण आहेंच. देवाच्या मनांतच हें फळ आह्मांस चाखायला मिळावें असें असल्यासारखें झालें. (उघड) हें पहा सरकारचा असा नियम आहे कीं या ठिकाणीं जीं माणसें येतात त्यांची नीट विचारपूस करून ते कोण कोठले याची पक्की चौकशी करून मग त्यांना कामावर दाखल करून घ्यावें. आणि असे कांहीं लबाड लोक दुसऱ्यांच्या बायका पळवून आणून येथें राहण्याचा संभव आहे. तसें कांहीं येथें घडूं नये ह्मणून आम्हांस खबरदारी घेतली

पाहिजे. हें न्यायी इंग्रज सरकारचें राज्य आहे, त्यांत कसलाच अन्याय होणार नाहीं समजलीस ? त्याला गेलेंच पाहिजे. त्या मनुष्यास) अरे तूं ४ दिवसांच्या आंत तुझ्या गांवच्या पाटला-कडून चिठी आणिली नाहींस, तर तुला पोलिसाच्या ताब्यांत दिला जाईल समजलास ?

मनुष्य—रावसाहेब येथून आमचें गांव बरेंच लांब आहे. मी असा आजारी, माझ्याकडून चालणें होत नाहीं, तरी पण आपली इच्छा असल्यास जातों. मी तिकडून कागद आण-ल्यावरच आह्मांला कामावर घ्या.

बाई—मीही आपल्याबरोबर येतें.

कृष्णाजीपंत—हां असें कसें होईल आह्मी तुह्मां दोघांना मिळून कसें पाठवूं. त्याला एकट्यालाच गेलें पाहिजे. (बाई रडूं लागते) तुमच्या वर्तनावरून माझी तर खात्री झाली आहे कीं तुह्मांमध्यें कांहीं काळें आहे.

बाई—नाहीं, अगदीं परमेश्वराशपत मी सांगतें, हें खोटं नाहीं. आम्हाला तुमची मजुरी नको, तुमचें काम नको, आल्या वाटें आम्हाला परत जाऊं द्या. आम्ही दुसरीकडे कोठें तरी जाऊन पोट भरूं. (पुन्हा रडते.)

रामजी—हां रडायचें नाहीं येथें.

कृष्णाजीपंत—बाई तुला येथें भिण्याचें कारण नाहीं. तुमच्या सारखे पुष्कळ लोक सरकारच्या मेहेरबानगीनें येथें कामावर लागले आहेत. इंग्रज सरकारच्या पुण्याईनें देशांत वारंवार जरी दुष्काळ पडले, तरी गरिबांस काम मिळण्याची सोय झालेली आहे. मात्र या ठिकाणीं कसलाच अनाचार घडूं नये ह्मणून आम्हांस खबरदारी घेतली पाहिजे. तुमचें गांव कितीही लांब असलें तरी ३।४ दिवसांत तो जाऊन येईलच. तोंपर्यंत तुला येथें कांहीं रहायला हरकत नाहीं. ज्या मनुष्यानें

तुला येथें आणिली असें आम्हांस वाटतें त्याच्याबरोबर तुला कसें पाठवितां येईल ? या इंग्रज सरकारच्या राज्यांत कसलाच अन्याय होणें नाहीं. (त्या मनुष्याकडे वळून) तुला गेलेंच पाहिजे. उशीर करूं नकोस, १।२ दिवसांत येशील. सरकारास कळविलें तर भलतें सलतें होईल नीघ. रामजी जा यांना घेऊन.

रामजी—चलो चलो. (म्हणून त्या मनुष्याला धक्के मारीत ' दुसऱ्यांच्या बाया पळवून घेऊन येतोस होय ' असें ह्मणत घेऊन जातो.)

कृष्णाजीपंत—शिकार हातांत आलीच, यांत संशय नाहीं. (जरा विचार करून) हां असें करावें. पात्र फार माघूक आहे. आतां याच तयारीस लागलें पाहिजे. दिनावधि करीत बसलों ह्मणजे हातची शिकार जाईल. तो लेकाचा मरायला टेंकला आहे, तरी २ दिवसांत जाऊन येईल. मग सारेंच फसलें. हो 'शुभस्य शीघ्रं'. जातों, आतां त्याच उद्योगाला लागतों.

प्रवेश सहावा.

स्मशानाच्या बाजूचा रस्ता.

(एक मनुष्य कांहीं काम करितो आहे.)

केशवराव—(एकटेच आत्मगत) हिंदुस्थान ! हिंदुस्थान ! ! आर्यमाते तुझे आमच्यावर किती तरी उपकार आहेत ! आज अनंत शतकें झीज सोसून तूं आपल्या पुत्रांची मनकामना तृप्त करीत आहेस. अहाहा ! या भरतखंडासारखी पुण्यभूमी या जगांत दुसरी नाहीं. रामचंद्र, हरिश्चंद्र, युधिष्ठिर यांसारखे महात्मे ज्या वेळीं या आर्यावर्तांत वास करीत होते, त्या वेळेस ही आर्यभूमी ज्याप्रमाणें फलपुष्पयुक्त होती त्याचप्रमाणें आजपर्यंत सतत राहून आपल्या बालकांची क्षुधा, तृषा, एकसारखी शमवीतें

आहे. आणि आह्मी मात्र तिचे पुत्र दुर्व्यसनी, देशघातकी, लोक सदासर्वदा स्वार्थ साधण्यांत—केवळ उदरंभरणांत मग्न आहोंत. हे माते, आमच्यावर कां ह्मणून ही तुझी माया? आह्मीं तुझ्या उदरीं जन्मून तुला मात्र व्यर्थ शिणविलें. तुझ्या या असल्या अचल प्रेमास आह्मी बिलकूल पात्र नाहीं. परमेश्वराचे तरी या हिंदुस्थानवासी जनांवर किती उपकार! आर्यमातेचीं बाळकें उपाशीं मरूं नयेत ह्मणून उत्तम सुपीक जमीन या आर्यावर्तांत जिकडे तिकडे दिसून येत आहे. आम्र, निंब, लिंबादि नानातऱ्हेच्या फळझाडांची सर्व देशभर गर्द छाया पसरून राहिली आहे. हिमालय, सह्य, विंध्य, मलयादि अनेक पर्वतराजांनीं आर्यबालकांस वनौषधी पुरविण्याचा मक्ता घेतला आहे. सिंधु, गंगा, गोदावरी, नर्मदा, कृष्णा, कावेरीं वगैरे महानद्या सर्व देशभर पसरून सर्व देश सुपीक करून टाकीत आहेत. भारतसंतानाला कसलीच वाण पडूं नये ह्मणून ठिकठिकाणीं सोन्या रुप्याच्या शेकडों खाणी या आर्यावर्तांत दृग्गोचर होत आहेत. अशा प्रकारच्या मातृप्रेमाचा आणि ईश्वरी देणगीचा वर्षाव या भारतवासी जनांवर होत असतां आह्मी भारतवासी जन काय करीत आहों? आपआपसांत दुही माजवून एकमेकांच्या नरडीचा घोंट घेण्यास सदा तत्पर! कोहिनूरसारखे हिरे परदेशस्थांनीं येऊन लुटून नेले, तरी आह्मी आपले स्वस्थ. आर्यबालकांच्या रक्तानें आर्यमातेस न्हाऊं घालण्यांत आह्मी अगदीं हातखंडे. आर्यावर्तांत येऊन सबंध देशभर हुतुतु घालूं इच्छिणाऱ्या, महंमद घोरीसारख्या दुष्ट यवनांस, कंठस्नान घालण्यास तयार झालेल्या महाप्रतापी आर्यवीर पृथ्वीराज चव्हाणासारख्या शूर योद्धयाचा उत्साहभंग करणारा राजा जयसिंह याच आर्यमातेचा पुत्र. बाबरासारख्या शूर मोगल योद्धयास आर्यावर्तांतून घालवून देण्यास उद्युक्त झालेल्या संगराण्याचा हिरमोड करणारे इतर रजपूत वीरही याच हिंदुस्थानांत जन्मलेले. सुराज उद्धवझ्यासारख्या स्व-

जातीय, अप्रबुद्ध व खुनशी नबाबाचा घात करून, राजद्रोह आणि देशद्रोह करणारा मिरजाफरही याच देशांतला एक. स्वतःचे भाऊबंद उपाशी मरतांना पाहून, आपले लोक अज्ञानांधःकारांत मग्न असलेले डोळयाला दिसत असतांना स्वतः चैनींत राहून, आळसांत काळ घालविणारें लोकही हिंदुस्थानांतलेच. आपल्या देशांतील सर्व कारागिरी लोपून जाऊन निरनिराळ्या स्वतंत्र धंद्यांतील लोक पटापट उपाशी मरत असतांना पाहून परदेशी वस्तूंनीं नटून थटून आपल्या गरीब भाईबंदांना ignorant, idle, fool वगैरें नावें ठेवून, स्वतः आलस्यमग्न राहून नामर्दपणांत राहणारे लोकही भरतखंडांतलेच. हे आर्यमाते, राजा रामचंद्रासारखे महा सात्विक, राजा युधिष्ठिरासारखे सत्यवक्ते, आणि श्रीसमर्थ रामदास आणि राजा शिवाजीसारखे महादेशभक्त लोक फिरून तुझ्या उदरीं जन्म घेणार नाहींत का ?

(आजूबाजूस पाहून एकदम दचकून,) अरे, मी असा भटकत आलों कुठें ? ही श्मशानभूमि वाटतें ! हो, हें पहा राखेचे किती तरी ढीग. या बाजूस दिसत आहेत. खरोखर ही श्मशानभूमीच आहे. या वेळेस हें स्थळ किती उदास आणि भयानक दिसतें. या एवढयाशा जागेंत किती तरी लोकांच्या शरीरांची राखरांगोळी झाली असेल ! ती पलीकडील चिता अद्यापि प्रज्वलित आहे. (जरा पुढें जाऊन) अरे ही चिता नुकतीच पेटविलेली दिसते. कोणा मनुष्याचें हें शव असेल बरें. हा कुणी तरी एखादा लक्षाधीश असेल काय ? बाबा रे, तुझ्या त्या अगणित संपत्तीचा आतां तुला काय उपयोग? तुझ्या घरीं नानातऱ्हेचे बिछाने असतील, तुझ्या येथें पराच्या मऊ मऊ गाद्या गिरद्या असतील, तुला ऊनवारा लागूं नये म्हणून तुजबद्दल तूं जीवंत असतांना काळजी वाहणारे अगणित दासदासी असतील, तुझी मोठी हवेली असेल, परंतु तुझ्या त्या बिछान्याचा, गाद्यागिरद्यांचा, दासदासींचा अगर

तुझ्या हवेलीचा आतां तुला काय उपयोग ? बाबा रे, हीं लांकडें तुला रक्षामय करात आहेत. तुझें शरीर होरपळून जात आहे. आतां या वेळेस तुझ्या कामीं कोण येणार आहे ? तुझा वाली या वेळेस कोण आहे ? कदाचित् देशद्रोह करून, देश-बांधवांचा घात करून, स्वदेशांतील संपत्ति परदेशांत घालवून देण्यांत मदत करून, कदाचित् कोणा गरीबांच्या माना मुरगळून, त्यांच्या संसारांत माती कालवून, त्यांचीं घरें बुडवून तूं आपली धन दौलत मिळविली असशील, तर बाबारे, आतां ती सारी धनदौलत येथल्या येथेंच राहून तुला मात्र तुझ्या कृतकर्माचा झाडा देण्याकरितां यमधर्माकडे त्याचे दूत ओढून नेत आहेत. त्यांच्या तावडींतून तुला कोण सोडविणार ? बाबारे, तूं कदाचित् एकादा कायदेपंडित असशील, पण त्या तुझ्या कायद्यांचा आतां तुला काय उपयोग ? नुसता एकाद्याचा दुसऱ्याला धक्का लागला कीं पुरे, assault battery म्हणून कायद्यांतील सूक्ष्म प्रश्नांचा बारीक रीतीनें उहापोह करणारा जो तूं, त्या तुझ्या शरीराची राखरांगोळी होत असतांना तुझ्या पीनलकोडाचें कोणतेंच कलम तुझ्या उपयोगी पडत नाहीं काय ? तुझ्या शेंकडों बक्षीसपत्रांचे पैसे आतां तूं कसे वसूल करणार ? बाबारे, तूं आपल्याला सरकारचा प्यार समजणारा एखादा सरकारी नोकर असशील तर इमानेंइतबारें ज्या सरकारची तूं नोकरी बजावलीस, तें सरकार या वेळेस तुझ्या उपयोगी पडेल काय ? आपल्याच भाईबंदांबद्दल चहाड्या चुगल्या करून तूं एकाद्या वरिष्ठपदास चढून आज-पर्यंत सेवाचाकरी करून आपल्या तिजोऱ्या भरून ठेविल्या असशील. तुझ्या इमानाचीं, तुझ्या सेवातत्पर-तेचीं शेंकडों प्रमाणपत्रें तुझ्या पेटींत नीट व्यवस्थेशीर पडलीं असतील. त्या तुझ्या तिजोऱ्या व तीं प्रमाणपत्रें आतां तुला यातनेंतून सोडविण्याच्या कामीं तुझ्या उपयोगी पडतील काय ? बाबारे, तूं कोणी कां असेनास ? आतां परमेशासमक्ष तुला आपल्या

कृतकर्मांचा झाडा द्यावा लागेल. या जगांत जरी तूं नांवलौकिक मिळवून थोरपदास चढलेला असशील, तरी तें तुझें थोरपद, तुझीं तीं शेंकडो प्रमाणपत्रें, परमेश्वराच्या दरबारांत तुझ्या उपयोगी पडणार नाहींत. जर तूं सत्कर्म करण्यांत, आपल्या देशाचें, आपल्या देशबांधवांचें, हित चिंतण्यांत, आयुष्य खर्चिलें असशील तर तेवढेंच तुझें सत्कर्म व तुझें देशहित चिंतण्याचें पुण्य तुझ्या उपयोगीं पडेल. (पलीकडे पाहून) अरे, हा मनुष्य येथें एकटाच काय करीत आहे ? त्याजकडे जाऊन (त्या मनुष्यास) अरे, तूं कोण ? अशा वेळेस या स्थळीं तूं एकटाच काय करीत आहेस ?

मनुष्य—रावसाहेब, मीं जातीचा मांग. माझा धंदा हाडें वेंचण्याचा. मी येथें हाडें वेंचुन घेऊन जातों.

केशव—अरे, हीं हाडें वेंचून रे काय करितोस ?

मनुष्य—रावसाहेब, हीं हाडें वेंचून पोतीं भरुभरून आम्ही व्यापाऱ्यांस विकितों. ते हीं हाडें गलबतांत भरून विलायतेस पाठवितात. त्यांचा तिकडे खतास चांगला उपयोग होतो.

(म्हणून पुन्हां म्हणावयास लागतो.)

केशवराव—(आपल्याशींच) अरे, हे परदेशी व्यापाऱ्यांचें जाळें आपल्या देशांत कोठपर्यंत पसरलें आहे ? हे परदेशी व्यापाऱ्यांनो, आमचा पैसा, आमचें धान्य, आमचें अन्न, आपले देशांत नेऊन तुमची तृप्ति होत नाहीं काय ? रोजच्या रोज हिंदुस्थानांतील अस्सल कसदार धान्य परदेशांत रवाना होत आहे. आमच्या देशांतील खनिज संपत्तीचा पूर पश्चिमवाहिनी होऊन परदेशाकडे जात आहे. आमची अक्कल परदेशी भपक्याला भुलून नाहींशी झाली आहे. एवढ्यानें तुमची तृप्ति होत नाहीं काय ? आतां आमचें सर्वस्व नेऊन, पुन्हां आम्हीं मेल्यावर आमचीं हाडें देखील तुमच्या देशांत नेणें पाहिजेत काय ?

बाबानों, तुह्माला दोष लावून काय उपयोग ? आमच्या कृत-कर्मांचीं फळें आह्मी भोगीत आहों. झालें, बरें आहे, जावें आतां घराकडे. (त्या मनुष्यास) काय रे बुवा, इकडून गांवांत जायचा रस्ता कोणता ?

मनुष्य--हा बघा, रावसाव हा दिवा दिसतोय ना तो आहे त्या कामगिरीच्या झोंपड्यांतला. तेच्या बाजनं अशीं असं पुढं गेलं कीं गांवच. असं समोर जा.

केशवराव—बरं आहे. (ह्मणून जातो)

(पडदा पडतो.)

प्रवेश सातवा.

स्थळः—रिलीफ कामगिरीमधील एक झोंपडी.

(चिमा आणि रखुमा उभ्या आहेत, जवळ एक ताट वाढून ठेविलें आहे.)

चिमा—काय बाई अशी रडत किती वेळ बसणार तूं ? तुझा नवरा २–३ दिवसांत येईल. तो काय तिकडेच जातो की काय ? माझं ह्मातारीचं ऐक तरी. अग वेडी कुठली चांगलं वाढून आलेलं अन्न तसंच टाकूं नये. बाई, अन्नाकरितां तर सारी खट-पट; तूं नशीबाची ह्मणून तर तुला भात पोळी आयती वाढून येते. सकाळीं देखील जेवली नाहींस आणि आतांही जेवली नाहींस तर जगशील कशी ?

रखुमा—मी मेलें तर फार चांगली गोष्ट होईल !

चिमा—छेः खुळी कुठली. असं ह्मणूं नये, तुला काय कमी आहे ? माझं ऐकत नाहींस का ? रावसाहेब फार चांगले आहेत. तुला फुलाप्रमाणें ठेवितील.

रखुमा—(संतापानें) अगबाई, तूं येथून जा कशी.

चिमा—असं रागावूं नये. म्हाताऱ्या माणसाचं जरा ऐकावं; मी तुला वाईट का सांगतें ? अग वेडे, यांत तुझें कल्याण आहे. पोराला खाऊं घातलंसना.

रखुमा—हो पोर जेवून निजलं.

चिमा—तूंही जेवून टाक. बरं हें पहा, इथं काम करावयाला आलेल्या लोकांना चतकोर भाकरी देखील मिळण्याची मारामार. रावसाहेबांची तर तुजवर पुरी मर्जी, तुला बिलकूल काम म्हणून पडूं द्यावयाचे नाहींत. काम वाटून देणं सगळं त्यांच्या ताब्यांतलंच, आतां ते इकडे येतील त्यां वेळेस चांगलो हंसून खेळून रहा बरं.

रखुमा—अगबाई, मला कां छळतेस ! तूं एवढी थेरडी झालीस तुला कांहीं शरम वाटत नाहीं का ?

चिमा—असं म्हाताऱ्या माणसाच्या अंगावर येऊं नये, उद्यां तूंच मग मला विचारणार देखील नाहींस हो. एकदां कां त्यांच नि तुमचं जुळलं म्हणजे मग तुलाच वाटेल म्हातारीनं आपलं कल्याण केलं म्हणून. माझं ऐकतेस ना. ते आतां इकडेच येतील.

रखुमा—(आपल्याशींच) देवा माझ्यावर हें कसलें संकट आणिलेंस ? ते आजारी, पायानें त्यांना चालवत देखील नाहीं. त्यांना पांच कोस आतां कसें चालवेल. या दुष्टाची कांहीं तरी दुष्ट वासना आहे खास. ह्या हडळीच्या जिभेला हाडच नाहीं. माझी आतां हा अब्रू घेईल काय ? देवा ! आम्हांला इकडे येण्याची बुद्धि कां म्हणून झाली ? दुसरीकडे कुठें तरी जाऊन पोट भरलें असतें. आतां हे दुष्ट त्यांचे हालहाल करतील. आई जगदंबे, तूंच आमचें रक्षण कर.

चिमा—विचार कसला करावयाचा आहे ? सांगू रावसाहेबांस कांहीं हरकत नाहीं ह्मणून. तुझं नांव रुक्मिणी आणि त्यांचें नांव कृष्ण. काय तुमची कृष्णरुक्मिणीची जोडी शोभेल ह्मणतं ! काय तुझा नवरा तो दळभद्र इश. अशा नवऱ्याबरोबर संसार कसा करावयाचा तो ?

रखुमा—बाई बाई. येथून तूं जा आतां आपलें तोंड काळं करून. जा एकदाची.

चिमा—रावसाहेब इकडे आले कीं मी निघालेंच. मी कशाला तुमच्या सुखाच्या आड येऊं ? बरं पण बाईसाहेब, ह्मातारीकडे लक्ष असूं द्या बरं का ! आपलं काम झाल्यावर मग कोण कुणास पुसतो ? (इतक्यांत कृष्णाजीपंत येतांना दिसतो) ते इकडे आलेच वाटतं, हें पहा, असं रागावूं नये, वेडी कुठली, तूं मोठ्या नशीबाची. (कृष्णाजीपंत येतो).

कृष्णाजीपंत—(आपल्याशींच) चिमा जाईल तेथें काम फत्ते करूनच येते. इचा हातगुणच चांगला. बहुतकरून गोळी लागली आहे, यांत संशय नाहीं. (हांसत हांसत मोठ्यानें) कां चिमाबाई रंग काय आहे ? ही जेवली कीं नाहीं ?

चिमा—जेवील खाईल सगळं करील. नवीन जागा आहे. कांहीं दिवस जराशी हुरहुर वाटते झालं.

कृष्णाजीपंत—(आपल्याशींच) हा चेहरा पाहिला कीं, येथून हालूं नये वाटतं. इच्या तोंडावर प्रसन्न मुद्रा दिसत नाहीं. इचें तोंड जरा सुकलेलें दिसतें खरें, तरी पण त्याच्यांत मोह-कपणा भरून राहिला आहे. इनें तर आपल्याला भारून टाकलें आहे. (रखुमाच्या पुढें जातो, ती उठून उभी राहते.)

कृष्णाजीपंतः—(हंसून) हें पहा असं करूं नये. जेवावं, खावं, त्याला काय कमी आहे ? इथें बाकीच्या लोकांना पोट-भर अन्न मिळण्याची देखील पंचाईत. असं अन्न टाकूं नये.

चिमा:—मी तरी तेंच सांगत होतें. एक दोन दिवस असं करतेंच माणूस. मग आपसूक सगळं करायला लागतील. मग या चिमाला ओळखायच्या दिखील नाहींत.

कृष्णाजीपंत:—(हंसून) तुला ओळखायची नाहीं. असं व्हायचं नाहीं. तो चेहराच सांगतो कीं, अशी उपकार करणाऱ्यावर उलटून पडणारी ही नव्हे ह्मणून. (जरा पुढें जाऊन) हें पहा, आमच्याशीं असा अबोला धरूं नये. चिमा आपल्यापैकींच. येथें कां कुणी दुसरं माणूस आहे ? (पाठीवर हात फिरवावयास जातो.)

रखुमा:—(रडत रडत मागें सरून) असं मला छळूं नका, मी आपल्या मुलीसारखी आहें. असं दुःखांत पडलेल्या माणसाला त्रास देऊं नका. मी आपल्या पायां पडतें. मला माझ्या गांवीं जाऊंद्या.

कृष्णाजीपंत:—हा ग वेडे, तुला मी छळायला कां येथें आलों ? छेः खुळी कुठली. आतां दुःख कुठलं आलंय, चैनींत राहूं. काय त्या भिकारड्याला घेऊन करतेस. येथें तुला कसलाच त्रास व्हावयाचा नाहीं. तें गोड तोंड किती तरी सुकलें आहे. (गालांस हात लावायला जातो.)

रखुमा:—हां खबरदार, परक्या स्त्रीच्या आंगावर हात टाकायला लाज वाटत नाहीं. येथें माझें रक्षण करण्यास कोणी नसलें तरी साक्षात् देव माझा वाली आहे. दुरून बोल.

चिमा:—हा वेडे, असं भलतंच करूं नये. कुणाच्या अंगावर जातीस, खस्कन् ओरडतीस काय ? असं भलतंसलतं तोंडांनीं बोलूं नये.

कृष्णाजीपंत:—(आपल्याशींच) हें प्रकरण कांहीं निराळेंच दिसतें. किल्ला सहज काबीज होण्याचा रंग दिसत नाहीं. तथापि आलेली शिकार कांहीं जाऊं द्यायची नाहीं. साम-

दाम दंडभेदादि सगळे उपाय करून पाहिले पाहिजेत. सामोपचारानें साध्य होण्यासारखें नसल्यास दुसरा उपाय आहेच. (उघड) काय झालं चिमा. आंगावर आली ह्मणून काय झालं. रागाच्या आवेशांतच तोंड पाहण्यांत मजा आहे. चिमा, त्या राम्याला मीं लखोटा घेऊन ये ह्मणून सांगितलें होतें, तो आला कीं नाहीं जरा पाहून ये. (तिच्यां-कडे पाहून मान हालवितो.)

चिमा—(जातां जातां) हो आता कशाला चिमा पाहिजे ? चिमा गेली ह्मणजेच बरं. आपण तरी कशाला इथं रहावं ?

(चिमा जाते.)

कृष्णाजीपंत—(पुढें जाऊन) हें सुंदर मुख पाहिल्यापासून तुझी भेट घेण्याची अगदीं वाट पहात आहें. त्या भिका-रड्याकरितां रडून काय करतेस ? खायला तुकडा घालण्याची लेकाच्या आंगांत ताकद नाहीं, त्याच्या नादीं लागून काय करितेस ? ही घे तुला नजर. (आपल्या हातांतील आंगठी काढून तिच्या बोटांत घालायला जातो.) या कृष्णाजीपंतास काय कमी आहे ?

रखुमा—(डोळे लाल करून) निलाजऱ्या, पुनः आंगाशीं येतोस. तुला काय बोलायचें तें दूर राहून बोल. आह्मां गरीबांच्यां अब्रूची किंमत नाहीं काय ? आग लागो तुझ्या त्या आंगठीला; जळो तुझी जीभ. कितीही ते गरीब असले तरी त्यांची सर तुला येईल काय ? ही अशी दुष्ट वासना मनांत धरून त्यांना येथून लावून दिलेस काय ?

कृष्णाजीपंत—होय तर, आमच्या आनंदांत त्या शिंच्याची पीडा नको ह्मणून तर त्याला येथून पार घालवून दिला. बरं, आपल्याला तर धीर धरवत नाहीं बुवा, ह्मणून एक-(ह्मणून तिच्या हनुवटीस हात लावायला जातो.)

रखुमा०—(संतापून मागें सरून) पुढें एक पाऊल तर टाक कीं येथल्या येथें जीभ हांसडून प्राण देतें. अशी जीवंत रखुमा तुझ्या हातीं लागायची नाहीं.

कृष्णाजीपंत—हां असं वेड्यासारखं करूं नये. (आपल्याशींच) करावें तरी काय ? इची ही रागीट मुद्रा पाहून आपण तर गर्भगळीत झालों बुवा ! आपली तर हिच्या आंगावर हात टाकण्याची छाती नाहीं. पण ही आलेली संधि पुन्हां यायची नाहीं. पुनः एकदा प्रयत्न केला पाहिजे (जरा रागाचा आवेश आणून मोठ्यानें) प्राण देतें ह्मणून मला भीति घालतेस अं ! दे पाहूं कशी प्राण देतेस ती ? आपण तर आज आलेली संधि दवडणार नाहीं. (तिच्या गळ्यांत हात घालायला जातो.)

रखुमा—(मोठ्यानें) आई आईग मेलें मेलें या दुष्टाच्या हातून कोणीतरी मला वाचवा हो ! (ह्मणून मोठ्यानें ओरडून एकदम जमिनीवर पडते.)

(केशवराव लगबगीनें येऊन तो देखावा पाहून कृष्णाजीपंताची मानगुटी धरून एक जोराचा धक्का देतो आणि त्याला बाजूस सारितो.)

केशवराव—(कृष्णाजीपंताकडे वळून) अरे कृष्णाजीपंत, काय नीच कृत्य आरंभिलेंस हें ! अरे अशा दीन अबलेवर हात टाकायला तुला लाज वाटत नाहीं !

रखुमा—(जागी होऊन केशवरावाच्या पायां पडते) मला वाचवा हो या मांगाच्या हातून ! हा मांग बघा मला कसा एकसारखा छळतो आहे. कृष्णाजीपंत जायला लागतो.

केशवराव—(त्यास) खबरदार येथून हाललास तर येथल्या येथें तुला गाडून टाकीन आणि मग पाहून घेतों काय होईल तें. (बाईस) ऊठ, बाई ऊठ, काय झालें त्याची सविस्तर हकीकत मला सांग.

बाई—आह्मी गरीब कोष्टी, घरांत कांहींच उरलें नाहीं. येथें सरकारांनीं काम उघडिलें आहे, येथें कांहींतरी मिळेल ह्मणन आलों. येथें आल्यावर त्यांना नाहीं नाहीं तें बोलून मी त्यांची बायको च-नव्हे, मला पळवून आणिली, अशीं कोहींतरीं नांवें ठेवून पाटलाकडून कागद आण ह्मणून त्यांना सांगून येथून आल्यापायीं परतविलें. ते आजारी आहेत, त्यांना चालवत नाहीं. देवा, त्यांचे किती हाल झाले असतील! त्यांचा तसा छळ करून मांगांनीं माझा असा छळ चालविला आहे. मजबद्दल दुष्ट वासना धरिली आहे. तुह्मी यांच्या हातून मला वाचवा हो! मला माझ्या गांवीं परत जाऊं द्या. तिकडे हाल फार होत असतील. मी आपल्या लेकीप्रमाणें आहे. मला वांचवा हो!

केशवराव—बाई, तूं कांहीं काळजी करूं नकोस. मीं याचा नीट समाचार घेतों. (कृष्णाजीपंताकडे वळून) काय रे हरामखोर, काय आरंभिलेंस. या तुझ्या भिकारखान्यांत निरुपायास्तवं आलेंल्यां माणसांचा तूं अशा प्रकारें छळ मांडिला आहेस अं? बोल या बाईचा नवरा कोठें आहे?

कृष्णाजीपंत—(भिऊन) तो खरोखर आपल्या गांवाकडे गेला. उद्यां बहुतकरून येईल.

केशवराव—शिव शिव, केवढें घोर पातक हें! आपली एक गरीब देशभगिनी दारिद्र्यानें गांजून कष्टानें कां होईना पोट भरण्यास आपल्याकडे आल्यास तिच्यासंबंधीं ही अशी दुष्ट वासना! काय अघोर कर्म हें! अरे, सरकारांनीं तुला हीं असलीं दुष्ट कामें करण्याकरितांच कां रे येथें नेमिलें आहे? अरे, जातींचा ब्राह्मणना तूं? नीच यवनांस देखील न साजेलसें जार कर्म करण्यास तयार झालास? धिःकार असो तुझ्या त्या जीविताला. अरे, अधिकारमदाची धुंदी आली वाटतें. अधिकार तरी तो कसला? भिकारखान्यावरचा तूं एक बडा भिकारी! छेः छेः असे नीच लोक कधीं या देशांतन नाहींसे होतील? आपली देशभगिनी

आणि आपली सख्खी पाठीवरची बहीण या दोघींत काय फरक? आपल्या देशभगिनींचें पातिव्रत्यभांडार लुटूं इच्छिणारे काळहृदयी-लोक प्रसंग आल्यास सख्या बहिणींकडे वांकड्या नजरेनें कशावरून पाहणार नाहींत? अरे, कृष्णाजीपंत काय ही तुझी स्थिति? (बाईकडे वळून) बाई, अशा ठिकाणीं रहाणें चांगलें नाहीं. मी तुझ्या नवऱ्याचा शोध लावून देतों. तूं गांवांत चल, या दुष्टाची सावली देखील तुझ्या उपयोगीं पडणार नाहीं. चल.

(केशवराव आणि रखुमाबाई जातात. पडदा पडतो.)

प्रवेश पहिला.

स्थळ एक सरोवरकाठचा प्रदेश.

(चिदानंदस्वामी येतात.)

स्वामी (एकटेच)—होय, हीच ती पुण्यभूमि, याच ठिकाणीं माझ्या बालपणाचे दिवस गेले. अहाहा, या ठिकाणचा देखावा आज मला पूर्वीप्रमाणेंच आनंद देत आहे! हेंच तें सरोवर, या सरोवरांत पोहण्यांत, व नानाप्रकारच्या जलक्रीडा करण्यांत माझे लहानपणचे किती तरी दिवस गेले असतील! ती पलीकडची दाट आमराई आतां पुष्पभरित झालेली आहे. अहाहा! किती तरी सुगंधयुक्त वायु हा! या ठिकाणाहून या भरतभूमीची किती लांबची वनश्री दृष्टीस पडते! त्या लांब पवित्र गोदावरीचा प्रवाह वळणावळणांनीं वाहून या पुण्यभूमीस अधिक पवित्र करीत आहे. त्या माझ्या बालपणाच्या सर्व खाणाखुणा या ठिकाणीं अद्यापि अगदीं नव्या सारख्याच दृग्गोचर होतात! हो या पलीकडच्या मैदानांतच आमचा विटीदांडूचा केवढा तरी अड्डा पडत होता! हेंच तें परम पवित्र शिवालय.

हीच आमची बालपणची विश्रामभूमि; याच स्थळीं कांहीं दिवस राहून, मजकडून अगदीं बालपणापासून सेवा घेणाऱ्या प्रभूची सेवा पुनः एकवार करूं या. (जरा पुढें जाऊन शंकराच्या पिंडीचें दर्शन घेऊन, प्रणिपात करून) हे प्रभो, बालपणीं तुझी सेवा चाकरी केली, अलीकडे तुझा दर्शनलाभ जरी चुकला होता, तरी ही तुझी मूर्ति रोज माझ्या हृदयमंदिरीं वास करीत होती. प्रभो माझ्या बालपणीं बोबड्या स्वरानें तुझ्या केलेल्या त्या माझ्या एकनिष्ठ भक्तीस भुलून मला तूं आर्यमातेची सेवा करण्यास आज्ञा केलीस. आज तागाईत तुझ्या आज्ञेचें उल्लंघन बुद्धिपुरःसर केलें नाहीं, तुझ्या आज्ञेप्रमाणें सर्व भूमंडळ फिरून तुझ्याच चरणांशीं राहून आर्यमातेची सेवा संपूर्ण करावी म्हणून परत येथें आलों. प्रभो, माझी आर्यमाता बहुत कष्टली आहे. आतां अंत पाहूं नकोस. आर्यांना आतां आधार उरला नाहीं; तूंच एक त्यांचा आधार. (गुडघे टेंकून हात जोडून)

हे प्रभो जगन्निवास अघनिवारका
रक्षि रक्षि दीनजना आर्यबालकां
दीन बहु कष्टि अशीं आजि जाहलों
पाहुं नको अंत अतां बहुत शीणलों
कलहमग्न असुनि आर्य देशघातकी
स्वार्थपूर्ण असति पहा मग्न पातकीं
नीचवृत्ति प्राप्त होय आर्यभूमिला
अंत अतां पाहुं नको विश्वपालका
रक्षि रक्षि दीनजनां आर्य बालकां   (केशवराव येतो.)

केशवराव—अहाहा, कोण पुण्यपुरुष या स्थळीं येऊन ही अशा प्रकारची विनविणी प्रभूस करितो आहे ! खरोखर हा कोणी असाधारण पुरुष असावा ! देवालयांत परमेश्वरासन्निध स्वदेशाबद्दल प्रेमपुरःसर विनंति करणारा हा महात्मा तरी कोण ? याचें दर्शन घेऊन आम्हा पुनीत करूंया. अशा प्रकारचे

पुण्यपुरुष या आर्यावर्तात अवतरूं लागले हें खरोखर मोठे सुचिन्ह होय. कोणताही देश ऊर्जितावस्थेस येऊं लागला, कीं अशा प्रकारचे महात्मे त्या देशांत जन्मूं लागतात. आमचा आर्यावर्त सुखसंपन्न होण्यास अशा महात्म्याची मालिका लागून राहिली पाहिजे. सबंध देशाच्या पुढें अशा महात्म्यांचा कित्ता दत्त ह्मणून उभा असला पाहिजे. आमच्या या आर्यभूमींत भगवीं वस्त्रें धारण करून असणाऱ्यां लोकांचे थवेचे थवे दृष्टीस पडतात, पण देशास त्यांचा काय उपयोग? कोणी वैराग्यशीलवंत, बनून इहलोकींच्या कसल्याच गोष्टींत मन घालीत नाहींत. त्याना कशाचीच जरूर नसते. स्वदेश काय परदेश काय, अखंड भूमंडलच त्यांना एकसारखें. आपपरभाव त्यांचा अगदींच गेलेला असतो. जगाची त्यांना परवा नसते. अशा प्रकारचे लोक एका परीनें चांगले असतील, पण अशा लोकांचा देशकार्याला कांहीं उपयोग होत नाहीं. कांहीं लोक नांवाचीं मात्र भगवीं वस्त्रें वरवर धारण करितात, पण त्यांचें मन अज्ञान आणि स्वार्थाच्या विचारांत सदा मग्न असतें. अशा लोकांचा देशास फायदा न होतां उलट मोठा तोटाच होतो. परंतु स्वदेशासाठीं संसार सोडून, इहलोकींच्या सर्व स्वार्थपर महत्वाकांक्षा एकीकडे सारून, नेहमीं स्वदेश नामाचा जप करणारे असे हे महात्मे खरोखर धन्य होत. श्रीसमर्थ रामदासांनीं जो आपल्या महाराष्ट्रावर उपकार केला, त्याची थोरवी किती वर्णावी ? स्वत: एक लंगोटीचे धनी, परंतु आपली मायभूमि महाराष्ट्र देश सुखसंपन्न होवो, महाराष्ट्रांतील लोक सदाचार संपन्न होऊन स्वातंत्र्यसुखाचा अनुभव घेवोत, ह्मणून त्या महात्म्याचे किती तरी प्रयत्न ? प्रत्यक्ष शिवराय्यासारखा परमप्रिय शिष्य महाराष्ट्रराज्य अतिप्रेमानें अर्पण करण्यास तयार झाला असतां तिकडे निरिच्छ दृष्टीनें पाहून शिवरायाच्याच स्वाधीन

राज्य करणाऱ्या समर्थाची योग्यता किती अवर्णनीय होय! तशाच प्रकारची ही मूर्ति दिसते.

स्वामी—(उठून) आज किती दिवसांनीं मला ह्या प्रभूच्या दर्शनाचा लाभ झाला. या वेषानें बाहेर पडून इंग्लंड, जर्मनी, अमेरिका वगैरे देशांत इतके दिवस राहून अनेक विद्या संपादन केल्या. प्रभूची केवढी मजवर कृपा! प्रभूनेंच परस्थलीं पाठवून नाना प्रकारच्या विद्याकला मला अवगत करून दिल्या. हें ठिकाण सोडून किती वर्षें झालीं असतील बरें? (जरा थांबून) बारा वर्षें होऊन गेलीं. परदेशांत राहून अभ्यास करीत असतांना सारें लक्ष या माझ्या देशाकडे लागून राहिलें होतें. परत येण्याचे दिवस जवळ येतांच तर पुसूं नका. ही आर्यभूमि अहोरात्र माझ्या डोळ्यांसमोर असे. त्यांतही ही माझी बालपणाची क्रीडाभूमि, हें पवित्र शिवालय, ही माझ्या प्रभूची स्वयंभू मूर्ति या सर्वांची वारंवार आठवण होऊन मन एक जागीं ठरेना. फिलाडे-ल्फिया सोडून बोटींत पाय ठेवीत असतांना माझ्या मनांत झालेला आनंद तर कसला विलक्षण! आणि त्याचप्रमाणें मुंबई शहर गलबतांतून दिसूं लागतांच माझ्या डोळ्यांतून वहणाऱ्या आनंदाश्रूंचे प्रवाह, या सर्वांची आठवण होतांच मनाला किती तरी आनंद होतो! देहभान रहात नाहीं. खरोखर स्वदेशाबद्दलचें प्रेम ही एक अजब चीज आहे. हे प्रभो—

चाल (राम स्मरावा राम).

असेल कां कुणि मनुज असा या विशाल भमीवरी
जो नष्टात्मा अधमाधम कधिं मातृभूमिचें स्मरणहि न करी ॥
विशाल भूमिवरी ॥ जन्मभूमिही माझी माझी ऐसें यद्रस-
नाहि न वदली ॥ विशाल भूमितलीं ॥ परदेशाहुनि स्वगृहिं
निघतां यत्पदपंक्ति त्वरित न पडली ॥ विशाल० ॥ दारा
सुतयुतगृहस्मरणानें मोदलहरि यद्धृदयिं न उठली ॥

चाल (जशी सज्जनाचीं मनें.)

जरी आढळे कधिं असा प्राणि कोणी तरी
व्यर्थ तो भार या भूमिवरती ॥ ध्रु० ॥
बघुनि ऐशा नरा कोणत्या कविवरा ।
तद्यशोगायनीं होय स्फूर्ति ॥
अमिततत्संपदा नांव मोठें सदा ।
दासदासीजनां नाहिं गणति ॥
तरिहि त्याचें जिणें देशप्रीतीविणें । (स्वाभिमानाविणें)
मृत्युसम मानणें सकल वदती ॥
मृत्यु ऐशा जना येइ तरि लोचनां ।
मधुनि कां कोणत्या अश्रु गळती ॥
उलट हा खल अतां पावला नष्टता ।
म्हणुनि बहु हर्षते सकल जगती ॥

केशवराव—(आपल्याशींच) हें गूढ काय ? यांच्या बोलण्यावरून यांच्या बालपणचे दिवस याच स्थळीं गेलेले दिसतात. ह्यांना येथून जाऊन किती वर्षे झालीं ? १२ वर्षें नव्हे कां ? हो संशय फिटला. खास खास आज एक तप नाहींसा झालेला माझा दादाच या स्वामींच्या रूपानें येथें आला आहे यांत संशय नाहीं. आतां उशीर नाहीं. (जवळ जाऊन साष्टांग नमस्कार करून पाय घट्ट धरितो.)

स्वामी—(हात उचलून) वत्सा, देव तुला दीर्घायू करो, तुझ्या हातून मातृभूमीची सेवा सतत होवो.

केशव—महाराज माझी एक विनंति आहे, आज्ञा झाल्यास सांगतों. माफी असावी.

स्वामी—माफी कसची ? काय म्हणणें आहे सांग.

केशवराव—आपल्याला एक विचारावयाचें आहे. आपण कोण ? आपलें नांव काय ? आपण कोठले ? हा वेष कां धारण केला ? प्रश्न विचारल्याची माफी असावी.

स्वामी–बाबा मी एक आर्यमातेचा पुत्र आहे. माझें नांव भारतसंतान. मी हिंदुस्थान देशांतला, या माझ्या मातृदेशांत जन्मलेला आणि हा वेष धारण केला तो या आपल्या मायदेशाचा–स्वदेशाची–सेवा करण्याकरितां.

केशवराव—(स्वतःशींच) अहाहा काय निःस्सीम देशभक्ती ही ! असा हा महात्मा माझा बंधु असेल काय ? होय, खास माझा दादाचहा. (स्वामींच्या पायांवर डोकें टेकून मोठयानें) महाराज क्षमा असावी. मी आपल्याला ओळखिलें. आपणाला जरी माझी ओळख लागली नाहीं, तरी मला आपली लागली. आपलें पूर्वाश्रमांतलें नांव विश्वनाथ, आपण बाबासाहेबांचे चिरंजीव, आणि आपल्यापुढें हात जोडून उभा असलेला हा आपला सख्खा भाऊ केशव. (केशवरावाच्या डोळ्यांत अश्रुबिंदु येतात.)

स्वामी—(अगदीं सद्गदीत अंतःकरणानें) केशव, बाबांची प्रकृति ठीक आहेना ? आईसाहेब खुशाल आहेतना ? अरे मी जातांना तूं अगदीं लहान होतास. तुझी मुंज दिखील झाली नव्हती. आज चांगला सशक्त झाला आहेस, मला तुझी ओळख कशी लागावी ? मला जाऊन बारा वर्षें होऊन गेलीं !

केशवराव—मला तूं गेल्याची थोडथोडी आठवण आहे. त्या वेळेस आपण ह्याच गांवीं होतों. तूं गेल्याचे दुसरे दिवशीं बाबांनीं बराच शोध केला, मुंबईस तारा वगैरे पाठविल्या, पण तुझा कांहीं पत्ता लागला नाहीं. एकदां तुझा पत्ता लागत नाहीं असें कळल्यावर तुझ्याविषयीं घरांत कुणी एक शब्द देखील बोलतां कामा नये, म्हणून ताकीद केली. आणि त्या दिवसापासून घरांत तुझें नांव दिखील निघणें बंद.

झालें. मंडळींत देखील त्यांचा स्वभाव माहीत असल्या कारणानें कुणी तुजबद्दल त्यांच्या देखत बोलत नम्त. परंतु मला वाटतें, अद्यापि देखील त्यांना तुझी आठवण होते, पण ते लोकांपुढें बोलत नाहींत.

स्वामी—(कंठ सद्गदित होऊन.) केशव, त्या वेळेस मी तसा घट्ट मनानें गेलों, ह्मणून तर मला प्रभूची आज्ञा पाळितां आली. बाबा रे, अगदीं लहान होतों, तेव्हांपासून माझी या प्रभूवर पूर्ण भक्ति. मोठा झालों तरी माझी प्रभूवरची भक्ति ढळली नाहीं. कॉलेजांत गेल्यावर ग्रीस, रोम, इंग्लंड, हिंदुस्थान वगैरे देशांचे इतिहास वाचून हिंदुस्थानच्या स्द्यःस्थितीचें चित्र माझ्या डोळ्यांसमोर राही. माझा पक्का निश्चय झाला. आजन्म ब्रह्मचर्यव्रत धारण करून देशसेवा करायची. मला अद्यापि एका दिवसाची चांगली आठवण आहे. आमच्या कॉलेजला एक महिन्याची सुटी असल्या कारणानें मी गांवीं आला होतों. मी गांवीं आल्यावर एक दिवस देखील या माझ्या प्रभूची एकादष्णी चुकविली नाहीं. त्या दिवशीं दुपारीं माझीं अभ्यासाचीं बुकें घेऊन नेहमींप्रमाणेंच देवळांत जाऊन वाचीत बसलों होतों, उन्हाळा कडक असल्याकारणानें जरा डोळा लागला. तो साक्षात् श्रीशंकराची मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर दत्त ह्मणून उभी राहिली. प्रभूनें आपल्या गंभीर स्वरानें मला स्वप्नांतच जागें करून “ ऊठ, निजूं नकोस. पहा आपल्या या आर्यमातेकडे ! अरे आज २५ कोटि लोक या भरतखंडांत वास करीत आहेत, पण कुणाला देखील तिची काळजी नाहीं. जो तो स्वार्थांतच गुंग होऊन गेला आहे. दुष्काळ, दारिद्य वगैरे व्याधींनीं सर्व देश ग्रस्त झाला आहे. तरी तूं निजला आहेस ? बाबा रे, तूं लहानपणांपासून माझी सेवा करीत आहेस, याचप्रमाणें अनन्यभावें या आपल्या मातृभूमीची सेवा कर. जो मनुष्य आपल्या

मातृभूमीची सेवा प्रेमपुरःसर करितो, तो मला अतिशय आवडतो. त्यानें माझी निराळी पूजा करण्याचें कारण नाहीं. तूं जर माझा खरा भक्त असशील तर जपान देशांतील देशभक्तांसारखा परद्वीपास जाऊन तुला योग्य वाटेल त्या रीतीनें तेथें राहून, त्या देशांतील विद्याकला शिकून येऊन आपल्या या आर्यदेशांतील देशबांधवांस आपल्या विद्यांचा फायदा करून दे. काय करूं, परद्वीपास कसा जाऊं, मजजवळ पैसा नाहीं, अडका नाहीं, माझें वय लहान, असे विचार मनांत आणून उगीच बसूं नकोस, ही वेळ आहे. गेलेली वेळ पुन्हा येणार नाहीं. जो जो म्हणून तरुण गृहस्थ स्वदेशप्रीतीनें परस्थळीं जाऊन देशप्रीत्यर्थ कांहीं तरी खटपट करितो, त्यांचा पाठिराखा मी आहें. कसला विचार न करितां काय करावयाचें तें ठरवून टाक." अशा प्रकारें गंभीर स्वरानें आज्ञा करून प्रभूची स्वारी अदृश झाली. मी एकदम जागा झालों. माझ्या डोळ्यापुढची ती मूर्ति हालेना. पुष्कळ दिवस माझ्या मनांत या स्वप्नाबद्दल सारखे विचार चालू होते. पुढें एक तसाच सुयोग जुळून आला; आणि प्रभूची आज्ञा अक्षरशः पाळण्याची संधि मिळाली.

केशव—म्हणूनच का लग्न करावयाचें नाहीं असा निश्चय करून त्या वेळेस गेलास? तुला जर अमुक गोष्ट करावयाची होती तर तूं बाबांना त्याप्रमाणें सांगावयाचें होतेंस. त्यांनीं तुला अडथळा केला नसता.

स्वामी—मी एकदोनदां बाबांपुढें माझ्या स्वप्नाबद्दल बोललों, परंतु ते नुसतें—खुळा कुटला—म्हणून मला गप्प करीत. पुढें त्यांनीं लग्नाची तयारी केली, त्या वेळेस त्यांना मी निक्षून सांगितलें तरी त्यांनीं हट्ट धरिला. त्यांचा स्वभाव मला पक्का माहीत आहे. त्यांनीं एकदा एक गोष्ट करायची म्हणून ठरविल्यावर मग नाहीं म्हणण्याची कुणाची छाती नाहीं. रागाच्या भरांत

त्यांना मला माझें ऐकावयाचें असेल तर घरांत रहावें, नाहीं तर आपली वाट सुधारावी; असें निक्षून सांगतांच पडत्या फळाची आज्ञा ह्मणून जो एकदम त्या दिवशीं निघालों तो आज पुन: बारा वर्षांनीं या स्थलीं परत आलों.

केशव—पण दादा, तूं गेलास तेव्हां तुझ्याजवळ पैसा नव्हता, अडका नव्हता, तुला कुणाची ओळख नव्हती, तुला पुष्कळ कष्ट सोसावे लागले असतील ?

स्वामी—होय. माझ्याजवळ पैसा नव्हता, अडका नव्हता, हें खरें. परंतु माझा पाठिराखा साक्षात् प्रभू मला संकट-समयीं तारणारा होता; आणि मी सत्कार्यीं आयुष्य खर्च-ण्याच्या दृढ निश्चयानें निघालों होतों, मग बाबा कसलें दु:ख ? आणि कसले कष्ट. या दु:खकष्टांतच एक प्रकारचा आनंद असतो. मी गांव सोडून निघाल्यापासून एक दिवस देखील मला यातना ह्मणून माहीत नाहींत.

केशव०—पण तूं येथून गेलास कसा. मुंबई सोडून विलायतेस जाण्यास तुला पैसे कोणीं दिले.

स्वामी—अरे बाबा, एक दृढनिश्चय असल्यावर पैशाला काय तोटा ? येथून मुंबईस जाईतोंपर्यंत मजजवळ माझे खासगी पैसे होते. मी येथून निघालों तो इंग्लंडला जाण्याच्या उद्देशानेंच निघालों. मुंबइस माझ्या एका मित्राच्या घरींच उतरलों. दुसऱ्या दिव-शीं आपल्या प्रिन्सिपाल साहेबांस जाऊन भेटलों; त्यांना माझी सर्व हकीकत कळविली. आणि विलायतेस जाण्याचा माझा पक्का निश्चय झाला आहे, असेंही सांगितलें. आमचे त्या वेळचे प्रिन्सिपाल फार परोपकारी गृहस्थ होते. कॉलेजांत असतांना त्यांचा मजवर विश्वास होता. त्यांनीं पुढें एक फ्रेंच गलबत मुंबई बंदराहून निघणार होतें त्याच्या कप्तानांशीं माझी ओळख करून दिली. तो कप्तानही चांगला माणूस होता. त्यानें आपल्या गलबतावर मला एक हलक्या दर्जाची नोकरी

दिली. वाटेंत नोकरीवर असतानाच मला पुष्कळ प्रवासी लोकांची ओळख झाली. कामाचा मात्र मधून मधून त्रास होई, पण मी कधीं डगमगलों नाहीं. प्रवासाची इत्थंभूत हकीकत सांगत बसल्यास एक मोठा ग्रंथ होईल, म्हणून तुला थोडक्यांत सांगतों, मी ज्या गलबतावर होतों, त्याच गलबतांत एक सुखवस्तु इंग्रजी कुटुंब होतें. त्यांचें मजवर प्रेम जडलें. त्यांच्याबरोबरच मी इंग्लंडांत गेलों. तेथें त्यांच्या ओळखीनें एका कारखान्यांत माझा प्रवेश झाला. इंग्लंदांत मी दोन वर्षें राहिलों. तितक्या अवकाशांत मला फ्रेंच व जर्मन भाषा चांगल्या अवगत झाल्यामुळें, फ्रान्स, जर्मनी या दोन्ही देशांत बरींच वर्षें काढल्यावर अमेरिकेस जाण्याची एक सुसंधी मला मिळाली. अमेरिकेस मी पांच वर्षें होतों. अमेरिकेस असतांना मी बाबांच्या नांवानें एक पत्र धाडिलें होतें. त्यांत त्यांची अवज्ञा केल्याबद्दल त्यांची क्षमा मागून त्यांना माझी सर्व हकीकत कळविली होती. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका वगैरे देशांत माझी पुष्कळ मोठमोठ्या लोकांशीं आतां चांगली ओळख झाली आहे. त्या देशांत अभ्यासाकरितां राहिलेल्या पुष्कळ जपान आणि चीन देशांतील विद्यार्थ्यांशीं माझी मैत्री जमली आहे. त्यांनीं मला आपला देश पाहण्यास बोलाविलें आहे. पुढें अमेरिकेंत असतांना मला या माझ्या प्रभूची आणि माझ्या देशाची वारंवार आठवण होत असल्या कारणानें स्वदेशास येऊन कांहीं दिवस राहून प्रभूची आणि मातृभूमीची सेवा करावी अशा उद्देशानें पुनः येथें आलों आहें.

केशव०—मग आज घरीं येणार ना ? बाबांस मोठा आनंद होईल. आपल्याला अद्यापि पुष्कळ बोलावयाचें आहे. परस्थळीं तुला कसकसलीं संकटें आलीं, त्या वेळेस तूं काय

काय केलेंस, हें सर्व मला ऐकावयाचें आहे. घरीं आल्यावर सावकाशानें आपणास बोलावयास सांपडेल.

स्वामी—मी आजच घरीं येत नाहीं. मी आलों ह्मणून तूं बाबांना जाऊन आतांच सांगूं नकोस. सर्व कांहीं मीच होऊन करितों. तोंपर्यंत तूं गप्प बैस.

केशव०—बरें आहे. मी कोणापुढेंच तूं माझा दादा आहेस हें सांगत नाहीं. परंतु माझी एक विनंति आहे. उद्यां संध्याकाळीं येथें एक स्वदेशीवर सभा आहे, त्या वेळेस तूं सभेस यावेंस.

स्वामी—माझ्याबद्दल एक चकार शब्द तूं कोणाजवळ काढणार नसशील तर मी सभेस येतों. बरें आहे, उशीर झाला तूं आतां जा, आणि मला माझ्या उद्योगधंद्यास लागूं दे.

प्रवेश दुसरा.

स्थळः—बापूसाहेबांच्या घरांतील दिवाणखाना.

(दिवाणखाना उत्तम तऱ्हेनें शृंगारिला आहे; खुर्च्या रांगेनें समोरासमोर मांडिल्या आहेत. मध्यभागीं एक खुर्ची आणि एक टेबल व्यवस्थितपणें मांडिलें आहे. टेबलावर फुलांचे गुच्छ ठेविले आहेत. कृष्णाजीपंत, शेखमहमद, जानोजीराव, विनायकराव, गोविंदरावादि मंडळी खुर्च्यांवर बसली आहे.)

(बापूसाहेब घरांतून सजून येतात.)

बापू—काय कृष्णाजीपंत, टाईम होत आला. सगळी तयारी झाली आहे ना ?

कृष्णाजीपंत—हो; रावबहादूर आतां येतील.

विनायकराव—(कृष्णाजीपंतास) कांहो, रावबहादुरांची एकदम बढती झाली! अगदीं अन् एक्सपेक्टेड बुवा!

कृष्णाजीपंत—एक ग्रेड वाढली. मला वाटतं, गेल्या खेपेचा सगळा सारा चापून वसूल केला त्याचाच हा रिझल्ट.

विनायकराव—रावबहादूर मोठे कडक अम्मलदार, एवढा मोटा दुष्काळ! कित्येक जिल्ह्यांतून चार आणे देखील सारा वसूल झाला नाहीं, पण आमच्या रावबहादुरांनीं सबंध सारा, वसूल केला अं! अम्मलदार असावेत असे. पण काय हो गव्हर्नमेंटनें पण लागलीच त्यांचे सर्व्हिसेस् रिकग्नाईझ् केले.

कृष्णाजीपंत—त्यांची दक्षता पाहून कलेक्टर साहेबांनीं त्यांची स्पेशल रेकमेंडेशन केली होती. रावबहादूर गव्हर्नमेंटचे अगदीं ट्रस्टेड ऑफिसर्स पैकीं एक आहेत.

विनायकराव—तें असो; तुह्मी एखादें सर्टिफिकेट मिळविलें कीं नाहीं?

कृष्णाजीपंत—त्या फ्यामीन रिलिफच्या वर्कसबद्दल उत्तम सर्टिफिकेट रावबहादूरांकडून मला मिळालें आहे. कलेक्टर साहेबांस माझी स्पेशल इंट्रोडक्शन देखील त्यांनीं करून दिली आहे. परंतु आमचें नशीब उघडेल तेव्हां खरें.

(इतक्यांत वासुदेवराव आणि नारायणराव बोलत बोलत येतात.)

वासुदेवराव—प्रत्येक गांवांत सभा, जिकडे तिकडे स्वदेशी आणि बहिष्कार याशिवाय बोलणेंच नाहीं. शाळेंत जाणारीं लहान लहान मुलें देखील परदेशी वस्तूंस शिवत नाहींत. सबंध बंगाल देश आज जागा झाला आहे. कलकत्यांतील कालीदेवीच्या देवळांतील सभेची हकीकत वाचून आपण तर अगदीं आश्चर्य चकित झालों, आणि आक्टोबर १६ तारखेस संबंध बंगालभर लोकांनीं उपवास केला.

नारायणराव—यालाच ह्मणतात राष्ट्रजागृतीचा प्रभातकाल. बंगालचा कित्ता इतर सर्व प्रांतांनीं गिरविला आहे, देशभर

जिकडे तिकडे स्वदेशी सभा एकसारख्या भरत आहेत. आज आमच्या गांवांत देखील जंगी जाहीरसभा आहे.

केशवराव—इकडचें आटपून तिकडे जाऊं लवकर.

(दोघेही कृष्णाजीपंताच्या बाजच्या खुर्चीवर बसतात.)

कृष्णाजीपंत—काय वासुदेवराव नवीन कांहीं बातमी ?

वासुदेव—या दिवसांत नवीन बातम्यांना हो काय तोटा ? देशभर जिकडे तिकडे एक सारख्या स्वदेशी सभा भरत आहेत. रोज शेंकडों सभेचें रिपोर्ट वाचावयास सांपडतात.

कृष्णाजीपंत—पुरे बुवा, नको ती तुमची स्वदेशी सभा. कंटाळा आला या स्वदेशीचा. ऑफिसांतील आणखी एकादी कांहीं नवीन बातमी ?

नारायणराव—(बापूसाहेबांकडे जाऊन) नमस्कार रावसाहेब, हा सिरीमनी लवकर आटपेल ना ? तिकडे आहे स्वदेशी सभा तिकडे आह्मांला जावयाचें आहे, आपणांला देखील यावयाचें असेलच.

बापूसाहेब—मला बहुत करून येणें व्हावयाचें नाहीं.

(इतक्यांत एक शिपाई लगबगीनें येऊन बापूसाहेबांस नानासाहेब आले ह्मणून सांगतो. सर्व मंडळी उठून उभी राहते. बापूसाहेब दरवाज्यापर्यंत नानासाहेबांस सामोरे जातात.)

नानासाहेब—(बापूसाहेबांस पाहून) गुड् ईव्हिनिंग बापूसाहेब.

बापूसाहेब—गुड् ईव्हिनिंग.

(दोघें शेकह्यांड करितात आणि बोलत बोलत खुर्च्यांच्या दोन्ही रांगांमधून चालत जातात. आजूबाजूची मंडळी आदबीनें नानासाहेबांस सलाम करितात. नानासाहेब प्रतिसलाम करीत करीत, मधल्या खुर्चीवर जाऊन बसतात. बापूसाहेब बाजूच्या खुर्चीवर बसतात, बाकीची मंडळी बसते.)

बापूसाहेब--(उभे राहून) सभ्य गृहस्थहो, रावबहादुर नानासाहेब हे आपणांस सोडून दुसरीकडे जाणार आहेत. यांच्या जाण्यानें आह्मां सर्वांस अतोनात दुःख होत आहे. नानासाहेब हे अतिशय न्यायी, परम दयाळु, सहृदय, सरकारचे अगदीं विश्वासांतले अमलदार आहेत. असे अंमलदार या जिल्ह्याच्या पुण्याईनेंच आह्मांस इतके दिवस लाभले होते. जरी हे आह्मांमध्यें चार वर्षें होते, तरी यांचा सहवास आह्मांस अगदींच अल्पसा वाटतो. सभ्य गृहस्थहो, रावबहादुर नानासाहेब हे आमचे परमपूज्य बादशहा सातवे एडवर्ड यांच्या राज्यांतील बडे नेटिव्ह अधिकारी आहेत. यावरून इंग्रजसरकारचा न्यायीपणा व्यक्त होतो. सभ्य गृहस्थहो, इंग्रजसरकारच्या राज्यावर सूर्य कधीं मावळत नाहीं. आज चारी खंडांत इंग्रजसरकारचा दरारा आहे. अशा या इंग्रज सरकारच्या कृपाछत्राखालीं आह्मी आहोंत. (टाळ्या) इंग्रज सरकारच्या साम्राज्याच्या योगानें आह्मांस आगगाड्या, तारायंत्रें, पोष्ट वगैरे अनेक सुखांचा फायदा मिळाला. (टाळ्या) इंग्रजसरकारच्या प्रतापानें, देश अगदीं दरिद्री झाला आहे, तरी देशांत दंगेधोपे बिलकूल होत नाहींत. या इंग्रज सरकारच्या राज्यांत मोटार गाड्या झाल्या, बायसिकलें झालीं, इलेक्ट्रिक ट्रामकार्स झाल्या, अशा अगणित सुखांचा फायदा आह्मां हिंदुस्थानवासीजनांस झाला आहे. (हिअर हिअर) सभ्य गृहस्थहो, रावबहादूर नानासाहेब हे जरी पदवीधर नाहींत, तरी पण एवढ्या मोठ्या योग्यतेस चढले, हें इंग्रजी राज्याच्या न्यायीपणाचें द्योतक आहे. सुशिक्षित अशिक्षित, असा भेदभाव न दाखवितां योग्य मनुष्यास इंग्रजी राज्यांत न्याय मिळतो, हें नानासाहेबांच्या उदाहरणावरून व्यक्त होण्यासारखें आहे. (हिअर हिअर) नानासाहेबांच्या कारकीर्दींत आमचे पुष्कळ फायदे झाले आहेत.

मिठावरचा कर कमी झाला आहे. सभ्य गृहस्थहो, मीठ ह्मणजे प्रत्येक व्यक्ति मात्राचें जीवित्व. अशा या मिठावरचा कर कमी झाला याबद्दल रावबहादुरांचे आभार मानिले पाहिजेत. यांच्या कारकीर्दींत शिक्षणास उत्तेजन मिळालें. सभ्य गृहस्थहो, गेल्या दुष्काळांत अविश्रांत श्रम करून रावबहादुरांनीं एक पै देखील बाकी न ठेवितां सरकारचा सबंध सारा वसूल केला, यावरून आपल्या कामांत ते किती प्रामाणिक आणि दक्ष आहेत, हें व्यक्त होतें. सरकारांनीं त्यांच्या गुणांचें चीज केलें याबद्दल आपण सर्वांनीं सरकारचे आभार मानिले पाहिजेत. (टाळ्या) परमेश्वर रावबहादुरांस चिरायू करो, (टाळ्या) अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून मी आपली रजा घेतों.–बापूसाहेब बसतात.

शेखमहमद्—(उभा राहून) रावबहादुरांची बदली होते हें ऐकल्यापासून आमचे मनास बहोत कष्ट होतात. रावबहादूर बहोत थोर गृहस्थ आहेत, त्यांनीं आमचे दुकानांत पुष्कळ माल खरेदी केला होता. आमचेवर इनकमट्याक्स बसविला नाहीं. आह्मी मुसलमान लोक सरकारची प्रामाणिक प्रजा आहे. आमचेवर रावबहादुरांचे मेहेरनजर होती. रावबहादुरांनीं मला मुनसीपालिटींत कमिशनर नेमला होता. आह्मी त्यांचे फार आभारी आहे. अल्ला त्यांचें कल्याण करेल. (टाळ्या.)

नानासाहेब—(उभे राहून) सभ्य गृहस्थहो, बापुसाहेब आणि शेखसाहेब या दोघांनीं माझी स्तुति केली त्यास मी पात्र नाहीं. प्रमोशनला माझा नंबर मागें होता, तरी पण मला प्रमोशन झालें यावरून सरकार गुणाचें चहातें आहे एवढें सिद्ध होतें. (टाळ्या) आपली पूर्व पुण्याई फार मोठी ह्मणून आपणांवर इंग्रज सरकारचें राज्य आहे. (हिअर हिअर) पूर्वी स्वराज्यांत दंगेधोपे होत असत, वारंवार लढाया होऊन देशांत रक्तपात

होत असे. मी ह्मणतों शेवटच्या बाजीरावानें आमच्यावर महदुपकार केले. तो गादीवर आला ह्मणून आपणांस इंग्रजी राज्याचें सुख पहावयास मिळालें. शेवटचा रावबाजी पेशवाईच्या गादीवर आला नसता, तर आह्मी अफगाणिस्थान, इराण वगैरे देशांतील लोकांसारखे रानटी व अज्ञानी राहिलों असतों. ज्या बादशहाच्या राज्यांत आपण आहोंत त्याची आपण इमानेंइतबारें नौकरी बजावणें हा आपला धर्म आहे (हिअर हिअर) आणि मी सारा वसूल करण्याचे कामीं दक्षता दाखविली, त्यांत मीं फक्त माझें कर्तव्य केलें आहे. विशेष कांहीं केलें नाहीं असें समजतों. आपण माझा आज मान केला त्याजबद्दल मी आपला आभारी आहें. (टाळ्या).

(बापूसाहेब, नानासाहेबांचे गळ्यांत फुलांचा हार घालितात यानंतर पानसुपारी अत्तर गुलाबादि विधी होतात)

बापूसाहेब—(उभे राहून) आंत उपहाराची तयारी झाली आहे. तर मंडळींनीं अल्पसा फलाहार करावा अशी माझी विनंति आहे.

नानासाहेब—हो कांहीं हरकत नाहीं, चला.

वासुदेवराव व नारायणराव—(बापूसाहेबांस) आह्माला आतां गेलें पाहिजे. आह्मी जातों.

बापूसाहेब—काय लग्न घटिका टळते कीं काय. थांबा हो जाल ह्मणे.

नारायणराव—आज स्वदेशी सभा आहे. मी सभेस येतों ह्मणून केशवरावास सांगून आलों आहें. मला गेलेंच पाहिजे.

वासुदेवराव—मला देखील सभेस हजर राहिलें पाहिजे.

बापूसाहेब—ड्याम युअर स्वदेशी (तुमच्या स्वदेशीस आग लागो) तुह्मी देखील त्या केशवरावासारखे म्याड झालां वाटतं. काय करितां स्वदेशी घेऊन.

नानासाहेब—काय वासुदेवराव, आपण जाणार आहां का सभेस ? mind you are a Government servant (विचार करा आपण सरकारी नोकर आहांत.)

वासुदेवराव—स्वदेशीचा आणि गव्हर्मेंट सर्विसचा कांहीं संबंध नाहीं. आपण देखील सभेस यावयास कांहीं हरकत नाहीं. आपण येत असाल तर चला, आपण सगळे मिळूनच जाऊं.

नानासाहेब—छेः मी तर येत नाहींच, पण मी तुह्मांस सांगतों, तुह्मी जाऊं नये हेंच उत्तम.

बापुसाहेब—बरं वासुदेवराव मी येतों, एवढें टिफिन संपलें की जाऊं. चला, आंत तर, सर्व तयारी झाली आहे.

(सर्व मंडळी घरांत जाऊन बापुसाहेबांच्या घरांतील एका दाऊ-नांत एका वर्तुलाकार टेबलावर जाऊन बसते.)

(टेबलावर चिनी मातीच्या बशा, पेले, कांचेचे पेले आहेत कित्येक मोठाल्या चिनी मातीच्या आणि जस्ताच्या ताटांत मोठमोठाले रोट, बिस्किटें, फळफळावळ वगैरे भरून टेविलें आहे, मधून मधून कांहीं बाटल्यांतून तांबड्या रंगाचा कसलासा प्रवाही पदार्थ दिसतो आहे. नंतर मंडळी पुढें ठेविलेले पदार्थ खावयास लागते.)

नानासाहेब—बापुसाहेबांनीं अगदीं प्रिन्स्ली (दरबारी) थाट केला आहे बुवा.

बापूसाहेब—(हात जोडून) कसचं कसचं, गरीबाच्या घरांतील चटणी भाकर आहे, झालं.

जानोजीराव—(नानासाहेबांस) बापूसाहेबांच्या येथें सदा असाच थाट असतो.

नानासाहेब—पण बापूसाहेब, आजच्या प्रोसीडिंग्जची हकीकत बांबेच्या डेलींत येण्याची व्यवस्था केली ना ?

बापूसाहेब--या कामांत आहेत आमचे पंत तयार, त्यांनीं प्रोसि- डिंग्ज संपण्यापूर्वीच टेलिग्राफ ऑफिसला बॉय पाठविला देखील. काय कृष्णाजीपंत, आला कां तो छोकरा ?

कृष्णाजीपंत—अजून आला नाहीं, येईल.

नानासाहेब—सगळे स्पीचेस रिपोर्ट व्हावयाचे नाहींत हो!

कृष्णाजीपंत—साहेब, आपण त्यांची काळजी सोडा, मी एक दोन शब्द जास्तीच घातले आहेत.

नानासाहेब—(वासुदेवराव आणि नारायणराव यांस) कां आ- पली स्वारी स्तब्ध बसली आहे, करा सुरुवात !

वासुदेवराव—नाहीं, मी हे पदार्थ खात नाहीं.

विनायकराव—अलीकडे स्वदेशी चळवळ सुरू झाल्यापासून ही मंडळी केशवरावांच्या वर्गांतच दाखल झाली आहे.

बापुसाहेब—मग हळूहळू म्याड लोकांची संख्या वाढायला ला- गली ह्मणायची.

नारायणराव—तसं नव्हे, आह्मी स्वदेशीची शपथ घेतली आहे. यांत बराच परदेशी माल दिसतो. क्षमा असावी. आपलं चालूं द्या

नानासाहेब—एकूण हें स्वदेशीचें वेड बरेंच माजलें ह्मणायचें !

वासुदेवराव—आपण अलिकडे पत्रिका वाचलीत कां ? सबंध बंगाल देश आज खडबडून जागा झाला आहे. नुसते सुशि- क्षित लोकच नव्हे, तर अगदीं सर्व जातीचे सर्व दर्जाचे लोक आज स्वदेशभक्त बनले आहेत.

नानासाहेब—वर्तमानपत्रांवरूनच आपली माहिती ना ? पुरे. कुठलं स्वदेशीन् काय ? हे बंगाली लोक रजाचा गज करण्यांत फार वाकबगार. अहो ही स्वदेशीबद्दल चळवळ करणें ह्मणजे एखाद्या वृद्ध मनुष्याच्या रुपेरी मिशांना कलप लावून काळे भोर करण्याबद्दल प्रयत्न करण्यासारखें आहे.

(सर्व मंडळी हः हः करून हसते.)

बापूसाहेब—हें पहा नानासाहेब, हा शुद्ध वेड्यांचा बाजार आहे.

(इतक्यांत एक मुलांचा मेळा खालील पद ह्मणत येतो.

वासुदेवराव आणि नारायणराव-(एकदम उठून.) हा स्वदेशभक्तांचा मेळा इकडे आला; चला त्यांचें पद तरी ऐकूं या.

वासुदेवराव—(मुलांस) मुलांनीं आरंभापासून पद ह्मणा पाहूं.

(सर्व मुलें रांगेनें उभें राहून पद ह्मणतात.)

पद.

उठा उठारे, जागृत व्हारे, आपुल्या स्थितीची लाज धरा ॥
उद्योगाला कंबर बांधा, मिथ्या लज्जा दूर करा ॥ धृ. ॥
आर्यभूमिही स्वर्णरत्नमय गाजत होती कीर्ति पुरा ॥
सुवर्ण शेले रत्नें गेलीं सांप्रत आली दुष्ट जरा ॥ १ ॥
दारिद्र्याची स्वारी फडके तडके छाती धीर धरा ॥
धरावयाला अवसर न मिळे. मार्ग सुचेना कांहिं बरा ॥ २ ॥
प्लेग अवर्षण महामारिपरि संकट पर्वाणि नित्य धरा ॥
लक्षावधि जनसंख्या मरुनि मृत्युपुरि ही होत धरा ॥ ३ ॥
राजापासुनि रंक मानिती, जो गेला तो दिवस बरा ॥
येतो कैसा दिवस उद्यांचा हृदयीं चिंता करित घरा ॥ ४ ॥
खेतीवाडी लोक अनाडी, करिती त्यांना मार्ग बरा ॥
शास्त्रशुद्ध या घालुनि सत्वर चैन पुढेंहो स्वस्थ करा ॥ १ ॥
शास्त्र वाढवा, कला वाढवा, कामधेनु जी यंत्रकला ॥
कसें करा परि घरासि आणा, उद्योग मिळे तो सकलां ॥ २ ॥
सत्यनिष्ठता बंधुप्रीतिहि उद्यम साहस चित्तिं धरा ॥
कपट बुद्धि अणि आलस दुर्गुण हृदयांतुनि अजि दूर करा ॥ ३ ॥

एकी करोनी सर्व जनांची भेदभाव तो आजि विसरा ॥
बेकीनें घडि बिघडलि बसण्या मार्ग सुनिश्चित नच दुसरा ॥ ४ ॥
यांत्रिक नौका बोटि बांधुनि दुस्तर सागर पार तरा ॥
नानापरिच्या व्यापारांनीं, संपत्तीनें देश भरा ॥ १ ॥
अनेक परिच्या कारागिरिच्या गिरण्या देशीं उभ्या करा ॥
नानाविध सुत बारिक विणुनी देशीं कपडा तो पसरा ॥ २ ॥
लोखंडाच्या खाणी खणुनी यंत्रें देशीं सर्व करा ॥
लोखंडाच्या सडका बांधुनि, गाड्या पळवा भराभरा ॥ ३ ॥
व्यवहाराचें ज्ञान नीतिचें सर्व जनांला सुलभ करा ॥
भरतभूमिचे पुत्र होउनी भार जननिचा तरि उतरा ॥ ४ ॥

वासुदेवराव--शाबास मुलांनों शाबास ! हें घ्या तुह्मांस बक्षीस !

(एक रुपया काढून त्यांच्या हातांत ठेवण्यास जातो.)

एक मुलगा--अहो, हा रुपया तुह्मी देशी फंडास पाठवा. आह्माला नको तुमचा रुपया. आमच्यावर मेहेरबानगी करावयाची असेल, तर तुह्मी आजपासून परदेशी जिनसांस हात लावणार नाहीं, असा निश्चय करा ह्मणजे पुरे.

२ रा. मुलगा--आपण सर्व थोर लोक येथें आहांत, आपणा सर्वांस माझी अशी विनंति आहे कीं, आज थिएटरांत स्वदेशी सभा आहे, तर आपण तेथपर्यंत येण्याची मेहेरबानी करावी.

३ रा मुलगा--(इतर मुलांस) चला उशीर झाला. आपणांस सभागृहीं वेळेवर हजर राहिलें पाहिजे. (मुलें जातात.)

बापूसाहेब--अशा फंदांत पडून पोरेंही अशीं बिघडतात.

नानासाहेब--ह्या सभा आणि ही चळवळ हरप्रयत्न करून बंद केली पाहिजे.

वासुदेवराव—(आपल्याशींच) हे असे लोक आमच्यांत आहेत, हें हिंदुस्थानचें महा दुर्भाग्य, कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ. (उघड) आह्मांस सभेस गेलें पाहिजे, येतों आतां, चला नारायणराव.

(वासुदेवराव आणि नारायणराव जातात.)

नानासाहेब—(बाकीच्या मंडळीस) पीडा गेली. आमच्या मेरी मेकिंगला यांचें उगीच आब्स्ट्रकशन. आतां लेट अस बी फ्री.

(बाटलींतील दारू एक ग्लासांत ओतून)

बापूसाहेब--जंटलमेन आमचे गेस्ट नानासाहेब हे आपणांस सोडून जातात, यांजबद्दल आपणां सर्वांस फार वाईट वाटतें, आपल्या कंपनींतले एक गृहस्थ मिस होतात. मी नानासाहेबांची हेल्थ प्रपोज करितों.

(मंडळी आपल्याजवळच्या बाटल्यांतून पुढें ठेवलेल्या ग्लासांत दारू ओतून ती पितात.)

नानासाहेब--आमचे लिबरल होस्ट बापूसाहेब हे किती लिबरल आहेत, हें मीं नव्यानें सांगण्याचें कारण नाहीं. यांच्या लिबऱ्यालिटीचा आपणां सर्वांस पुष्कळदां अनुभव आला आहे, तर जंटलमेन अशा गृहस्थांची हेल्थ मी प्रपोज करितों.

(पुनः मंडळी बाटल्यांतील दारू ग्लासांत ओतून पितात.)

(नानासाहेब उभे राहून हातांत एक दारूनें भरलेला ग्लास घरून मंडळीस दाखवून)

Oh joy. oh joy. be merry in the hall.
Let us drink whisky champaign and all.

(सर्व मंडळी हाः हाः करून हंसते.)

विनायकराव—रावबहादूर शीघ्र कवि आहेत !

कृष्णाजीपंत—हो तर; आपणांस आजच कळलें वाटतें, ठीक !

नानासाहेब--अहो बापूसाहेब, हे फूल्स त्या सभेंत जाऊन काय काय करितात तें पाहिलें पाहिजे. तुह्मी जाऊन त्याचा इंन्कायरी करा.

बापूसाहेब--होय साहेब, मी जाऊन येतों तिकडे.

नानासाहेब--आपण तिकडे जाऊन या. आह्मी ही येतों आतां.

(सर्व मंडळी उठून आपआपल्या घराकडे जाते.)

प्रवेश तिसरा.

(स्थळ रस्ता—कांहीं मंडळी आपसांत बोलत येतात)

१ ला मनुष्य--काय सभा! काय सभा! केवढी गर्दी ही!! इतके लोक मी माझ्या बापजन्मीं देखील पाहिले नव्हते. प्रत्येकानें आपण देशींच माल वापरणार, परदेशी माल कधीं घेणार नाहीं; आणखी दारू ह्मणून कधीं पिणार नाहीं, ह्मणून आईभवानीची शपथ वाहिली अं! खरोखर या दारूच्या पाईं कितीतरी नुकसान झालें! आपण आतां कधीं दारू ह्मणून पिणार नाहीं! आणि परदेशी कपडा बी आपुण कधीं विकत घेणार नाहीं.

२ रा—अहो राव, परदेशी कपडा एकुच नव्हे. परदेशी माल कसला बी घेऊं नये.

१ ला—बरें; पण अहो, ही सभाबिभा आतांच कां झाली हो! आतांच समद्यांनीं सभा कां केली?

२ रा—अरे हें बघ; आपले सगळे पैसे जात्यात परदेशाला; आपण सगळे झालों गरीब, आपणांला खायला मिळायची बी मारामार; ह्मणून आपल्या शिकलेल्या लोकांनीं ही सभा करून परदेशी माल घेऊं नये ह्मणून ठराव केला!

४ था--होय बाबा, आपले लोक फार गरीब होऊं लागले. कायहो थोडा पाऊस बंद झाला, कीं उडाली सगळ्यांची तिरपीट !

१ ला--होय हो, पण हा ह्मणतोय आपला सगळा पैसा जातोय परदेशाला हे कसेंहो ? आपण जो माल घेतों, याचा पैसा जातो मारवाड्याकडे आणि दुकानदाराकडे.

२ रा—अरे हें बघ आपला पैसा जातो मारवाड्याकडे; हा मारवाडी जातो मुंबईला आणि तेथल्या व्यापाऱ्याकडून आणतो माल, आणि त्याला देतो पैसा, आणि तो मुंबईचा व्यापारी आणतो परदेशाहून माल. ह्मणजे हें बघ आह्मी देतों पैसे मारवाड्याला आणि तो मारवाडी नेऊन देतों पैसे मुंबईच्या व्यापाऱ्यांना व तो व्यापारी नेऊन देतो पैसे परदेशाला, असा चालला आहे आपला सगळा पैसा परदेशाला. असें सांगितलें नाहीं कां केशवरावांनीं ?

४ था—(मान हालवून) होय राव. सदबांचें ह्मणणें रास्त आहे.

२ रा—अहो, त्या केशवरावानें सांगितलें नाहीं कां, सगळी आपली धनदौलत परदेशाला जाऊन आपल्या हातांत रहात्याल काचेचे तुकडे ह्मणून; आणखी त्यानें सांगितलें कीं, आपलें सोनेंरुपें चटसारें निघून गेलें ह्मणून.

१ ला--अरे हें बघ, हे बामण आहेत लइ लबाड. आमच्यापुढें बोलत्याती एक आणि आपण करत्याती बावगेंच.

तिसरा--अरे कांहीं बामण तसे असत्याल, ह्मणून काय झालं; सगळे खोटें बोलत्यात असें नव्हे. त्यो केशवराव भला माणूस, त्यो कांहीं खोटं बोलत नाहीं.

१ ला--अहो केशवराव एक द्या सोडून, त्यो लेंकाचा नानासाहेब आहे ना; त्या लेकानं तिथें स्टोअरमध्यें जाऊन झोकली होती दारू आणि मग येतांना वाटेंत गेल्या झुकांड्या आणि मग तें पलीकडचं चिंचेचें झाड आहे ना, त्याच्याजवळच्या गटारांत पडला.

४ था---लई खोड मोडली ल्येकाची, पण पुढें काय झालं ?

१ ला---आणि मग काय ह्मणतां ! लेंकाचा लागला ओरडायला. मी तकडून टांगा घेऊन येत होतों. माझ्या हातां पायां पडूं लागलान् काय, आणून घातला त्याला टांग्यांत आणि टाकला घरीं आणून. कसं गटाराच्या पाणीनं अगदीं आंग भरून गेलं होतं.

२ रा---तुह्माला आणखी एका बामणाची मजा सांगायची राहिली आहे. तो विजारन् बूट घालून जात असतो कीं बामण त्या मार्केटाजवळ घर आहे त्याचें. त्यो बामण रोज रात्रीं नऊ वाजतां आमच्या स्टोरांत येतो. आमच्या कारकुनांची त्याची लय ओळख आणि त्याच्याकडून घेतो दारूच्या बाटल्या. एक दिवस आमच्या कारकुनानें घेतली होती रजा आणि मी एकटाच होतों स्टोरांत. ही स्वारी आपली हळूच आली कीं ९ वाजतां, आणि मग कारकून नाहींत कां ह्मणून विचारलें, मी ह्मणालों कारकून गेल्यात ती. तुमाला काय माल पाहिजे, पण त्योकाचा बोलचना. आह्मासनी ठाऊक या बच्याजीला हवी आहे बाटली ह्मणून, मग काय ? हें काय, हें काय, करीत करीत आला कीं एका बाटलीपाशीं, उचलली ती बाटली आणि अचुक किंमत दिली माझ्या हातांत आणि मुकाट्यानें आपला निघून गेला!

३ रा---अरे हें बघ १।२ बामण तसे असत्याल, कबूल, ह्मणन समदे असेच करत्याल कीं काय ?

१ ला---अहो असं नाहीं राव, हे समदे लोक आहेत श्रीमंत. यॆच्यापाशीं आहे पैसा, हे घेत्यात विलायतीमालच. बूट पाटलूण घालून करत्यात यस फस, आणि आह्मां गरीबांना मात्र सांगत्यांत तुह्मी विलायती माल वापरूं नका, दारूं पिऊं नका ह्मणून, आपण यांच ऐकणारच नाहीं.

२ रा---अरे असं नव्हे, आपण समद्यांनीं वाहिली आहे भवानीची शपथ, आतां आपण यांच ऐकलंच पाहिजे.

१ ला—कसली शपथ लावली आहे राव, आमच्याकडून घेव विला शपथ आणि आपण शपथ घेतली तरी चि कांहीं नाहीं. संध्याकाळ झाला कीं गेलेच स्टोरांत !

४ था—हे बघ आपल्याला ते समदं चांगलं सांगतात ना ? मग आपण त्यांचं एकल्यास आपलं काय बिघडणार ? त्यांच पाप त्यांच्यापाशीं, आपल्याला काय ?

१ ला—आपण नाहीं ऐकणार या लोकांचं, बोलत्याती एक आणि करत्याती एक.

३ रा—हें बघ, केशवराव तरी चांगला माणूस हाय ना ?

१ ला—होय देवमाणूस, कबूल.

३ रा—मग आपण समदे मिळून केशवराव जसं सांगतील तसं करायचं बरं कां, आणखी ते स्वामी महाराज आले आहेतनां त्यांच्याकडे घेऊन जाऊं केशवरावांना आणि मग स्वामींना सांगूं : सगळे लोक लबाड आहेत. दारु पितात, विलायती कपडा चोरून वापरत्यात म्हणून, आणि मग स्वामीमहाराज सांगतील तसं करायचं. का रे ये सदबा ?

१ ला—हो कबूल. स्वामी महाराजांचं आणि केशवरावाचं आपुण ऐकणार.

२ रा—मग चला जाऊं सगळे स्वामीमहाराजांकडे.

३ रा—मग बोला जय भवानी म्हणून.

(सगळे जय भवानी, जय भवानी, करीत जातात.)

प्रवेश चवथा.

स्थळ—बापूसाहेबांचें घर.

(बापूसाहेब एकटेच ओटीवर हळूहळू पावलें टाकीत फिरत आहेत.)

बापूसाहेब—(आपल्याशींच) काय करावें; हें स्वदेशीचें वेड या लोकांना कोठून लागलें. उठला सुटला आपला प्रत्येक मनुष्य ह्मणतो घ्या स्वदेशी माल. त्या म्याड केशवरावाचेंच सगळें ह्मणणें खरें होण्याची वेळ आली ! परवां त्या सभेंत तसें बोललों तें योग्यच; सभेंत जर विरुद्ध कांहीं तरी बोललों असतों, तर मंडळीनें कांहीं बोलूं दिलें नसतें; बरें पण सभेंत आह्मीं तसें बोललों ह्मणून काय झालें ? घरीं येऊन आपण करावें असेंच अगदीं उलट. घरीं एक देशी कपडा ह्मणून ठेवणार नाहीं. या लोकांची मोडतो खोड. आतां सगळ्या विलायती मालांनीं भरतो घर. वरून वरून पुन्हां आपला देशी आव आहेच. हो मला तर आतां कपडे शिवायचे आहेतच. हे सगळे शिवतों विलायती कापडाचेच आणि कोणी विचारल्यास सांगावें माझ्या मनाजोगता देशी माल मिळाला नाहीं ह्मणून केलें, ह्मणजे झालें पापक्षालन. आमची एक खुबी आहेच, होतां होईल तों देशी मालच वापरावयाचा, असें यांचें ह्मणणें आहेना ? तर मग आह्मी असें करणार, एखादी घेणार देशी काड्याची पेटी आणि बाळगणार सदोदित आमच्या खिशांत, आणि जर मग लोकांनीं विचारलं, तर त्यांना दाखवावी ती काड्याची पेटी आणि मग सांगावें, बघा आह्मी वापरतों देशी माल; झालें. हो आणखी एक गोष्ट आहे. आमच्या मनांत कपडे शिवावे असें आलें ह्मणजे या देशी स्वदेशी ह्मणणाऱ्या लोकांना सांगावें कीं;

आह्मांला आमच्या मनाजोगता देशी कपडा घेऊन द्या, आह्मी देशी माल वापरायला तयार आहोंत ह्मणून. कदाचित् हे लोक घेऊन येतील बराचसा देशी माल, पण किल्ली असते आमच्या जवळच—मग करावी सुरवात. हा माल चांगलाच नाहीं, हा अगदीं वाईट आहे, हा वूलन कपडा नव्हे, अशी कांहीं तरी खोड काढिली ह्मणजे झालें. हो आमच्या मनाजोगता माल आह्मींच निवडणार ना, मग काय ? कोणताच देशी माल आमच्या मनाजोगता नाहीं ह्मणून सांगितल्यास सगळेंच मिटलें.

(इतक्यांत सावित्रीबाई येते.)

सावित्रीबाई—कसला विचार चालला आहे तो ? एकसारखें मनांतल्या मनांत कांहीं तरी चाललें असतें. काय विचार ते मला सांगावेत.

बापू—काय सांगावयाचें, तुह्मां बायकांना काय कळतं ? ह्मणे कसले विचार ते मला सांगावेत. विचार नाहीं न कांहीं नाहीं.

सा०—नाहीं सांगत तर नको; पण हें पहा विश्वासाला नवीन कपडे करून द्यावेत, त्याला सारी मुलें विलायती ह्मणून हिणवितात; त्याला आपण देशी कपड्याचा पोषाख करून द्यावा.

बापू—काय शिंचा त्रास हा; जिकडून तिकडून ह्या देशी मालानें माझें डोकें उठविलें.

सा०—काय झालें डोकें उठायला ? देशी माल काय करील त्याला, आणि त्यांत काय झालें ? देशीच माल वापरला तर सोईत संसार होऊन जवळ ४ पैसे तरी शिल्लक राहतील.

बापू—आली आहे शास्त्र शिकवायला मला ! बस बस, माझ्या मनांतून पैसे घरीं ठेवायचेच नाहीं; मग ?

सा०—असें काय करायचें तें ? चार पैसे आमचे आमच्या जवळ राहिल्यास काय वाईट ? आणि परवां आपणच सभेंत जाऊन

'देशी माल वापरावा' ह्मणून अगत्यानें लोकांना सांगितलेंत. ह्मणे कीं,--

बापू--तेथें तसें बोललों ह्मणून काय झालें? सभेस गेल्यावर तसें बोलावेंच लागतें आणि घरीं आल्यावर असेंच केलें पाहिजे. हें पहा आतां झाली विश्वासाची परीक्षा पास; तो जाणार आतां कालेजांत, तेव्हां त्याला जर असले देशी कपडे शिवून दिले, तर साहेब त्याला घेणार नाहीं कालेजांत. आणि आपल्या मनांतून तर त्यानें कालेजांत जाऊन मोठमोठ्या परीक्षा द्याव्यात असें आहे ना?

सा०—हो; पण हें काय बाई? साहेब कां देशी कपडे अंगावर घालून येऊं नको ह्मणून ह्मणतो कीं काय? कांहीं तरी सांगायचें झालें. मी किती जरी वेडी असलें तरी मला एवढें कळतें. हो पण तें असो. परवांच्या दिवशीं आहे मामंजींचें श्राद्ध, तेव्हां ह्मणतें शिरापुरीवरच भागवावं, ती विलायती साखर आणूं नये.

बापू--हां, हें एक दुसरें खूळ आहेच. मला शिरापुरी बिलकूल आवडत नाहीं, आपण करविणार श्रीखंडपुरी.

सा०—पैसा खर्चायला आपण समर्थ असल्यास वाटेल तें करवा. माझी कांहीं हरकत नाहीं; पण ती विलायती साखर घरांत आणायची नाहीं. विलायती साखरेंत गाईचें रक्त आणि हाडांची पूड घालितात ह्मणे! छे छे, काय भलत्यांनीं कसलें पाप हें. ती साखर तर आपण डोळ्यांनीं दिखील पाहणार नाहीं.

बापू--हें एक तिसरें खूळ, हें कुणीं आपणांस सांगितलें.

सा.—परवां बाबासाहेबांच्या घरीं हळदकुंकवास गेलें होतें तेथें सगळ्या बायका जमल्या होत्या; त्या वेळेस बाबासाहेबांच्या सुनेनें सगळ्यांस जमवून स्वदेशी मालच कां वापरावा, परदेशी घेऊं नये, साखर कशी करतात, केशर कसें करतात, हें सर्व

सांगितलें; वर्तमानपत्र दिखील वाचून दाखविलें. तें ऐकल्यापासून माझा तर निश्चय झाला आहे, कीं विलायती जिनसांना हात दिखील लावूं नये ह्मणून.

बापू--तुह्मीं साखर सोडा, आह्मी तर त्या दिवशीं श्रीखंडपुरीच करविणार.

सावित्री—कसला हट्ट हा ! ब्राह्मण जेवावयाचे देखील नाहींत.

बापूसाहेब--काय सांगतेस चार आणे द्यावयाच्या ठिकाणीं आठ आणे दिले कीं बस. कोणता का भट्ट येईना आपसूक विलायती साखर खाऊन जाईल. त्यांचें तरी काय नडलें आहे देशी जिनसावांचून ? यजमानांची तब्येत पाहून वागण्यास भटजी तयारच.

(इतक्यांत विश्वास नुसता एक सदरा आंगांत घातलेला असा येतो)

बापू—अरे विश्वास असा कोणीकडे गेला होतास ? आंगांत कोट नाहीं, बूट नाहीं, डोक्यावर टोपी नाहीं, ही अशी स्वारी कोठें गेली होती ?

विश्वास--प्यांट आणि बूट घालून गेल्यास रस्त्यांतून मुलें साहेब साहेब ह्मणून पाठीं लागतात, आणि परवां सभा झाल्यापासून मी तर निश्चय केला आहे कीं, देशी कपडेच घालावयाचे. विलायती मालाला ह्मणून शिवायचा नाहीं.

बापू—अरे हे असले वेडे विचार सोडून दे, तुला कालेजांत जायचें आहेना ? मग तेथें तर विलायती कपडे आंगावर घातल्यावांचून चालायचें नाहीं.

विश्वास—छे तसें नव्हे. तो काळे आणि देशपांडे वगैरे सर्व मंडळींनीं देशी कपडे केले आहेत, त्यांना देखील कॉलेजांत जावयाचें आहे, आमच्या देशचे कपडे आह्मी वापरल्यास साहेबांचें काय जातें ?

सा०—बरें आहे, पण तुझी टोपी रे कुठें आहे ? असाच उघडा-बोडका गेला होतास काय ?

विश्वास—त्या मंगळवारांत देशपांड्यांच्या घरीं गेलों होतों, त्या आळींत विलायती जिनसांची होळी झाली, त्यांतच एका मुलानें माझी टोपी टाकून दिली. मला कांहीं वाईट नाहीं वाटत. एकदाची जवळची पीडा गेली.

बापू—अरे, आतां तुझे कॉलेजला जाण्याचे दिवस तर अगदीं जवळ आले, तुला नवीन कपडे केले पाहिजेत. रामाला बरोबर घेऊन जाऊन तुला कसल्या तऱ्हेचा नमुना पाहिजे, तसलें कापड–ध्याकर आणि कोच्या–दुकानांतून आण जा. आणि एक खिस्टीची इंग्लिशमेक् टोपीही आण तुला. कपडे आज शिवायला दिले ह्मणजे सर्व कपडे ८ दिवसांत येतील तयार होऊन.

विश्वास—बाबा, मी बाजारांत जाऊन स्वदेशी दुकानांतून एखादें देशी कापडच घेऊन येतों. मला चालतील त्याचे अंगरखे.

बापू—तूं रामाला तर बोलाव इकडे, तुला कळत नाहीं, मी करतों सारी व्यवस्था. [विश्वास जातो.]

सावित्रीबाई—त्याच्या मनाप्रमाणें त्याला कपडे करूं द्या. तो ह्मणतो आहे ना देशी कपडे करावयाचे ह्मणून, मग इकडचा कां असा आग्रह ?

बापू—ज्या गोष्टींत आपणाला कळत नाहीं, त्यांत माणसांनीं तोंड घालूं नये.

(रामा आणि विश्वास येतात.)

बापू—अरे रामा, या विश्वासाबरोबर स्टोअरकडे जा, आणि मी ही चिठ्ठी देतों ती नेऊन तेथील कारकुनापाशीं दे, आणि तो जो माल देईल तो घेऊन ये, ही घे चिठ्ठी (एका कागदावर कांहींसें लिहून त्याच्या हातांत देतो.)

(रामा जाऊं लागतो निघतो त्यास परत बोलावून)

अरे थांब, त्यांत एक लिहावयास विसरलों. हें पहा आणखी दोन रुपयांची सफेत दाभोटी साखर आणि १ रुपयाचें केशर घेऊन ये, विसरूं नकोसहो ?

रामा--(जरापुढें येऊन) विलायती मालाला तर हात देखील लावणार नाहीं ह्मणून मी काल शपथ वाहिली आहे. आणि स्टोरांतून आणायची साखर ती तर विलायती, कसें करूं ?

बापू--वेडा कुठला, शपथ कसली व काय ? आण जा.

रामा--नाहीं, धनीसाहेब, मी त्या स्टोरांतून जातांना आमच्या जातीच्या लोकांनीं मला पाहिल्यास मला वाळींत टाकतील. विलायती सामान आणायचें सोडून वाटेल तें काम सांगा; मी करायला कबूल आहे.

सा.--कुणब्या माळ्यांना देखील परदेशी मालाचा तिटकारा, आणि इकडे त्याच्याबद्दल केवढें प्रेम ?

बापू--सर्वांनीं जणूं काय कट केला आहे. मला वाटतें हिनें याला पढवून ठेविलें आहे. बरे मीच जाऊन घेऊन येतों सगळा माल.

प्रवेश ५ वा.

स्थळ—रस्ता.

(गणेश भट आणि वचंभट दोघेही जेऊन पोटावर हात फिरवीत येतात.)

गणेशभट—हें पहा वचंभटजी हा नारायण भट अगदीं वेडा! शुद्ध मूर्ख बेटा, याला कशाला पाहिजे ही रिकामी उठाठेव, यजमानाचं धोरण पाहून चालावं झालं !

वचंभट—हो माझंही असंच ह्मणणं आहे. आपण जर असा हट्ट धरिला तर उपाशी मरूं. ते बडे लोक, त्यांच्या घरीं

जाऊन आह्मी साखर खाणार नाहीं, केशरास शिवणार नाहीं, असा जर हट्ट धरिला, तर ही भिक्षुकी चालावी कशी ?

गणेशभट—ही नारायणभटाची स्वारी गेली तरी कुठें ? असा उपाशी पानावरून उठून जाणें अगदीं गैरशिस्त !

बचंभट—जरा त्याच्या घराकडे तरी चला जाऊं, उपाशीं पडला आहे कीं काय ब्राह्मण ? पाहूं तर चल.

(दोघेही जरा पुढें जातात तों नारायण भटजी तिकडून लगबगीनें येतो. त्यास-)

गणेशभट—अरे नारायणभट, अहो जमदग्नि महाराज, या इकडे.

नारायणभट—(त्यांच्याजवळ येऊन) कां जेवण झोडपून आलां वाटतं, त्या बटलरानं तुह्मांला बाटविलन तरी तुह्मी आपले मुकाट्यानें त्यांच्या येथें जेवून आला नां ? त्यांच्या घरीं जेवला नसतात तर काय उपाशीं पडलां असतां कां?

बचंभट—पण अरे, तूं अझूनि उपाशीच कां ? कसला वेडेपणा हा, जेवण सोडून कां ब्राह्मणानं पानावरून उठावं ?

नारायणभट—अरे नीच, विलायती साखर खाऊं नको ह्मणून सर्व भरतखंडभर ध्वनी होत असतां तुह्मी तोंडपुजे ब्राह्मण यजमानांची मर्जी बिघडेल ह्मणून स्वतःची जात बिघडविण्यास दिखील तयार ! अरे परवांच कीरे श्री० शंकराची शपथ घेतली ! छेः !

नारायणभट—अरे हा सर्व धर्माधर्म आतांच आला आहे. गेल्या वर्षीं बाबासाहेबांच्या येथें सहस्रभोजन झालेलं आठवतं कां, त्या वेळेस कसली साखर वापरली होती ? तेव्हां कसा जिलिबीवर हात मारलास ? ती साखर व ही कां निराळी ?

नारायणभट—आतां सगळ्यांना कळून चुकलं आहे कीं, ती साखर परदेशी ह्मणून, केसरी पत्रांत ती कशी करतात हें छापून प्रसिद्ध सुद्धां झालं. अरे गाईच्या रक्तांत तयार झालेली साखर तुह्माला फारच गोड लागते नव्हे !

वचंभट---हें पहा नारायण, आमच्या वडिलांनीं कां ही साखर अपवित्र मानली होती ! साक्षात् देवाच्या नैवेद्याला देखील ही साखर चालते. अलीकडे आपली ही देशी चळवळ निघाली आहे, तिचे हे सारे खेळ. ह्मणे साखर करितांना गाईचें रक्त घालतात, तर मग आजपर्यंत कसे खात आलां हो साखर ? आणि केसरी कर्ता काय, साखर कशी करतात ती पाहयला गेला होता ? साखर आहे विलायती, तेव्हां तिच्याबद्दल असं कांहीं तरी लिहिलं ह्मणजे लोक घेणार नाहींत, ह्मणून असं लिहितात.

नारायणभट—मी तर बुवा श्रीशंकराची शपथ वाहिली आहे, विलायती साखरेला शिवणार नाहीं ह्मणून, मी कधींच ती खाणार नाहीं.

गणेश—अरे बाबारे उपाशीं मरशील, यजमान मिळायचे नाहींत यजमान.

वचंभट---अरे नारायणभट हें पहा; यजमानांच्या मर्जीप्रमाणें वागलें ह्मणजे सगळें चांगलें असतें. हें पहा आज तूं जर शेवट-पर्यंत असतास तर तुला देखील रुपाया दक्षिणा मिळाली असती. इकडे जेवणापरीस जेवण गेलें आणि दक्षिणेपरीस दक्षिणा गेली.

(इतक्यांत शंभू शास्त्री येतात.)

नारायणभट—(रागानें) आगलागो अशा जेवणाला ! नको ती दक्षिणा आणि नको असलं जीवित्व ! अरे ही श्वानवृत्ती करून हें पोटच जाळायचंना ! काय शिंचा ! खालं तर विलायतीसाखरच खाल्ली पाहिजे, नाहीं तर आमच्या येथें जेवूं नये ह्मणून सांगतो. अरे अगोदर जेवायला सांगून ब्राह्मणाचा असा मानभंग करतोस, कसला दृष्ट हा ! मी श्रीखंड खात नाहीं ह्मणून स्पष्ट सांगितलं, ती विलायतीसाखर नको, माझ्यानें खा-

वत्रत नाहीं ह्मणून सांगतो आहे, तरी आपला हट्टानें पानांत आणून ओततो आहे. कसला आग्रह हा? हा आग्रह नव्हे हा दुराग्रह? आपण बाटला आणि दुसऱ्यास बाटवूं पहातो आहे. आणि तुमच्यासारखे भूसुर त्याला मदत करितात. ते पूर्वीचे वसिष्ठ वामदेवादि महातपस्वी कुणीकडे, आणि ४ पैशांच्या ऐवजीं ८ पैसे दिले कीं वाटेल तें करायला हपापलेले त्यांचेच वंशज तुह्मी कुणीकडे? अरे आपल्याला कां हे पैसे घेऊन जाळायचे आहेत, आणि अशा दक्षिणेच्या पैशानें तुमची तुमडी कशी भरते? मरेपर्यंत तुमचें दारिद्य कांहीं तुह्मांस सोडीत नाहीं, आणि वरती हें श्ववृतीचें आणि धर्मघाताचें पातक मात्र तुमच्या कपाळीं बसणार. तुह्मी धर्मगुरूना? धर्माची किल्ली तुमच्या हातांत; ती आण्याच्या ठिकाणीं दोन आणे दिले कीं वाटेल त्याच्या हवालींकरितां? धिःकार असो तुमच्या जीवित्वाला!

शंभूशास्त्री—अरे, झालं काय, इतका कां संतापला आहेस? अरे, अति सर्वत्र वर्जयेत्! रागाच्या ताब्यांत बुद्धि जाऊं देऊं नये. अरे, गणेश भट, काय झालं रे, सगळ सांग पाहूं.

गणेशभट—हें पहा, शास्त्रीबुवा, आज होतं बापूसाहेबांच्या वडिलांचं श्राद्ध, चार ब्राह्मण सांगितले होते; आह्मी होतो त्यांत. त्यांच्या येथें आज होता श्रीखंडपुरीचा बेत. सगळयांच्या पानांत वाढीत आल्याप्रमाणें याच्याही पानांत श्रीखंड वाढायला आले, त्या वेळेस यानें—विलायती साखर जर यांत घातली असेल तर माझ्या पानांत वाढूं नका—ह्मणून सांगितलें. यजमानानीं चालविला आग्रह—किती जरी आग्रह केला तरी होणें नाहीं, शपथ केली आहे, विलायती साखर खात नाहीं—अशा प्रकारें यांनींही आग्रह धरिला. हो ना ह्मणतां ह्मणतां दोघेही आले रंगांत. शेवटीं यांच्या पानांवर श्रीखंड तर वाढलेंच. हा त्याला हात लावीना. मग यजमानांनीं सांगितलं निक्षून. खायची असेल तर विलायती

साखरच खावी, नाहीं तर जावें निघून. मग काय, हा जमदग्नीचा अवतार, स्वारी उठली पानावरून आणि तडक निघून गेली घराकडे.

शंभूशास्त्री--एकूण फार वाईट झालं.

बचंभट--पुढें काय म्हणतां बाईसाहेब रागावल्या! त्या माउली-च्या डोळ्यांतून घळघळा अश्रू येऊं लागले, हें यजमानांनीं पाहून जेवण संपताच दिली प्रत्येकाला एकेक रुपया दक्षिणा, आम्ही आपला तो रुपया लावला कंबरेला, आणि " आतापिर्भक्षितं येन वातापिश्च महबलः अगस्त्येन प्रसादेन भोजनं मम जीर्यते " म्हणत म्हणत आलों आपले बाहेर.

शास्त्रीबुवा--एकूण तुम्ही झोडलीतच विलायती साखर, छे नुक-ती परवा घेतली होतीना रे शरथ! अरे ब्राह्मण असे झाले म्हणू-नच ही दशा तुमची.

गणेशभट--त्यांत काय झालें शास्त्रिबुवा?

बचंभटजी--शास्त्रीबुवा, आम्ही जर त्यांच्याकडे जेवलों नसतों, तर आम्हांला कांहीं रुपया मिळाला नसता.

शास्त्रीबुवा--आग लागो असल्या रुपयाला! बरं आहे, ते स्वामीमहाराज आले आहेत, आज समस्त ग्रामस्थांची सभा आहे. सर्वांनां स्वामींची आज्ञा आहे कीं, सर्वांनीं हजर अस-लंच पाहिजे; मग चला आपण सगळे तिकडेच जाऊं.

गणेशभट--स्वामीमहाराज! हे कोण स्वामी?

शास्त्रीबुवा--त्या श्रीशंकराच्या देवालयांत उतरले आहेत ते.

बचंभट--हो हो, त्या देवळांत एक संन्याशी येऊन बसला आहे खरें. पण त्याचा कांहीं थाटमाट दिसत नाहीं; बरोबर लवाजमा कांहींच नाहीं.

शास्त्रीबुवा--हो तेच ते स्वामीमहाराज, त्यांनीं आज सभा बोलाविली आहे.

बचंभट—ब्रह्मभोजन घालणार आहेत की काय ? ठीक. पण (हात हालवून) जवळ कांहीं पुंजी असेलसें वाटत नाहीं.

नारायणभट—अरे बचंभट, अरे म्हातारा झालास, स्मशान जवळ केलेंस, तरी पैशाची आशा सुटत नाहींना ? छेः छेः कसला लोभ हा, 'लोभ मूलानि पापानि' एक पैशाचा लोभ लागला म्हणजे मनुष्य काय करील आणि काय न करील.

शास्त्रीबुवा—तेथपर्यंत तर चला, त्यांनीं बोलावलं आहे. आपण गेलों म्हणजे झालें.

(सगळे जातात.)

प्रवेश ६ वा.

स्थळः—रस्ता.

केशवराव—(एकटेच) परमेश्वराची लीला अगाध आहे. त्या सच्चिदानंद प्रभूच्या मनांत आल्यावर काय होणार नाहीं ? जो अखिल चराचराचा प्रभू, ज्याच्या इच्छा मात्रें करून या अखिल विश्वाचे व्यापार चालू आहेत, त्याची कृपा होण्याचा मात्र अवकाश, या आमच्या गांवींच तीन महिन्यामागें काय स्थिति होती ! स्वदेशीच्या नामोच्चारानेंच कित्येकांचें डोकें दुखावयास लागे. स्वदेशनामाचा उच्चार करणारा मनुष्य या लोकांना वेडा दिसे. कित्येक विद्वान् गृहस्थ अर्थशास्त्र पुढें करून, कित्येक आंकडेशास्त्राच्या मागें लपून, या स्वदेशी प्रयत्नास विफल करण्याचा प्रयत्न करीत. कांहीं स्वार्थसाधु लोक अज्ञान देशबांधवांस, भलतेंसलतें सांगून सरकारचा रोष होईल, आपल्या पोरांबाळांना नोकऱ्या मिळणार नाहींत, अशा थापा देऊन स्वदेशी चळवळ हाणून पाडण्याचा प्रयत्न करीत. पुष्कळ खेडगळ लोकांना या स्वदेशी चळवळीचा अर्थच

कळत नसे, कित्येक आपमतलबी स्वार्थपरायण मुसलमान लोकांनीं आपल्या देशबांधवांस ही हिंदु लोकांची चळवळ आहे, ही चळवळ केल्यानें मुसलमान लोकांचा तोटा होणार आहे, या चळवळीपासून अलिप्त राहिल्यास, मुसलमान लोकांवर सरकारची बहाल मर्जी होऊन मोठमोठाल्या नोकऱ्या मिळतील, अशा बाता सांगून त्यांस या चळवळींत सामील न करण्याबद्दल विश्वप्रयत्न करून पाहिले; परंतु या साऱ्या प्रयत्नांचा शेवट काय ? जिकडे तिकडे स्वदेश या शब्दाचा घोष प्रत्येक घरांतून ऐकूं येत आहे ! हिंदुमुसलमान हा भेदभाव नाहींसा होऊन प्रत्येक हिंदुस्थानवासी गृहस्थ स्वदेशप्रेमांत गढून गेला आहे. कुणबीमाळी लोकांना देखील या प्रयत्नाचा पूर्ण उद्देश कळून चुकला आहे. आज त्या श्रीशंकराच्या देवळासमोरील पटांगणांत माणसांची केवढी तरी गर्दी ती. पवित्र गंगोदक हातीं घेऊन, अग्निनारायणासन्निध, अष्टदिग्पालांना साक्षीभूत ठेऊन समस्त नागरिकांनीं प्रतिज्ञा केली. महारचांभारादि लोकांच्या अंगांतील तें स्वदेशप्रेमाचें वारें तर विलक्षण ! या अशा सुसमयासच दादाचें येथें आगमन झाल्यानें दुधांत साखर घातल्यासारखेंच झालें. त्याच्या वेशाचा, त्याच्या खऱ्या कळकळीचा, त्याच्या प्रत्यक्ष आयुःक्रमाचा, लोकांस एक मूर्तिमंत कित्ताच झाल्यानें या गांवांतील स्वदेशी चळवळीस सुव्यवस्थित स्वरूप आलें. स्वदेशोद्धारार्थ त्याची केवढी खटपट ! स्वतःचें जीवित तृणवत् मानून स्वदेशप्रीत्यर्थ अहर्निश प्रयत्न करणारा माझा दादा खरोखर महापुण्यवान् देशभक्त होय !

(इतक्यांत शेखमहमद येतो त्यास पाहून.)

हा शेखमहमद इकडेच येतो आहे, बहुतकरून यांचा खुतबा संपला असेल. याला विचारल्यास सगळें कळेलच. (तो जवळ आल्यावर त्यास) काय शेखसाहेब, खुतब्याचें काम कोठपर्यंत आलें ? जुम्मामशीदींतच सगळे जमले होते ना ?

शेखमहमदः--होय जुम्मामशीदींतच सगळे जमलों होतों. खुदबा संपवून सगळी मंडळी घरोघर चालली आहे. केशवराव, तुह्मी भले गृहस्थ आहांत. आज पुष्कळ दिवस स्वदेशीवस्तु वापरण्याबद्दल लोकांस कळकळीनें तुह्मी सांगत होतां, तरी आह्मांस कांहीं कळत नव्हतें. तुमची थट्टाच करीत होतों; आजपर्यंत आह्मीं आमच्या दुकानांत परदेशी वस्तूंचा सांठा करून परदेशी वस्तूच लोकांस विकून स्वदेशाचें मातेरें केलें. आतां मात्र आमचे डोळे उघडले. माझ्या जातभाईंत अज्ञानी लोक फार ! त्यांना स्वदेशीचें नांव देखील माहीत नव्हतें. आपल्या जन्मभूमीबद्दल आपले कांहीं तरी कर्तव्य आहे, अशी त्यांना स्वप्नांत देखील कल्पना नव्हती. परंतु त्या चिदानंदस्वामीच्या आणि तुमच्या खटपटीनें माझे जातभाई आज पक्के स्वदेशी बनून गेले आहेत. आज जुम्मा मशीदींत आमच्या लोकांची फारच मोठी दाटी झाली होती. मुसलमान लोकांतील एक चिटपांखरू देखील घरीं राहिलें नव्हतें. सगळा जमाव मशीदींतच झाला होता. आमच्या मौलवी साहेबांचें बोलणें आधींच गोड. त्यांनीं आपल्या भाषणानें लोकांस स्वदेशीचा उपदेश करून सर्वांकडून महमद पैगंबराची शपथ घेवविली, आणि जागच्या जागीं परदेशी मालाची होळी करविली. गांवभर स्वदेशीबद्दल मुसलमान लोकांत विलक्षण चळवळ माजून राहिली आहे ! आतां दोन्ही जातींतील पुढाऱ्यांची भेट होऊन स्वदेशसेवेबद्दल विचार व्हावयाचा आहेना ? तो कोठें होणार ?

केशवरावः—त्याच्या करितांच तर मी निघालों आहे. थिएटरांतच सगळ्यांनीं जमावें असें ठरलें आहे. आतां तिकडे कोठपर्यंत व्यवस्था झाली आहे, तें पहावयास मला गेलें पाहिजे. तुह्मीही

आपल्या मंडळीस लवकर तयार होऊन येण्यास सांगा; बरें आहे, मी आतां जातों तिकडे.

शेखमहंमद्—मी आतां सगळ्यांनांच घेऊन येतों.

[दोघेही जातात.]

प्रवेश ७ वा.

(नाटकगृहाचा देखावा खुर्च्या वगैरे व्यवस्थेशीर मांडलेल्या आहेत.)

केशवराव:—–अरे येथें तर सारी व्यवस्था चोख दिसते. ह्या आमच्या तरुण स्वयंसेवक मंडळीच्या कामांत किलकूल हयगय व्हावयाची नाहीं. (घड्याळाकडे पाहून) ४॥ तर वाजून गेले, आतां मंडळी येईलच.

(इतक्यांत पडद्यामागें 'जय आर्यभूकी जय,' 'भारतमाताकी जय, 'वन्दे मातरम्'–असा ध्वनि होतो.)

हां, मंडळी आलीच.

(चिदानंदस्वामी, बाबासाहेब, बापूसाहेब, शंभूशास्त्री, वगैरे मंडळी येऊन आपापल्या स्थानावर बसते.)

चिदानंद—गृहस्थहो, या आपल्या गांवीं लहान थोर मंडळींत स्वदेशप्रीतीचा संचार झालेला पाहून कोणत्या देशभक्ताचे डोळे आनंदाश्रूनें भरून येणार नाहींत ? आपल्या या गांवांप्रमाणेंच सर्व देशभर जिकडे तिकडे स्वदेश नामाचा जयघोष झाला पाहिजे. देशप्रीतीचे अजब माहात्म्य सर्वांस कळून आलें पाहिजे, स्वदेश नामाचा जयघोष झाला नाहीं, असें एकही घर या हिंदुस्थानांत न राहील असा प्रयत्न आपणांस केला पाहिजे. असा प्रयत्न करण्यास, अशा रीतीनें सर्व देशभर

देशभक्ति आणि बंधुप्रीति वाढविण्यास, या वेशाचा उपयोग होईल, हें जाणूनच मीं हा वेश आंगिकारिला आहे. मला अशी खात्री आहे कीं, या माझ्या वेशाचे लोक हें स्वदेश सेवेचें व्रत हातीं घेतील तर अल्पावकाशांतच आपल्या देशाचा भाग्योदय होईल. जपानला जर स्वतःचा उत्कर्ष करून घेण्यास चाळीस वर्षें लागलीं, तर आपल्या देशास अवघीं वीस वर्षें पुरेत. मात्र पूर्ण श्रद्धेनें स्वदेशसेवाव्रत करणारे लोक आपणांत तयार झाले पाहिजेत. आतां मला एका गोष्टीकरितां आपणा सर्वांची क्षमा मागावयाची आहे, आणि ती गोष्ट आपणास कळून आल्यावर आपण मला क्षमा कराल, अशी मला आशा आहे.

शंभूशास्त्री—(हात जोडून) हें काय, आपण आह्मां लोकांची माफी मागतां ! छे, आपल्या आगमनानें, आपल्या मधुर संभाषणानें, आपल्या अश्रांत श्रमानें या गांवभर स्वदेशप्रीतीचा संचार झाला आहे. गांवांत मतभेद ह्मणून राहिलाच नाहीं. हिंदु, मुसलमान, महार, मांग, सर्वच जाती एका विचारांत तल्लीन झाल्या आहेत. आपआपसांत परकीयपणा ह्मणून राहिला नाहीं. परदेशचा मात्र परका, बाकी आपण सर्व एक, ही अशी वृत्ति आह्मां जनांची होण्यास कारण कोण, तर आपणच ! मग आपणच आमची माफी मागणार !

चिदानंद—हो. आज पंधरा दिवस मी आपल्या गांवीं राहून आपणास ओळख दिली नाहीं, याबद्दल आपण मला क्षमा करा. आपल्यापुढें बसलेला मी लहानपणीं आपल्या चरणांजवळ बसून संस्कृत विद्येचा आस्वाद घेणारा बाबासाहेबांचा वडील मुलगा विश्वनाथ (सर्व मंडळी चकित होऊन एकमेकांकडे पाहते.) येथें येऊन इतके दिवस झाले, तरी मी आपली, वडिलांची, व इतर माझ्या स्नेह्यांसोबत्यांनी भेट न घेतां स्वस्थ

राहिलों, याबद्दल आपण मला क्षमा कराल अशी मला उमेद आहे.

नानासाहेब—(डोळ्यांतून अश्रुबिंदु वाहतात व कंठ दाटून येतो) विश्वनाथ ! माझा विश्वनाथ ! छेः असें होणें नाहीं. अरे मी स्वप्नांत आहें कां जागा आहें ! माझा विश्वनाथ मला आतां कोठून भेटणार ! मी उगीच्या उगीच भलभलतें बोलून त्याला घालवून दिला. मी मोठा दुराग्रही आणि माझा मुलगा तो. तो आतां मला कसचा भेटतो !

स्वामी—(बाबासाहेबांच्या पायांवर डोकें ठेवून) बाबा, मी आपला विश्वनाथ. आपण रागाच्या आवेशांत मला आज्ञा केलीत, आज्ञाप्रसादानेंच मीं हातीं घेतलेलें काम आजपर्यंत निर्विघ्नपणें पार पडलें. आपण जर त्या वेळेस रागावलां नसतां, तर मी आपल्यापुढें आज आहे असा दिसलों नसतों. मीही एक उदरंभर स्वार्थसाधु परकीयसेवातत्पर मनुष्य होऊन राहिलों असतों !

बाबासाहेब—आतां माझे डोळे उघडले. अरे विश्वनाथ, मी मोठा भाग्यवान्. माझ्या पोटीं (चिदानंद स्वामी आणि केशवराव यांजकडे बोट करून) हीं असलीं रत्नें उत्पन्न झालीं. हा विश्वनाथ आणि हा केशव ! हे माझे उभयतां पुत्र स्वार्थावर लाथ मारून स्वदेशसेवेसाठीं उद्युक्त झाले हें पाहून मीं धन्य झालों. बाबांनों, मी तुह्मांस भलत्याच मार्गास लावीत होतों, परंतु आतां माझी चूक मला उमगून आली. मीं अथवा माझ्या पिढीच्या लोकांनीं आपलें तारुण्य व्यर्थ घालविलें. आह्मांस भुरळ पडली होती. परकी लोकांच्या सेवेंतच आह्मांस स्वर्गसुख वाटे. नौकरी पलीकडे आपणांस कांहीं कर्तव्य आहे असें आह्मांस कधींच वाटलें नाहीं. अल्प श्रमानें आह्मांस मोठमोठाल्या नौकऱ्या मिळत असल्या कारणानें स्वार्थापलीकडे

आमची दृष्टि गेली नाहीं. एखादी रावबहादुरी अथवा P. H. D. अगर C. I. E. हे किताब आमच्या नांवापुढें जोडण्यास आमची केवढी धडपड ! आमचें सारें आयुष्य व्यर्थ गेलें. माझें गेलेलें आयुष्य मला परत मिळेल काय ? छे: ? असें कसें होईल ! परमेश्वरा आतां माझें बहुतेक आयुष्य संपून गेलें. मला पुनर्जन्म या माझ्या हिंदुस्थानांतच देऊन आजन्म स्वदेशसेवाव्रत माझ्याकडून करीव. अरे विश्वनाथ, अरे केशव, तुह्मांस मी काय सांगणार ? तुह्मीं आपलें खरें कर्तव्य करून जन्माचें सार्थक केलें, आणि आपल्या वडिलांचा लौकिक सर्वत्र वाढविला. तुह्मीं धन्य आहांत, व तुह्मांस आतां इतकेंच सांगावयाचें कीं, तुह्मी हातीं घेतलेल्या कामापासून—केवढालीं संकटें आलीं तरी—रतिभर देखील ढळूं नका.

बापूसाहेब--(आपल्याशींच) काय हा स्वदेशप्रीतिचा अपूर्व प्रभाव ! माझ्यापुढें बसलेली ही स्वामींची मूर्ती देशभक्तीचा अखंड पुतळाच होय. यांच्यापुढें बसण्याला देखील मी योग्य नाहीं. आजपर्यंतच्या माझ्या वर्तनक्रमाची आठवण झाली ह्मणजे मला शरम वाटते. काय माझें जिणें ! या केशवरावास मी कितीदां तरी हिणाविलें असेल, स्वदेशी वस्तूंचा मला केवढा तरी तिटकारा, माझ्या बायकोनें, माझ्या पोरानें, जरी मला बुद्धि शिकविली, तरी माझे डोळे उघडले नाहींत. सबंध देशभर स्वदेशी वस्तू वापरण्याबद्दल सभा होत असतां, मी मात्र सभेंत पुढें पुढें करून पक्का परदेशी आहे तो आहेच. एक रावसाहेबी मिळविण्याकरितां माझी केवढी खटपट ! बड्या कामगारांना मेजवान्या देण्यांतच माझी सारी धनदौलत नाहींशी झाली ! अरे मी केवढा मूर्ख, कीं तें राव-साहेबीचें चर्मपट किती बंदोबस्तानें ठेवून दिलें आहे ! माझ्या घरीं येणाऱ्याजाणाऱ्या गृहस्थांच्या नजरेस तें पडावें, ह्मणून सुंदर परदेशी चौकटींत बसवून उचस्थानीं तें टांगून ठेविलें

आहे! ह्या चौकटीकडे पहाण्यांतच मी तासचे तास केवळ मूर्खाप्रमाणें घालवीत असे. माझें घर मीं परदेशी वस्तूंनें सुशोभित करून ठेविलें आहे. आजपर्यंतचा माझा आयुष्य-क्रम ह्मणजे एक स्वदेश घातक्याचा जीवनक्रमच होय. (उघड) केशवराव आजपर्यंत मी आपणांस पुष्कळ हिणविलें, याबद्दल मी आपली पदर पसरून माफी मागतों.

केशवराव—छे, हें काय करितां ? झालें तें झालें. पुढील आयुष्य सन्मार्गानें घालविल्यास मागच्या कृत्याबद्दल प्रायश्चित्त घेतल्या-सारखें होईल.

बापूसाहेब—छे हो, आजपर्यंतची आमची पक्की समजूत कीं, मनुष्य जें जें करितों तें, एक पैसा मिळविण्यासाठीं किंवा लोकांनीं आपली वाहवा करावी एवढ्याच उद्देशानें करितो. या व्यतिरिक्त एकादा उदात्त विचार असेल असें माझ्या स्वप्नीं देखील आलें नाहीं. स्वदेशप्रीति हा शब्दच मला माहीत नव्हता.

केशवराव—झालें तें झालें, पुढें मागें एक विचारानें आपण सर्व जण मिळून स्वदेशकल्याणार्थ झटूं ह्मणजे झालें.

शंभूशास्त्री—या स्वदेशी चळवळीनें सर्वांचेच डोळे उघडले. आह्मां वैदिक मंडळीस स्वदेश ह्मणजे काय, हें कळतच नव्हतें. हिंदुस्थानाला आमचा देश कां समजावा, आणि परमेश्वरा-प्रमाणें या आपल्या देशावर आपण कां प्रीति करावी, हें कांहींच कळत नसे. वेदान्तांत गर्क होऊन द्वैताद्वैत वगैरे मत प्रतिपादण्यांतच आमचा पुरुषार्थ. कूपमंडूक न्यायानें आह्मी आमचें चांगलें, इतरांचें सर्व वाईट, असा आग्रह धरून आत्मस्तुति आणि परनिंदा यांतच मग्न होतों. द्वैताद्वैत विचारांत तपेंचीं तपें घालविणारे आमचे पंडितशिरोमणी आमच्या देशाबद्दल क्षणभर देखील

विचार करीत नसत. आज तागाईत परद्वीपास जाणाऱ्या लोकांस बहिष्कार घालण्यांत आह्मी सदा तत्पर. स्वदेशोन्नतीच्या उद्देशानें परद्वीपास जाणारे लोक आह्मां वैदिक जनास महापातकी वाटत; परंतु आतां तो मनू बदलण्याचा रंग दिसतो.

(इतक्यांत पडद्यांत ' अल्ला हो अकबर ' असा ध्वनि होतो.)

स्वामी—मौलवी साहेबांची स्वारी इकडे येत आहे वाटतं! खरोखर या वृद्ध गृहस्थाची केवढी खटपट! आह्मां सर्वांसच ते पूज्य आहेत. जातीजातींतील तंटे मोडून हिंदु-मुसलमानांत स्वदेशसेवेबद्दल ऐक्यभाव वाढविण्याच्या कामीं या थोर गृहस्थाचे केवढाले प्रयत्न! स्वदेशी चळवळ कायम राखण्याकरितां आमच्या मुसलमान बंधूंत पंच नेमून त्यांनीं कित्येक स्वयंसेवक लोकांस तयार केलें व लोकांत उत्साह उत्पन्न केला, अशा ह्या वृद्ध गृहस्थांस पाहून कोणास कौतुक वाटणार नाहीं!

(मौलवी साहेब, शेखमहंमद वगैरे मुसलमान मंडळी येते, केशवराव पुढें जाऊन त्यांस बाजूच्या खुर्चीवर बसवितात.)

मौलवीसाहेब—(केशवरावाचा हात धरून) केशवराव तुम उमदे आदमी हो. जनाब इस देशी चलवलके बारेमें तुमारी कितनी सई व कोशिस. अल्ला आपको सर्फराज करे. देसी चलवलका इल्म तमाम अवामको सिर्फ तुमारी मेहनतसे हुवा. और इस चलवलकी तरफ तवज्जोह किस लिये करना ए भी उनको मालूम हुवा.

स्वामिमहाराज—मौलवीसाहेब, आप हमारे लिये बडे बुजुर्ग हो. अब इसके आगे देशी चलवलको कायम व दायम बनाकर मुलकके बेहबुदीके लिये हम क्या करना चाहिये वो यहां जमीहुई मजलीस को सुनाइये.

मौलवी साहेब—क्या हरकत है. मेरे सामने मुल्कके बेहबूदीके लिये अपना जानोमाल निसार करके बैठे हुये लोगोंको देखकर मेरी आंखें खुषीके अश्कोंसे भर आतीहैं. बाबासाहेबके जैसे उमर रसीदा आदमी, बापु साहेबके जैसे बडे वकील, हमारे शेखसाहेबके जैसे बडे सौदागर, जानोजी रावके सरीखे बडे जमीदार, आप और केशवरावके जैसे जवान आदमी जब एक दिलसे काम करतेहैं, तो किस मुल्कका भला नसीबा न खुलेगा? आइंदा पहिले हम अपने तैंय एक मांके बच्चे ऐसा समजकर चलना चाहिये. अबकात बसरीके लिये जो के पेशा इख्तीयार करते हैं उस्को संभालकर हमारे मुल्ककी हत्तल मकदूर खिदमत करनी चाहिये. अबके सौदागरोंमेंसे मुख्तसर साहेबोनें एक दिलसे ए ठराना चाहिये के कोई बिदेशी चिज हमारे मुलुकमें नहीं मंगवाना. और आम लोगोंनेभि इस कदर अपना दिल मजबूत करलेना चाहिये के बारे हम भूके रहेंगे, पर बिदेशी चिज हरगीज हम नहीं लेंगें. मेरे भाईयोंकों इस देशी चलवलका अभीतक मुद्दुवा पुरी तौरसे मालुम नहीं है. अगर सच पुछोगे तो ए है के, इस देशी चलवलमें हुनूदोंसे हम मुसलमानोको मखसूसन जियादा फाईदा है. हुनरी लोगोंमें मुसलमानोंकि अदद बेशतर है. हुनरोंमें मुलाजीम और फिस्तकार बहुत हैय. हमेंने ए देशी चलवल इसलिये हातेंमें ली हैय के, इस्की जडमें मुल्कके बेह बुदीका बडा मुदूवा हैय. जिस शाही खानदानकी हमारे मुल्कपर हुकुमत है उस खानदानसे हरगीज बेवफा न होना चाहिये. हिंदुस्थानके लोगोंमें ए बडी सिफत हैय के हमेशा ओ सलतनतके खैरखाह रहते है. शाही खानदानके हकमें इस खैरखाहिको साबित रखकर मुल्कके बेबुदीके लिये मेहनत करनेमें सरे मुयभी दरेग न करना चाहिये. और हम जो कुछ करना चाहते हैं उसके करनेमें हजारहा मुश्किलें पेश आवें तो भी उन्को हिकमतसे या ताकतसे दफा

करना चाहिये. हमारे हिंदुस्थानके तीस करोड लोगों कि ताकते अददांके आगे किसी जातकी मुश्कील ठेर नहीं सकेगी. हिंदू लोगोंमें धेड वगैरे कौमोंको नीच समजकर उन्की हिकारत करनेकी आदत है. इस आदत को छोडकर उन कोमोंको देशी बिरादरीका दर्जा देना, और देशी कामोमें उनसे काम लेना जरूर है. धेड मांग अगरचे एक अदना शक्स है फिर भी ओ हमारा देशी भाई है. हिंदुस्थानमें उसने जनम लिया हैय, इस लिये उसके साथ बिदेशीयोंकि निसबत हजार हिस्से जियादा मोहब्बतसे पेश आना चाहिये. आपको जियादा कह नहीं सकताहूं. मुझ सरीके बुढेका आप सभोंको बारबार एहि कहना है के, तीस करोड लोगोंकी कवी यकदिली होने दो. सभोंके दिलोमें आपने मुल्कके लिये बे चैनी पैयदा होकर आप उस्के फसादोंकों भूलजाव. देशी खैर खाहोके पुतले मुल्कभर जिधर उधर खडे करो. ओर जो करना हैय ओ खुदापर तवकल रखकर करो, फिर सरे जमीपर किसीको हिंमत नहोगी के तुमको बदनाम करें और जो आदमी लोगोंकि खिदमत करताहै उस्को सबलोग अच्छी मदद करते हैंय. उसकी बेआब्रू किसीको गवारा न होगी. इस बातकी खातीर जमई गैर मुल्कके लोगोंको अपनी चालसे करदो. थोडेहि अरसेमें इस हिंदुस्थानके तरफ कजरूईसे देखनेकी किसी बशरको हिया न होगी. (मराठी भाषांतर).

मौलवीसाहेब—कांहीं हरकत नाहीं. माझ्या पुढें देशकार्यार्थ तन, मन, धन अर्पण करून बसलेल्या लोकांस पाहून माझे डोळे आनंदाश्रूनें भरून येतात. बाबासाहेबांसारखे वृद्ध गृहस्थ, बापूसाहेबांसारखे बडे वकील, आमच्या शेखसाहेबांसारखे बडे व्यापारी, जानोजीरावांसारखे जमीनदार लोक, आपण, आणि केशवरावांसारखे तरुण गृहस्थ, एकदिलानें काम करीत असतां

कोणत्या देशाचा भाग्योदय होणार नाहीं ? यापुढें प्रथम आपण एका आईचीं लेंकरें असें एकमेकांस मानून वागूं या. आपल्या उदरपोषणार्थ कोणताही धंदा हातीं घेतला तरी त्या धंद्यांत राहूनच स्वदेशसेवा करितां येईल तितकी आपण केली पाहिजे. या वेळेस व्यापारी वर्गांतील प्रमुख लोकांनीं एक कट करून, परदेशी जिनसा ह्मणून आपल्या देशांत आणावयाच्या नाहींत, असा निश्चय केला पाहिजे. लोकांनीं देखील एक वेळ उपाशीं राहिलें तरी हरकत नाहीं, पण परदेशीय वस्तु वापरणार नाहीं, हा बाणा बाळगिला पाहिजे. माझ्या जातिबांधवांस या स्वदेशी चळवळीचा उद्देश अद्यापि चांगला समजला नाहीं. खरोखर पाहतां, हिंदु लोकांपेक्षां आह्मां मुसलमान लोकांचाच या चळवळीनें विशेष फायदा होतो आहे. कलाकौशल्याचे धंदे करणाऱ्या लोकांत मुसलमान लोकच अधीक आहेत. हिंदु लोकांत नौकरी आणि शेती करणारे लोक अधिक. ही चळवळ जी आह्मी हातीं घेतली आहे, तिच्या मुळाशीं देशकल्याण हाच मुख्य उद्देश आहे, ज्या राजघराण्याचें आपल्या देशावर राज्य चाललें आहे त्या राजकुटुंबाविषयीं कधीं बेइमान होतां कामा नये. हिंदुस्थानवासी लोकांचा सर्वांत मोठा सद्गुण ह्मणजे राजभक्ति. राजघराण्यासंबंधीं राजभक्ति कायम ठेऊन देशकल्याणार्थ खटपट करण्यांत काडी इतकी सुद्धां देखील कसूर करतां कामा नये. आणि आपण जें करावें ह्मणतों तें करण्यांत अनंत अडचणी आल्या तरी त्या युक्तीनें अगर शक्तीनें दूर केल्या पाहिजेत. आमच्या हिंदुस्थानांतील तीस कोटी लोकांच्या संघशक्तीपुढें कसल्याच अडचणी टिकणार नाहींत. हिंदु लोकांत महारमांगादि कनिष्ठ जातीस, हलकें समजून तुच्छ मानण्याची वहिवाट आहे. ती वहिवाट मोडून त्या जातींतील लोकांस देशबंधुत्वाचा मान देऊन देश-

कार्यात त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे. जरी एखादा मनुष्य महार मांग असला, तरी तो आपला देशबंधू आहे, हिंदुस्थानांत त्याचा जन्म झाला आहे, तर तो परकीयापेक्षां आपणांस शतपटीनें अधिक प्रिय वाटला पाहिजे. आपणांस फार सांगत नाहीं, माझें ज्ञाताऱ्याचें आपणां सर्वांस एवढेंच पुनः पुनः सांगणें आहे कीं—तीस कोटी लोकांची प्रचंड एकी होऊं द्या. सर्वांच्या मनांत स्वदेशाबद्दल सारखी तळमळ लागून आपआपसांतील भेदभाव विसरून टाका, स्वदेश भक्तांचे पुतळे देशभर जिकडे तिकडे उभे करा. आणि जें करणें तें परमेश्वरावर भार ठेवून करा, म्हणजे या जगांतच काय, कोठेंच तुह्माला अवाक्षर बोलण्याची कोणाचीही छाती होणार नाहीं. आणि जो मनुष्य लोकसेवेचें व्रत हातीं घेतो त्यास सर्व लोकांचें चांगलें पाठबळ आहे, त्याचा अपमान कोणांसच सहन होणार नाहीं, असें आपल्या कृतीनें परकीय लोकांस कळूं द्या. म्हणजे अल्पावकाशांत या हिंदुस्थान देशाकडे वक्र दृष्टीनें पाहण्यास कोणीच धजणार नाहीं.

स्वामी चिदानंद—आपणांपुढें अद्यापि महत्कार्य आहे. देशोद्धाराच्या मार्गास आपण नुक्तेच लागलों आहों. ज्या राष्ट्रमातेच्या कृपाप्रसादानें आज आपणा सर्वांचे डोळे उघडले त्या आर्यमातेची आपण सर्वजण मिळून स्तुति करूं या.

(सर्व मंडळी उभी राहून पुढील राष्ट्र–गीत म्हणते.)

राष्ट्र-गीत.

(चाल-सुंदर मुख तुंदिल.)

वन्दे त्वां भूदेवीं आर्यमातरम् ।
जयतु जयतु पदयुगलं ते निरंतरम् ॥ धृ० ॥
शुभ्रशरच्चंद्रयुक्तचारुयामिनीम् ।
विकसितनवकुसुममृदुलदामशोभिनीम् ।
मंदस्मितयुक्तवदनमधुर-भाषिणी म् ।
सुजलां, सुफलां, सरलां, ।
शिववरदां, चिरसुखदां, मुकुलरदां, आर्यमातरम् ॥ वन्दे० ॥
दशकत्रयकोटीजनकंठनादिनीम् ।
अमितभुजां धृतसद्सीं, तनयतारिणीम् ।
हिमनगजां, स्वाभिमानबुद्धिदायिनीम् ।
कमलां, अमलां, अतुलां, ।
रिपुहारिणीम्, बलकरिणीम् ,धृतनलिनीम्, आर्यमातरम्॥ वंदे०॥
धर्म स्त्वं मर्म त्वं यशोबलम् ।
शक्तिस्त्वं, भक्तिस्त्वं कर्म चाखिलम् ।
प्रतिसदनं प्रतिमाते त्वं महाफलम् ।
धरणीं, भरणीं, जननीं, ।
कविमतिभां नतसुलभां, जगदम्बां, राष्ट्रमातरम् ॥ वन्दे० ॥

समाप्त.